**<u>सभापतीस्थानी - माननीय सभापती.</u>**

अधिवेशनाचा शुभारंभ "वंदेमातरम्" या गीताच्या गायनाने झाला.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, राज्यामध्ये ...... ( सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे तसेच श्री. रमेश निकोसे हे उभे राहून बोलत असताना .. )

**सभापती** : आता प्रथमत:मंत्र्यांचा परिचय करून देण्यात येईल. सन्माननीय सदस्यांना मी विनंती करतो की, त्यांनी खाली बसावे.

**<u>मंत्र्यांचा परिचय</u>**

श्री. आर.आर. पाटील (उपमुख्य मंत्री) : माननीय सभापती महोदय, ॲड. प्रितमकुमार संपतराव शेगावकर यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करून देत आहे.

**<u>नवनिर्वाचित सदस्यांचा परिचय</u>**

श्री. आर. आर. पाटील (उपमुख्य मंत्री) : माननीय सभापती महोदय, मी आपणास व आपल्यामार्फत या सभागृहास खालील नवनिर्वाचित सदस्यांचा परिचय करून देत आहे.

1) श्री. अरूणलाल गोवर्धनदास गुजराथी

2) श्री. गोविंदराव वामनराव आदिक

3) श्री. उल्हास शिवराम पवार

4) श्री. जयंत प्रभाकर पाटील

5) श्री. परशुराम प्रभाकर उपरकर

6) श्री. सय्यद कमरूझ जामा

7) श्री. राजन कृष्णा तेली

8) श्रीमती उषाताई मोतीराम दराडे

9) श्री. सय्यद पाशा पटेल

10) श्री. केशवराव लक्ष्मणराव मानकर

***

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे आणि श्री. रमेश निकोसे हे आपापल्या जागेवर उभे राहून बोलत असतात .. )

**नियम 289 च्या प्रस्तावाबाबत .....**

**सभापती** : माझ्यासमोर दोन प्रस्ताव आलेले आहेत. एक प्रस्ताव नियम 289 अन्वये सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, श्री. नितीन गडकरी आणि इतर सदस्यांचा आहे आणि दुसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे आणि श्री.जयंत प्र. पाटील, श्री.कपिल पाटील यांनी दिलेला आहे. आजच्या कामकाजामध्ये नियम 289 मध्ये ज्या पद्धतीने आपण विषय मांडलेला आहे तो पाहता मी प्रथमत: माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांना त्यांचा विषय मांडण्यास परवानगी देतो. ..

( सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे उभे राहून बोलत असतात .... )

( यानंतर श्री. सरफरे ... बी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधान परिषद नियम 289 अन्वये...

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मी सुध्दा नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास तहकूब करण्यासंबंधीचा प्रस्ताव दिलेला आहे....

**सभापती** : माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडेजी आपण नियम 289 अन्वये प्रस्ताव दिला आहे. परंतु पहिल्यांदा माननीय विरोधी पक्षनेत्यांचा प्रस्ताव आलेला आहे. त्यानंतर आपणाकडून प्रस्ताव आला आहे. मी आपणाला बोलावयास परवानगी देतो, परंतु पहिल्यांदा माननीय विरोधी पक्षनेत्यांना बोलावयास परवानगी देतो. तेव्हा आपण कृपया खाली बसावे...

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मी या सभागृहाचा आणि आपला सन्मान राखून सांगू इच्छितो की, हे नागपूर शहर आणि संपूर्ण राज्य व गृह खाते हे आरोपीच्या पिंजऱ्यामध्ये उभे आहे. त्यामुळे आज आपण या विषयावर चर्चा न करता बाकीच्या विषयांवर चर्चा करणार आहोत काय?

**सभापती** : माननीय विरोधी पक्षनेत्यांनी व आपण असे दोघांनी नियम 289 प्रश्नोत्तराचा तास तहकूब करण्यासंबंधी प्रस्ताव दिलेला आहे. प्रश्न असा आहे की, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी या प्रस्तावासंबंधी म्हणणे मांडल्यानंतर आपले म्हणणे मांडण्याकरीता मी आपणास संधी देतो...

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी नियम 289 अन्वये प्रस्ताव दिलेला असला तरी माझी आपणास विनंती आहे की, संपूर्ण सरकार आणि गृह खाते हे आरोपीच्या पिंजऱ्यामध्ये उभे आहे. गृह खात्याने संपूर्ण नागपूर शहरामध्ये व राज्यामध्ये आतंगवाद निर्माण केला आहे. त्या संदर्भात आपण आम्हाला न्याय द्यावा...

**सभापती** : माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आपले भाषण सुरु करावे...

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधान परिषद नियम 289 अन्वये सर्व कामकाज बाजूला ठेवून खालील विषयावर चर्चा करण्यात अशी मी विनंती करतो.

"ज्याअर्थी, दिनांक 29 सप्टेंबर, 2006 रोजी मध्यरात्री भंडारा जिल्हयातील खैरलांजी गावात भोतमांगे या बौध्द कुटुंबाच्या घरातील सुरेखा भोतमांगे व तिच्या 3 मुलांची हत्या करण्यात आली आहे, आणि,

ज्याअर्थी, या घटनेला काही दिवस उलटतात न उलटतात तोच दिनांक 17 नोव्हेंबर, 2006 रोजी ठाणे जिल्हयात याच घटनेची पुनरावृत्ती घडली...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : माननीय विरोधी पक्षनेत्यांनी प्रस्ताव न मांडता हा नियम 289 अन्वये प्रस्तावाचा विषय कसा होतो त्यासंबंधी निवेदन करावे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ज्याप्रकारे दलितांवरील अत्याचाराची एक मालिका या राज्यामध्ये सुरु आहे. त्या मालिकेने भंडारा जिल्हयातील खैरलांजी येथे उच्चांक गाठला आहे. एकाच कुटुंबातील चार लोकांची अतिशय निर्घृणरित्या हत्या करण्यात आली. पोलिसांनी या हत्याकांडाची वेळीच दखल न घेतल्यामुळे त्यामध्ये सामील असलेले आरोपी बाहेर फिरत राहिले. आणि त्या आरोपींवर योग्य गुन्हा दाखल न केल्यामुळे त्यांची जामिनावर सुटका करण्यात आली. त्याचप्रमाणे ज्या व्यक्ती मृत होत्या त्यांचे सुध्दा पोस्टमार्टेम नीट करण्यात आले नाही. एका दलित कुटुंबावर अशाप्रकारे अन्याय व अत्याचार झाल्यानंतर पोलिसांकडून कोणतीही कारवाई झाली नाही. आणि सरकारला देखील हे प्रकरण हाताळण्यामध्ये अपयश आले. त्यामुळे त्यासंबंधी तीव्र प्रतिक्रिया संपूर्ण महाराष्ट्रभर उमटली. त्यामध्ये जनसामान्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले, जीवितहानी झ ाली. भोतमांगे कुटुंबाच्या हत्याकांडाच्या निषेधार्ह अमरावतीला मोर्चा निघाला त्यावर देखील पोलिसांनी गोळीबार केला. त्या गोळीबारामध्ये एक युवक मारला गेला. भोतमांगे प्रकरणाची चर्चा चालू असतांना उत्तर प्रदेश राज्यातील कानपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळयाची विटंबना झाली .त्याचे तीव्र पडसाद महाराष्ट्रामध्ये उमटले. या घटनेचा मी तीव्र शब्दामध्ये निषेध करतो. ज्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशाला घटना दिली त्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळयाची या देशामध्ये स्वातंत्र्याच्या 58 वर्षानंतर अशापध्दतीने विटंबना केली जात असेल तर या देशातील आणि महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्था धोक्यात आली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाच्या विटंबनाच्या घटनेचे तीव्र पडसाद या महाराष्ट्रामध्ये उमटले. महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्था धोक्यात आली. रेल्वे ट्रेन जाळल्या गेल्या, अनेक ठिकाणी गोळीबार झाले, उस्मानाबाद येथे गोळीबार झाले. अनेक शहरांमध्ये गोळीबाराच्या फैरी झ ाडण्यात आल्या. एकंदरीत महाराष्ट्राचे जनजीवन विस्कळीत झाले. आज हा संपूर्ण महाराष्ट्र दहशत आणि तणावपूर्ण स्थितीत वावरत आहे.

(यानंतर श्री.किल्लेदार)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (पुढे सुरु...

अशा परिस्थितीत आज महाराष्ट्राच्या उपराजधानीमध्ये, नागपूर नगरीमध्ये विधिमंडळाचे अधिवेशन होत असताना नागपूर शहरामध्ये पोलिसांनी उच्छाद मांडलेला आहे. तेव्हा या विषयावर सभागृहामध्ये चर्चा व्हावी...

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना विनंती आहे की, प्रस्तावावर चर्चा होत असतांना त्यांनी सविस्तर सगळे मुद्दे मांडावेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या प्रस्तावावर चर्चा व्हावी, अशी विनंती करतो.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, विरोधी पक्ष नेत्यांनी या ठिकाणी जो स्थगन प्रस्ताव मांडलेला आहे,त्या संदर्भात बोलायचे झाले तर संपूर्ण महाराष्ट्राचे सरकार..त्यातल्या त्यात महाराष्ट्रातील गृह खाते हे आरोपीच्या पिंजऱ्यामध्ये उभे राहिलेले आहे. नागपूर शहराला पोलिसांच्या छावणीचे स्वरुप आणलेले आहे. 10 लाख पोलीस आणि एस.आर.पी.च्या बटालियन, रॅपिड ॲक्शन फोर्स येथें तैनात केला आहे. शिस्तबध्द पध्दतीने मोर्चा निघणार असताना त्या मोर्चाला बंदी घालण्यात आलेली आहे. महाराष्ट्राच्या गृह खात्याने म्हणजेच महाराष्ट्र सरकारने खैरलांजी हत्याकांड प्रकरणामध्ये काहीही लक्ष घातले नाही. त्यामुळे या प्रकरणामध्ये जातीयवादी शक्तींनी अत्यंत निघृणपणे भोतमांगे कुंटुंबाचा मुडदा पाडला.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी ज्यावेळेस प्रस्तावावर चर्चा होईल, त्यावेळेस सर्व तपशील मांडावा. आता 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे, त्या अनुषंगाने प्रश्नोत्तराचा तास तहकूब करुन प्रस्ताव घेण्याच्या संबंधातच सन्माननीय सदस्यांनी बोलावे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभागृहासमोरील प्रश्नोत्तराचाच तास नाही तर सभागृहासमोरील सर्व कामकाज बाजूला ठेवून केवळ खैरलांजीमध्ये घडलेल्या प्रकरणाच्या विषयावर चर्चा व्हावी. महाराष्ट्र सरकार हे जातीयवादी आहे, महाराष्ट्राचे गृह खाते जातीयवादी पध्दतीने दलितांचे आंदोलन चिरडून टाकण्याचा प्रयत्न करत आहे, असा माझा आरोप आहे. मला लक्षात आणून द्यावयाचे आहे की, दलितांवर अत्याचार होतात त्यावेळेस तेथे दहा पोलिसही पाठविले जात नाहीत. या संदर्भाने मोर्चा निघणार म्हटल्यानंतर पोलिसांचा आतंकवाद सुरू केलेला आहे. यामध्ये दलित भोतमांगे कुटुंब बळी पडलेले आहे, ही लोकशाही आघाडी सरकारला शोभा देणारी बाब नाही, तर ती शरमेची बाब आहे. खैरलांजी हत्याकांडामध्ये पोलिसांनी अत्याचार केलेला आहे . म्हणून माझे असे म्हणणे आहे की, महाराष्ट्र सरकार हे सत्तेमध्ये रहाण्याच्या लायकीचे नाही, हे सरकार बरखास्त केले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे (पुढे सुरु...

पाहिजे आणि येथे राष्ट्रपती राजवट लागू केली पाहिजे. आजचे सर्व कामकाज बाजूला ठेवून केवळ खैरलांजी हत्त्याकांडाची चर्चा करण्यात यावी, अशी माझी मागणी आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, या ठिकाणी विरोधी पक्ष नेते श्री.भाऊसाहेब फुंडकर यांनी सभागृहापुढील प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन तातडीने खैरलांजी हत्त्याकांडाच्या महत्वाच्या विषयावर चर्चा करण्यात यावी, अशी विनंती केलेली आहे, त्याच्या समर्थनार्थ मी उभा आहे.

महोदय, खैरलांजी हत्त्याकांड प्रकरण मानवतेला कलंकित करणारे आहे. त्याचे पडसाद सर्वत्र उमटत आहेत, ही दुर्दैवाची बाब आहे सभापती महोदय, विशेषत: या प्रकरणाचा उद्रेक झाल्यानंतर गृह विभागाने ज्या रितीने चळवळ चिरडून टाकण्यासाठी ज्या प्रकारची लोकांना वागणूक दिलेली आहे, ती योग्य नाही. माजी राज्यमंत्री श्रीमती सुलेखा कुंभारे यांच्या विरुध्द क्रिमिनल कलम 307 लावून केसेस घातलेल्या आहेत. राजकीय नेत्यांवर अशाप्रकारच्या गुन्हेगारी केसेस घातल्या जात नाहीत. स्वाभाविकपणे एक महिन्यांनी आणखी एक प्रकरण घडल्यामुळे संचारबंदी लागू केलेली आहे. आता दोन तासापूर्वी सिंदेवाही येथे उमेदवार, श्री.विजय वडेट्टीवार यांनी दलित कार्यकर्त्याला मारहाण केल्या प्रकरणी त्यांच्या विरूध्द अट्रोसिटी ॲक्ट अंतर्गत गुन्हा नोंदविला गेलेला आहे. एकंदरीत कॉंग्रेस-राष्ट्रवादी सरकार महात्मा गांधी, बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शाहू महाराज यांचे नाव घेऊन राज्य चालविते आणि दुसऱ्या बाजूला दलितांवर अत्त्याचार वाढत आहेत, कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण झालेली आहे. म्हणून या गंभीर विषयावर समाजाचे स्वाथ्य सुरक्षित रहावे या दृष्टीने आजचे सगळे कामकाज बाजूला करून या विषयावर चर्चा होणे आवश्यक आहे, तेव्हा आजचे कामकाज स्थगित करून या विषयावर चर्चा करावी, अशी जी मागणी करण्यात आलेली आहे, त्यास सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे साहेबांनी समर्थन केलेले आहे. या दोघांच्या म्हणण्याला मी दुजोरा देतो आणि त्यांची ही विनंती आपण मान्य करावी अशी आपणास विनंती करतो.

-

यानंतर श्री.बरवड.....

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, नियम 289 अन्वये आजचे सभागृहाचे सर्व कामकाज तहकूब करुन या महत्वाच्या प्रश्नावर चर्चा झाली पाहिजे. याबाबत माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी तसेच सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी मागणी केलेली आहे. आम्हीही दोन प्रस्ताव दिलेले होते ते ताबडतोब स्वीकारुन ही चर्चा घेणे आवश्यक आहे. खैरलांजी प्रकरण हे मानवतेला काळिमा फासणारे तसेच महाराष्ट्राला अतिशय लज्जास्पद आहे. या घटनेनंतर महाराष्ट्र सरकारची आणि गृह मंत्रालयाची जी व्यवस्था राहिलेली आहे त्यामुळे राज्यभर त्याचे तीव्र पडसाद उमटलेले आहेत. राज्यात आगडोंब उसळलेला आहे. या ठिकाणी कायद्याचे राज्य शिल्लक राहिलेले नाही. या लोकशाही आघाडी सरकारने मोर्चाला बंदी केली. शांती मोर्चाला बंदी केली. कायदा नावाची कोणतीही व्यवस्था महाराष्ट्रात राहिलेली नाही. जो शांततेने प्रतिकार करु मागतो, विरोध प्रकट करु मागतो त्याला झोपडपले जात आहे. अशा परिस्थितीमध्ये सभागृहाचे आजचे बाकीचे कामकाज बाजूला ठेवून ही चर्चा घेणे आवश्यक आहे.

श्री. रमेश निकासे : सभापती महोदय, सभागृहाचे आजचे सर्व कामकाज स्थगित करुन खैरलांजीमध्ये जे हत्याकांड झाले त्यासंबंधीची चर्चा या ठिकाणी घेणे गरजेचे आहे. संपूर्ण महाराष्ट्र पेटून गेलेला आहे. अमरावतीमध्ये श्री. वानखेडे नावाच्या माणसाला गोळी घातली. कामठीमध्ये जे दोन पोलीस गेले ते दलित होते असे म्हणतात.

**सभापती** : ज्यावेळी या विषयावर चर्चा होईल त्यावेळी आपल्या भावना व्यक्त कराव्यात.

श्री. रमेश निकासे : सभापती महोदय, मी एकच विनंती करतो की, आपण या चर्चेला अनुमती द्यावी. हा केवळ दलितांचाच प्रश्न नसून संपूर्ण महाराष्ट्राच्या सर्व जनतेचा प्रश्न आहे. एक दुसऱ्याच्या सलोख्याचा प्रश्न आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले यांचा महाराष्ट्र आहे ही गोष्ट खरी आहे. या महाराष्ट्रात अशा प्रकारची घटना घडल्यामुळे त्याचे पडसाद उमटले. औरंगाबादमध्ये, नांदेडमध्ये, मुंबईमध्ये पडसाद उमटले. त्या ठिकाणी जाळपोळ झाली. महाराष्ट्र राज्याचे पाच हजार कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे. म्हणून मी आपल्याला विनंती करतो की, सभागृहाचे आजचे सर्व कामकाज स्थगित करुन या चर्चेला अनुमती द्यावी आणि ही चर्चा सुरु करावी.

...2...

RDB/ SBT/ MHM/

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या सदनाचे माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी सभागृहाचे आजचे सर्व कामकाज बाजूला सारुन, प्रश्नोत्तराचा तास बाजूला ठेवून दलितांवर झालेल्या अत्याचाराची चर्चा प्रथम घ्यावी अशी विनंती करण्यासाठी एक प्रस्ताव मांडलेला आहे. हा प्रस्ताव मांडत असताना त्यांनी अतिशय थोडक्यात हा प्रस्ताव प्रथम का घ्यावा यासंबंधी विश्लेषण केले आहे. सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी त्याला पाठिंबा दिलेला आहे. अन्य सन्माननीय सदस्यांनीही पाठिंबा दिलेला आहे. आमचाही या चर्चेला पाठिंबा आहे तो अशासाठी की, या एका घटनेमुळे माणुसकीला काळिमा लागला. स्वातंत्र्य मिळून 60 वर्षे झाल्यानंतर महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारची घटना घडणे ही गोष्ट खरोखरच महाराष्ट्राला काळिमा लावणारी आहे. माणुसकीला काळिमा याचा अर्थ प्रथम या शासनाला काळिमा आणि नंतर या महाराष्ट्राला काळिमा असा होतो. हे प्रकरण कशा पध्दतीने हाताळले गेले या सर्व गोष्टी विस्ताराने सांगण्याची आवश्यकता आहे. या गोष्टी चर्चेच्या वेळी बोलता येतील. ही महत्वाची चर्चा घेण्याच्या संदर्भात मी दोन मुद्दे मांडणार आहे. पहिला मुद्दा असा की, अशा प्रकारची घटना महाराष्ट्रामध्ये कधी होऊच नये यादृष्टीकोनातून प्रतिबंधात्मक कोणत्या कारवाया केल्या जाव्यात यासंबंधीच्या सूचना सन्माननीय सदस्यांनी कराव्यात. दुसरा मुद्दा असा की, भविष्यामध्ये असा प्रकार कधीही घडणार नही असे आश्वासन महाराष्ट्र सरकारने द्यावे आणि जर अशा प्रकारचे प्रकरण घडले तर त्यावर इलाज करताना जातपात न बघता अतिशय नि:पक्षपातीपणे त्याचा तपास करुन त्याची चौकशी करुन जे गुन्हेगार असतील त्यांना योग्य ते शासन केले जावे, हा या पाठीमागचा मूळ उद्देश आहे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर सरपोतदार...)

या प्रकरणच्या मुळाशी खरी कारणे काय आहेत हे जनतेसमोर अद्याप स्पष्टपणे आलेले नाही ते येण्याची आवश्यकता आहे. या सर्व प्रकरणावर स्पष्ट प्रकाश पडावा आणि सर्व बाजू जनतेसमोर यावी आणि गुन्हेगारांना जास्तीत जास्त कडक शिक्षा व्हावी या उद्देशाने ही चर्चा मागितलेली आहे. या चर्चेच्या संबंधातील सर्व प्रस्ताव स्वीकारुन ही चर्चा सदनामध्ये घडवून आणावी आणि महाराष्ट्र शासनाने त्याबाबतीत कारवाई करावी. गृह खात्याने त्याबाबतीत किती चूक केलेली आहे ? यामागे खरोखर नक्षलवादी चळवळीचा भाग आहे काय ? असेल तर तो कसा आहे ? हे सिध्द करण्याची जबाबदारी शासनाची आहे. नसेल तर आरोप का केले ? हे शासनाला सांगावे लागेल. हा मुद्दा कदाचित आला नसता आणि चर्चेचा प्रश्नही उपस्थित झाला नसता. परंतु या प्रश्नाला निराळा संदर्भ दिला गेला परिणामी आंदोलन निर्माण झाले अशी आमच्या सारख्यांची भावना आहे. याबाबतीत शासनाने भूमिका स्पष्ट करावी. या उद्देशाने मी ही सूचना केलेली आहे. माननीय सभापती महोदयांना माझी विनंती आहे की, त्यांनी आमचा प्रस्ताव स्वीकारावा आणि चर्चेला सुरुवात करावी.

**सभापती** : या ठिकाणी नियम 289 अन्वये दोन प्रस्ताव आलेले आहेत. या संदर्भात मी जास्त काही बोलत नाही. या प्रस्तावाच्या माध्यमातून सभागृहासमोर आलेला विषय अत्यंत गंभीर आणि दुर्दैवी आहे. तसे म्हटले तर आपल्या सर्वांच्या चिंतेचा हा विषय आहे. हरिजन बांधवाच्या अत्यंत क्रूरपणे झालेल्या हत्येचा हा विषय आहे. तेव्हा नियम 289च्या बाबतीत मी कोणताही तांत्रिक मुद्दा उपस्थित करीत नाही. शासनाचे या विषयाच्या संदर्भात काय मत आहे हे विचारात घेऊन मी माझा निर्णय देतो.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, आजचे शासकीय कामकाज स्थगित करण्यास शासनाची मान्यता आहे. परंतु माझी एक विनंती आहे. खालच्या सभागृहामध्ये शोकप्रस्ताव दाखविण्यात आलेला आहे. या ठिकाणी देखील शोकप्रस्ताव आहे. शोकप्रस्ताव लवकर आवरावा. खालच्या सदनामध्ये याच विषयाच्या संदर्भातील चर्चेला उत्तर द्यावे, असे मला निदेश देण्यात आलेले असल्यामुळे तेथे मला उत्तर द्यावे लागेल. दोन्ही सभागृहामध्ये चर्चेच्या वेळा ॲडजस्ट केल्या तर दोन्ही सदनामध्ये मला उत्तर देता येईल. अन्यथा राज्यमंत्र्यांना या सभागृहामध्ये उत्तर द्यावे लागेल.

**सभापती** : या प्रस्तावाच्या अनुषंगाने माझा निर्णय असा आहे की, मी नियम 93 अन्वये अडीच तासाच्या चर्चेला मान्यता दिलेली आहे. या चर्चेनंतर याबाबतीत कोणतेही मतदान होणार नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(माननीय सभापती...(

माननीय उप मुख्यमंत्री आणि सदनाचे नेते श्री. आर.आर.पाटील यांनी शोकप्रस्तावाच्या संदर्भात सूचना केलेली आहे. माझ्या दालनामध्ये सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार आणि अन्य सहकारी उपस्थित होते, त्यांनी देखील याबाबतीत सूचना केली होती म्हणून मी शोकप्रस्तावाला संमती देत आहे.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, शोकप्रस्ताव नंतर घेता येईल. आधी महत्वाच्या विषयावर चर्चा व्हावयास पाहिजे.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, याबाबतीत मी माझा निर्णय दिलेला आहे. आता शोकप्रस्ताव घेण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, शोकप्रस्तावाच्या संदर्भात मला सूचना करावयाची आहे. ज्यांनी गेली 10 वर्षे खालच्या सभागृहामध्ये प्रभावीपणे काम केले, जे स्वातंत्र्य सेनानी आणि महाराष्ट्राला दिशा देणारे असे व्यक्तिमत्व होते, असे श्री. बाळासाहेब भारदे यांच्या नावाचा उल्लेख शोकप्रस्तावामध्ये व्हावा.

डॉ. पतंगराव कदम : सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी केलेल्या सूचनेला आम्ही अनुमोदन देतो.

**सभापती** : सभागृहाच्या नेत्यांनी शोकप्रस्ताव मांडावा.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: शोक प्रस्ताव

**मु.शी.**: सर्वश्री वसंतराव रघुनाथ पटवर्धन, पुंडलिक गणपतराव भानारकर, दशरथ हिरामण तायडे व संभाजीराव मारोतराव थोरात, माजी वि.प.स.तसेच कै.त्र्यंबक शिवराम उर्फ बाळासाहेब भारदे, माजी विधानसभा अध्यक्ष, श्री.बिस्मिल्ला खान, प्रख्यात सनईवादक यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव.

श्री.आर.आर.पाटील (उपमुख्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री वसंतराव रघुनाथ पटवर्धन, पुंडलिक गणपतराव भानारकर, दशरथ हिरामण तायडे, संभाजीराव मारोतराव थोरात, माजी वि.प.स.तसेच कै.त्र्यंबक शिवराम उर्फ बाळासाहेब भारदे, माजी विधानसभा अध्यक्ष, श्री.बिस्मिल्ला खान, प्रख्यात सनईवादक यांच्या दुःखद निधनाबद्दल मी खालील शोक प्रस्ताव मांडतो.

" सर्वश्री वसंतराव रघुनाथ पटवर्धन, पुंडलिक, गणपतराव भानारकर, दशरथ हिरामण तायडे, संभाजीराव मारोतराव थोरात, माजी वि.प.स.तसेच कै.त्र्यंबक शिवराम उर्फ बाळासाहेब भारदे, माजी विधानसभा अध्यक्ष, श्री.बिस्मिल्ला खान, प्रख्यात सनईवादक यांच्या दुःखद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दुःख व्यक्त करते."

सभापती महोदय, कै.वसंतराव रघुनाथ पटवर्धन यांचा जन्म 5 मार्च, 1932 रोजी ठाणे येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.ए., बी.कॉम., जी.सी.डी.पर्यंत झाले होते.

कै.पटवर्धन यांनी सुरुवातीस काही काळ नोकरी केली व नंतर त्यांनी जनसंघाच्या कार्यास वाहून घेतले. जनसंघाचे ठाण्याचे प्रमुख व तद्नंतर भारतीय जनता पक्षाचे कोषाध्यक्ष म्हणून त्यांनी कार्य केले.

कै.पटवर्धन हे रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे कार्याध्यक्ष, जनकल्याण सहकारी बँक व प्रगती प्रतिष्ठानचे संस्थापक होते. अरविंद स्मृती संस्थेच्या स्थापनेतही त्यांचा मोठा सहभाग होता. मुकबधिर मुलांच्या शाळा व वसतीगृहांची सोय त्यांनी केली. आदिवासी बांधवांच्या कल्याणासाठी त्यांनी सतत प्रयत्न केले.

कै.पटवर्धन यांनी "जनसंघ ते भाजपा" व "संघटनेचे शिल्पकार" या दोन पुस्तकांचे संपादन केले. एक अभ्यासू व सेवाभावी वृत्तीचे राजकीय व्यक्तिमत्व म्हणून त्यांची ख्याती होती.

कै.पटवर्धन 1988 मध्ये कोकण विभाग पदवीधर मतदारसंघातून महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

04-12-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) F.2

SGB/ SBT/ MHM/ 13:25

श्री.आर.आर.पाटील.............

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे शुक्रवार, दिनांक 22 सप्टेंबर, 2006 रोजी दु:खद निधन झाले.

कै.पुंडलिक गणपतराव भानारकर यांचा जन्म 1 जुलै, 1924 रोजी नागपूर येथे झाला. त्यांचे शिक्षण मॅट्रिकपर्यंत झाले होते.

कै.भानारकर यांनी नागपूर शहर कॉंग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य हातमाग मंडळ व विदर्भ गृहनिर्माण मंडळाचे सदस्य, जागृतेश्वर हातमाग विणकर सहकारी संस्थेचे अध्यक्ष तसेच, नागपूर येथील हिंदुस्थान विद्यामंडळाचे अध्यक्ष म्हणून कार्य केले.

कै.भानारकर 1971 व 1974 असे दोन वेळा महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते.

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे शुक्रवार दिनांक 29 सप्टेंबर, 2006 रोजी दु:खद निधन झाले.

कै.दशरथ हिरामण तायडे यांचा जन्म 20 जानेवारी 1927 रोजी जळगाव जिल्ह्यात यावल तालुक्यातील चितोडे येथे झाला. त्यांचे शिक्षण सातवीपर्यंत झाले होते.

कै.तायडे यांनी स्वातंत्र्य लढ्यात भाग घेऊन कारावास सोसला होता. संयुक्त महाराष्ट्र चळवळ व गोवा मुक्ती आंदोलनात त्यांनी भाग घेतला होता. प्रथम कॉंग्रेस, कम्युनिस्ट व नंतर शेतकरी कामगार पक्षात त्यांनी काम केले. जळगाव जिल्हा शेतकरी कामगार पक्षाचे चिटणीस, अट्रावल ग्रामपंचायतीचे सरपंच तसेच, जळगाव जिल्हा लोकल बोर्डाचे सदस्य म्हणून त्यांनी कार्य केले.

कै.तायडे यांनी अखिल भारतीय कोळी परिषदेचे जळगाव विभागाचे महासचिव तसेच, महाराष्ट्राचे उपाध्यक्ष व मुंजोबा देवस्थानचे ट्रस्टी म्हणून कार्य केले.

कै. तायडे 1970 मध्ये महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारे विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते.

अशा या समाजसेवकाचे रविवार दिनांक 19 नोव्हेंबर 2006 रोजी दु:खद निधन झाले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कै. संभाजीराव मारोतराव थोरात यांचा जन्म 15 जुलै 1918 रोजी सातारा जिल्ह्यात कारवे येथे झाला. त्यांचे शिक्षण मॅट्रिकपर्यंत झाले होते.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील..............

कै. थोरात यांनी स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला होता. कारवे ग्रामपंचायतीचे सदस्य, जिल्हा लोकल बोर्डाचे सदस्य, कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे संचालक व कराड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सदस्य म्हणून त्यांनी कार्य केले.

कै. थोरात 1957 व 1964 असे दोन वेळा महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारे विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते.

अशा या समाजसेवकाचे शुक्रवार दिनांक 24 नोव्हेंबर 2006 रोजी दु:खद निधन झाले.

मरहुम बिस्मिल्ला खान यांचा जन्म 21 मार्च, 1916 रोजी बिहार राज्यातील धुमरांन येथे झाला.

मरहुम खान हे भारतातील एक महान संगीतकार होते. प्रचंड साधना व रियाझ यांच्या सहाय्याने आपल्या एकट्याच्या ताकदीवर गेली सात दशके सनईच्या मंगल सुरांनी जगभरातील रसिकांना त्यांनी मंत्रमुग्ध केले. सनईसारख्या पारंपारिक भारतीय वाद्याला आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर त्यांनी मोठी प्रतिष्ठा मिळवून दिली. सनई वादनाला त्यांनी लोकमान्यता व राजमान्यता मिळवून दिली. देशाच्या सांस्कृतिक एकात्मतेचे ते प्रतीक होते. भारताच्या सांस्कृतिक चळवळीची त्यांनी मनोभावे सेवा केली. भारतीय शास्त्रीय संगीतातील त्यांचे स्थान अढळ आहे.

मरहुम खान यांनी आपल्या सनई वादनाला विशिष्ट साच्यात ठेवले नाही. शास्त्रीय संगीतातले ख्याल, ठुमरी व कजरी इत्यादी लोकसंगीत प्रकार आपल्या सनईने त्यांनी सर्वदूर पसरविले. जगभरातील अनेक देशात सनई वादनाच्या मैफली त्यांनी गाजविल्या व अनेक सन्मान प्राप्त केले. संगीत नाटक अकादमी अवॉर्ड, नेपाळ अकादमी अवॉर्ड, शांतीनिकेतन विद्यापीठाची सन्माननीय डॉक्टरेट, तानसेन अवॉर्ड असे अनेकविध सन्मान त्यांनी प्राप्त केले. भारत सरकारने संगीताच्या क्षेत्रातील त्यांचे मोठे योगदान विचारात घेऊन पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण व सर्वोच्च मानाचा "भारतरत्न" किताब प्रदान करुन त्यांना सन्मानित केले.

अशा या महान कलावंताचे सोमवार, दिनांक 21 ऑगस्ट, 2006 रोजी दु:खद निधन झाले.

कै. त्र्यंबक शिवराम उर्फ बाळासाहेब भारदे यांचा जन्म 25 मे 1914 रोजी अहमदनगर जिल्ह्यात शेवगाव तालुक्यातील मीरी येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.ए., एलएल.बी. पर्यंत झाले होते.

कै. भारदे यांनी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेऊन कारावास सोसला होता. ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत, महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, धार्मिक, अध्यात्मिक आणि अन्य विधायक क्षेत्रांतील एक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

04-12-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) F.4

SGB/ SBT/ MHM/ 13:25

श्री.आर.आर.पाटील.............

ज्ञानयोगी, प्रज्ञावंत, प्रभावी वक्ते व एकूणच ऋषितुल्य व्यक्तिमत्व म्हणून सर्व महाराष्ट्राला ते सुपरिचित होते. रसाळ किर्तनकार व प्रवचनकार या नात्याने समाजप्रबोधनाचे कार्य त्यांनी अखंडपणे केले. सरस्वतीच जणू त्यांच्या जिभेवर होती. प्रतिभेचे लेणे त्यांना लाभलेले होते.

कै. भारदे यांनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे चिटणीस, शेवगावचे सरपंच, जिल्हा स्कूल व लोकल बोर्डाचे सदस्य तसेच, राज्यस्तरीय एकात्मता समिती, किर्तन परिषद, कुष्ठरोग निवारण समिती, नशाबंदी मंडळ, निसर्गोपचार विद्यापीठ, गांधी स्मारक निधी, हरिजन सेवक संघ व गांधी दर्शन अकादमी या संस्थांचे अध्यक्षपद भूषविले होते.

कै. भारदे सिध्दहस्त लेखकही होते. **"गांधी विचार मिमांसा"**, **"संतबोध"**, **"आदर्श ग्रामक्रांती"**, **"राष्ट्रीय एकात्मता आणि मूलतत्ववाद"** अशी अनेक पुस्तके त्यांनी लिहिली. **"संघशक्ती"** या वृत्तपत्राचे संपादक म्हणूनही त्यांनी कार्य केले. भारत सरकारने **"पद्मभूषण"** पुरस्कार प्रदान करुन त्यांना गौरविले होते.

कै. भारदे 1952, 1957, 1962 व 1967 असे सलग चार वेळा विधानसभेवर निर्वाचित झाले होते. 1957 ते 1962 या काळात राज्याचे सहकार मंत्री म्हणून त्यांनी मोलाचे कार्य केले. 1962 ते 1972 अशी सलग दहा वर्षे विधानसभेचे अध्यक्षपद भूषवून त्यांनी फार मोठे योगदान दिले आहे. महाराष्ट्र विधिमंडळाच्या इतिहासातील एक मानदंड अशीच त्यांची सदैव नोंद राहील.

अशा या ज्येष्ठ गांधीवादी विचारवंताचे व प्रज्ञावंताचे बुधवार दिनांक 22 नोव्हेंबर 2006 रोजी दु:खद निधन झाले.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील ....

सभापती महोदय, ज्यांनी महाराष्ट्रामध्ये लोकशाहीची प्रदीर्घ काळ सेवा केली असे खालच्या सदनाचे माजी अध्यक्ष कै.बाळासाहेब भारदे यांनी शेवटच्या क्षणापर्यंत महाराष्ट्रची प्रदीर्घ सेवा केलेली आहे, महत्वपूर्ण भूमिका बजावलेली आहे. कै. बाळासाहेब भारदे यांनी ग्रामीण भागातील कार्यकर्ता म्हणून महत्वपूर्ण भूमिका बजावलेली आहे. 1957 ते 1962 या काळात राज्याचे सहकार मंत्री म्हणून त्यांनी मोलाचे कार्य केलेले आहे. त्यांनी सहकार मंत्री म्हणून खादीचे योगदान दिलेले आहे. राज्य सहकार विषयक धोरणाला त्यांनी दिशा देण्याचे काम केलेले आहे. 1962 ते 1972 अशी सलग दहा वर्षे विधानसभेचे अध्यक्षपद भूषवून त्यांनी फार मोठे योगदान दिलेले आहे.

अशा या ज्येष्ठ गांधीवादी विचारवंताचे व प्रज्ञावंताचे बुधवार दिनांक 22 नोव्हेंबर, 2006 निधन झाले. त्यामुळे या सदनाने त्यांच्या निधना संदर्भात शोकप्रस्ताव पारित करावा अशी मी विनंती करतो.

--------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ( विरोधीपक्ष नेता ) : या सदनाचे नेते माननीय अआर.आर.पाटील साहेबांनी जो शोकप्रस्ताव मांडलेला आहे त्याला समर्थन देण्याकरिता मी उभा आहे. या ठिकाणी जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्यामध्ये सर्वश्री वसंतराव रघुनाथ पटवर्धन, पुंडलिक गणपतराव भानारकर, दशरथ हिरामण तायडे व संभाजीराव मारोतराव थोरात, माजी वि.प.स. तसेच श्री. बिस्मिल्ला खान, प्रख्यात सनईवादक यांच्या दुःखद निधनाच्या संबंधी त्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या त्या भावनाशी मी पूर्णपणे सहमत आहे. त्याच बरोबर खालच्या सभागृहाचे ज्यांनी दहा वर्षे अध्यक्ष म्हणून स्थान भूषविले, त्यांनी स्वातंत्र्य सेनानी म्हणून महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात प्रवचन, मार्गदर्शन आणि दिशा देण्याचा काम काम केलेले आहे. त्यांची एकंदर वागणूक कॉग्रेसी कार्यकर्ता कसा असू शकतो हे त्यांनी आपल्या वागणूकीतून, आदर्शातून, राजकारणाला अध्यात्माची जोड दिलेली होती. त्यांनी महाराष्ट्राला सतत मार्गदर्शन केलेले आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी कै. बाळासाहेब भारदे यांच्याबद्दल जे विचार व्यक्त केलेले आहेत त्याला समर्थन देतो.

कै. वसंतराव रघुनाथ पटवर्धन यांच्याबरोबर मला 30 वर्षे काम करण्याची संधी मिळालेली आहे. त्यांनी राष्ट्रीय स्ययंसेवक संधाचे स्वयंसेवक म्हणून काम केलेले आहे. त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केल्यानंतर कुटुंबाच्या उदरभरणासाठी सुरुवातीला नोकरी हा पेशा पत्करला होता परंतु 3-4 वर्षात त्यांनी भारतीय जनता पार्टी म्हणजे त्यावेळचा जनसंघाच्या कामामध्ये स्वतःला पूर्णपणे कार्यकर्ता म्हणून वाहून घेतले. त्यावेळी त्यांनी नोकरी सोडून पूर्णवेळ कार्यकर्त्याचे काम करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी भारतीय जनसंघ आणि भारतीय जनता पार्टीला नावारुपाला आणण्याचे काम केलेले आहे. आणीबाणीच्या काळात त्यांनी पक्षाच्या पालकत्वाचे काम केलेले आहे. आणीबाणीमध्ये लाखो लोकांना अटक झाली होती त्या काळात भारतीय जनसंघ आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघातील कार्यकर्त्यांना देखील अटक करण्यात आली होती. अशा परिस्थितीत बाहेर राहून त्यांनी पक्षाचे पालकत्व संभाळून पक्षाला पुढे आणण्याचे काम केलेले आहे. त्यांनी भारतीय जनसंघ आणि भारतीय जनतापक्षाचे कोषाध्यक्ष म्हणून जबाबदारी पार पाडलेली आहे.

यानंतर श्री. अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

कोणत्याही राजकीय पक्षास काम करण्यासाठी निधीची आवश्यकता असते. परंतु त्यांनी हा निधी कोणत्याही उद्योगपतींकडून न जमविता ग्रामीण भागात स्वत: सायकलीवरुन प्रवास करुन जमा केला आणि पक्षास शक्ती आणि ताकद देण्याचा प्रयत्न केला. सभापती महोदय, राजकारणात काम करताना त्यास राजकीय रचनात्मक कामाची जोड असली पाहिजे. कै.पटवर्धन यांनी ठाणे जिल्ह्यातील वाडा, मोखाडा, जव्हार, शहापूर, मनोर, विक्रमगड या आदिवासी भागात त्यांनी रचनात्मक काम केले आहे. या परिसरातील मूक-बधीर, आदिवासी मुलांना शिक्षित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्या परिसरात छोटे छोटे लघुउद्योग सुरु करण्यासाठी जंगलातील वनस्पतीपासून काही वस्तू तयार करुन त्या मार्केटमध्ये विकून त्याठिकाणच्या कलाकारांना हात देण्याचा प्रयत्न केला. त्यांनी आदिवासी लोकांसाठी आपल्या आयुष्याची 25-30 वर्षे खर्ची घातली.

सभापती महोदय, मी पार्लमेंट बोर्डामध्ये काम करीत होतो. मला चांगले आठवते की, सन 1988 मध्ये कोकण पदवीधर पदाची निवडणूक आली होती. त्यावेळी पक्षाने असा निर्णय घेतला की, यावेळी या मतदार संघातून श्री.वसंतराव पटवर्धन यांना उभे करायचे. सुरुवातीला त्यांनी स्पष्ट सांगितले की, ते निवडणुकीला उभे राहणार नाहीत. परंतु त्यांना पक्षाने आदेश दिल्यानंतर ते निवडणुकीस उभे राहिले आणि निवडून आले. त्यांनी आमदारकीच्या कार्यकाळात वनवासी भागात जास्त काम केले. त्यांची टर्म संपल्यानंतर त्यांना पक्षाने पुन्हा तिकिट दिले. यावेळी त्यांनी स्पष्ट शब्दात नकार दिला. त्यांनी सांगितले की, आता मी आमदार होणार नाही,पक्षाचे काम करीत राहणार. ज्या माणसाने आपल्या आयुष्याची 50-55 वर्षे सामाजिक कार्यासाठी खर्ची घातली ते श्री.वसंतराव पटवर्धन यांचे दिनांक 22 सप्टेंबर, 2006 रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या निधनाने आमच्या पक्षाचे आणि महाराष्ट्राचे देखील नुकसान झालेले आहे. मी त्यांना माझ्यातर्फे आणि माझ्या पक्षाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, सनई सम्राट बिस्मिल्ला खान यांचे दिनांक 21 ऑगस्ट 2006 रोजी वाराणसी येथे निधन झाले. त्यांच्या निधनाने शास्त्रीय संगीतातील सनई सम्राट काळाच्या पडद्याआड गेला. आपल्या कर्णमधुर सनई सुरांनी त्यांनी गेली कित्येक वर्षे रसिकांना मंत्रमुग्ध केले होते.

सनई वादनात आपले प्राण ओतून वातावरण भारुन टाकण्याची क्षमता त्यांच्यात होती. सनई वादनाची सर्व वैशिष्टये त्यांनी आत्मसात केली होती.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

बिहारमधील डुमरा या छोटयाशा संस्थानात दिनांक 21 मार्च 1916 रोजी जन्मलेल्या बिस्मिल्ला खान यांनी नामा खान बक्ष अल्लीबक्ष यांच्याकडून सनई वादनाचे धडे घेतले. वाराणसीच्या विश्वनाथ मंदिरात सनई वादन करण्याची परंपरा त्यांनी दीर्घकाळ सुरु ठेवली. केवळ काशी विश्वनाथ नव्हे तर तिरुपती बालाजी मंदिरापासून पंढरपूरच्या विठ्ठलापर्यंत देशाच्या कानाकोपऱ्यातील अनेक मंदिरात त्यांनी आपल्या सनई वादनाचे सूर उमटविले. वाराणशीत असताना गंगा मैय्याच्या काठावर बसून ते आपल्या सनई वादनाचा रियाज करीत असत.

सन 1938 मध्ये आकाशवाणीवर सनईचे सूर अगदी पहिल्यांदा ऐकू आले ते बिस्मिल्ला खान यांचेच. तथापि, त्यांच्या जीवनातील सुवर्णक्षण म्हणजे भारताच्या पहिल्या स्वातंत्र्यदिनी 15 ऑगस्ट 1947 रोजी बिस्मिल्ल खान यांच्या शहनाईच्या स्वर्गीय सुरांच्या तालावर भारताचा तिरंगा संसदेत फडकला. पुढे 26 जानेवारी 1950 या पहिल्या प्रजासत्ताकदिनी उस्तादांच्या शहनाईचे मंजूळ स्वर लाल किल्ल्यावर देखील घुमले. भारत सरकारने संगीताच्या क्षेत्रातील त्यांचे मोठे योगदान विचारात घेऊन पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण व सर्वोच्च मानाचा "भारतरत्न" किताब प्रदान करुन त्यांना सन्मानित केले. त्यांच्या निधनाने आपल्या देशाचे फार मोठे नुकसान झालेले आहे. पुन्हा असा सनई वादक निर्माण होईल की नाही असे वाटते. एका चांगल्या कलाकाराचे दिनांक 21 ऑगस्ट 2006 रोजी दुखःद निघन झाले. मी त्यांना माझ्यातर्फे आणि माझ्या पक्षातर्फे त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, श्री.त्र्यंबक शिवराम उर्फ बाळासाहेब भारदे हे या सदनाचे सदस्य नव्हते. परंतु महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष पद सलग दहा वर्षे भूषवून त्यांनी फार मोठे योगदान दिलेले आहे. आपल्या आयुष्यातील 60 वर्षे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात फिरुन त्यांनी ग्रामीण भागातील माणूस केंद्र बिंदू मानला.

यानंतर श्री.पुरी....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

आणि त्या माणसाला जागृत करुन, त्याला उठविण्याचे काम बाळासाहेब भारदे यांनी केलेले आहे. त्यामुळे या महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये त्यांचा फार मोठा सिंहाचा वाटा असून महाराष्ट्रातील जनता हे कदापि विसरु शकत नाही. ते जरी खालच्या सभागृहातील सदस्य राहिले असले तरी एकंदर विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये त्यांना आदरांजली अर्पण करण्याची आवश्यकता असून त्यामुळेच याठिकाणी आम्ही ही सूचना केलेली आहे. या प्रस्तावास मी पाठिंबा देतो.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा ) : सभापती महोदय, या सदनाचे नेते माननीय श्री.आर.आर.पाटील यांनी जो शोक प्रस्ताव याठिकाणी आणलेला आहे, त्यास पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. माझ्या पक्षातर्फे मी या प्रस्तावास पाठिंबा देतो.

सभापती महोदय, कै.वसंतराव रघुनाथ पटवर्धन यांचा जन्म आणि त्यांचे निधन या दोन्ही गोष्टी महाराष्ट्राला थोडयाशा चटकाच लावून गेल्या. सार्वजनिक जीवनामध्ये स्वत:चे जीवन वाहून, सर्वप्रकारचा त्याग करुन केवळ समाजाला दिशा मिळावी या दृष्टीने समाजामध्ये आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणारी, आपल्या पक्षाला बलवान, सामर्थ्यवान करणारी जी माणसे आहेत त्यामध्ये कै.वसंतराव पटवर्धन यांचे स्थान खूप मोठे आहे. माझा आणि त्यांचा चांगला परिचय होता. सार्वजनिक क्षेत्रामध्ये काम करताना अशा थोर माणसांच्या भेटी होऊन त्या चिरंतन काळ टिकतात. त्यांच्या कर्तृत्वाबद्दल आताच माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी माहिती दिलेली आहे. प्रामुख्याने कै.वसंतराव पटवर्धन यांनी जे काम केले ते खरोखरच कौतुकास्पद होते. एकदा पाठिंबा दिल्यानंतर आमदार पदाची किंवा इतर कोणत्याही पदाची अपेक्षा न करता त्यांनी आपला पक्ष भविष्यामध्ये कसा बलवान व सामर्थ्यवान होईल यादृष्टीने सतत काम केले. सुरुवातीला त्यांनी जनसंघामध्ये कार्य केले व नंतर भारतीय जनता पक्षाचे ते सदस्य म्हणून कार्यरत राहिले. त्यांच्यामुळे एकप्रकारे भारतीय जनता पक्षाला मोठी ताकद मिळाली. अशाप्रकारच्या त्यागमूर्ती झ ााल्यामुळेच भारतीय जनता पक्षाला फार मोठे स्थान आपल्या देशात मिळाले. परिणामी, भारतीय जनता पक्षाला सत्तेमध्ये येण्याची संधी प्राप्त झाली. सत्तेमध्ये असताना पाठीमागे राहून त्यांनी मार्गदर्शन करण्याचे कार्य अतिशय कौशल्याने केले. सूत्र संचालन करणे, योग्य मार्गदर्शन करणे, कोणत्या विभागामध्ये कुठल्या कार्यकर्त्याचे बळ अधिक आहे याचा बरोबर अंदाज घेऊन योग्य ती माहिती वरिष्ठापर्यंत पोहचविणे हे अतिशय चांगल्या प्रकारचे काम त्यांनी आयुष्यामध्ये केलेले आहे. असे कार्य करत असतानाच शुक्रवार, दिनांक 22 सप्टेंबर, 2006 रोजी ते आपल्यातून निघून गेले. ते या सदनामध्ये दोनवेळा निवडून आले होते, त्यामुळे त्यांना या सदनामध्ये श्रध्दांजली वाहणे हे अगदी योग्य आणि उचितच आहे.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...........

कै.पुंडलिक गणपतराव भानारकर यांचा जन्म 1 जुलै 1924 रोजी नागपूर येथे झाला. नागपूर येथे हिवाळी अधिवेशन संपन्न होत असतांनाच श्रध्दांजली वाहण्याचा प्रसंग आज येतो आहे, हा एक योग आहे. हा योग म्हणजे त्यांचे भाग्य आहे असे मी म्हणणार नाही. परंतु, ज्या गावामध्ये जन्म झाला त्याच गावामध्ये त्यांच्या कार्याची नोंद घेतली जात आहे आणि सार्वभौम अशा सभागृहात श्रध्दांजली वाहिली जात आहे, हा एक अनोखा प्रसंग आहे. हे एक प्रकारे त्यांच्या कर्तुत्वाला दाद दिल्यासारखेच आहे, असे मला वाटते. दिनांक 29 सप्टेंबर 2006 रोजी त्यांचे निधन झाले, त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खामध्ये आम्ही सहभागी आहोत. आपण जी श्रध्दांजली त्यांना वाहत आहोत, ज्या भावना व्यक्त करीत आहोत त्या त्यांच्या कुटुंबियांपर्यन्त पोहोचतील याविषयी माझ्या मनामध्ये संदेह नाही.

कै.दशरथ हिरामण तायडे यांचा जन्म दिनांक 20 जानेवारी 1927 रोजी जळगाव जिल्हयात यावल तालुक्यातील चितोडे या गावी झाला. त्यांचे जीवन चरित्र तपासले तर ते विविधांगी असे आहे. जळगाव जिल्हयामध्ये निरनिराळया पक्षात त्यांनी काम केले त्यामुळे असे दिसून येते की, त्यांनी विविध प्रकारचा अनुभव घेतला होता. त्यांनी एका गोष्टीचा ध्यास घेतला होता की, सार्वजनिक जीवनामध्ये काम करुन जनतेबरोबर रहावयाचे, जनतेला सहकार्य करावयाचे, त्यांचे प्रश्न सोडवावयाचे, शक्य होईल तेवढे मार्गदर्शन करावयाचे, राजकारणात 2 पावले मागे जाऊन सुध्दा जनतेचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करावयाचा, ही त्यांची भूमिका होती. या त्यांच्या कार्याची पोचपावती म्हणून सन 1970 मध्ये महाराष्ट्र विधानासभा सदस्यांव्दारा त्यांची विधान परिषदेवर नियुक्ती झाली होती. त्यांचा मृत्यु 19 नोव्हेंबर 2006 रोजी झाला. त्यांनाही मी या ठिकाणी श्रध्दांजली अर्पण करतो.

कै.संभाजीराव मारोतराव थोरात यांचा जन्म 15 जुलै 1918 रोजी सातारा जिल्हयातील कारवे येथे झाला. कै.थोरात यांनी स्वातंत्र्य लढयात भाग घेतला होता. कारवे ग्रामपंचायतीचे सदस्य, जिल्हा लोक बोर्डाचे सदस्य, कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे संचालक व कराड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सदस्य म्हणून त्यांनी काम केले होते. ही सर्व लोकशाहीची प्राथमिक क्षेत्र आहेत आणि या क्षेत्रातील अनुभव लक्षात घेऊनच सन 1957 व सन 1964 अशा दोन वेळा त्यांची

..2..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकरराव सरपोतदार..........

महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा विधानपरिषदेवर निवड झाली होती. त्यांनाही मी या ठिकाणी श्रध्दांजली वाहतो.

मरहुम बिस्मिल्ला खान यांच्या सनईचे सुर कानावर पडले की एक प्रकारचा आनंद मिळतो. त्यांच्या सनईचे सूर कानावर पडल्यानंतर माणूस दोन मिनिटे थांबतो आणि ते सुर ऐकतो. संपूर्ण देशामध्येच नव्हे तर जगामध्ये त्यांचे सनईवादन प्रचंड प्रमाणावर लोकप्रिय होते आणि त्या पाठीमागे त्यांची प्रचंड मेहनत होती. अशी सनई पुन्हा ऐकावयास मिळेल का ? असा प्रश्न मनामध्ये निर्माण झाल्यावाचून राहत नाही. अशी सनई वाजविण्यासाठी प्रचंड मेहनत करावी लागते, कष्ट करावे लागतात, हे साधे काम नाही. मरहुम बिस्मिल्ला खान यांचा एक कार्यक्रम हेमाजी क्लब येथे माननीय शिवसेनाप्रमुखांनी आयोजित केला होता व त्या कार्यक्रमास मी स्वत: उपस्थित राहिलो होतो.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार ...........

त्यांनी वाजविलेली सनई हृदयस्पर्शी होती. श्री.बिस्मिल्ला खान हे वयाच्या 88-89 व्या वर्षामध्ये देखील अतिशय अत्कृष्ट सनई वाजवू शकत होते. केवळ वयाकडे लक्ष न देता ते सनईचे सूर आणि ताल उत्कृष्ट पद्धतीने घेत असत. माणसाची ताकद आणि माणसाची बुद्धीमत्ता यांचा उत्कृष्ट मिलाप त्यांच्या सनई वादनातून दिसत होता. वाद्याच्याबाबतीत ते कधीही कमी पडले नाहीत. कौशल्यपूर्ण अशी सनई त्यांनी वाजवली आणि सर्वांची मने जिंकली. श्री.बिस्मिल्ला खान यांना प्रत्यक्ष समोर सनई वाजवितांना बघितले तर तो क्षण मनातून जाणे शक्य नाही. सामर्थ्य, कला यातून ती व्यक्ती किती मोठी आहे याचा अंदाज घेता येतो. श्री.बिस्मिल्ला खान यांना निरनिराळया प्रकारचे सन्मान देण्यात आले. या देशाने त्यांना पद्मश्री, पद्मभूषण आणि देशातील सर्वोच्च असा भारतरत्न पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला. एक सनई वादक देशाचा भारतरत्न बनतो यातच त्यांचा मोठेपणा आणि सामर्थ्य साठलेले आहे. मी त्यांना श्रद्धांजली अर्पण करतो.

महाराष्ट्र विधानसभेचे माजी अध्यक्ष श्री.बाळासाहेब भारदे हे 4 वेळा महाराष्ट्र विधानसभेवर निवडून आले होते. त्यानंतर त्यांनी स्वेच्छेने विधानसभेमध्ये येण्याचे बंद केले. सन 1964 मध्ये एक प्रसंग असा होता की, त्यावेळी मी बांद्रा (पूर्व) विभागामध्ये काम करीत होतो. त्यावेळी कोठे जावे कोणाडे न्याय मागावा असा माझ्यासमोर प्रश्न निर्माण झाला होता. माझ्या बरोबर अन्य पक्षाचे कार्यकर्ते देखील होते. आम्ही श्री.बाळासाहेब भारदे यांना भेटलो आणि त्यांना तक्रार सांगितली. त्यावेळी एका गोमातेची हत्या करुन तिच्या पोटातील वासरु बाहेर काढून त्याची जिभ बाहेर पडली होती. ही अतिशय हृदयद्रावक घटना होती. पोलिसांनी या घटनेकडे लक्ष दिले नव्हते. या घटनेमुळे श्री.बाळासाहेब भारदे यांचे मन द्रवले. त्यांनी पोलीस उपायुक्तांना बोलावून घेतले आणि या प्रकरणाची पूर्ण चौकशी करुन अहवाल देण्यास सांगितले. त्यावेळी श्री.बाळासाहेब देसाई गृहमंत्री होते. ते प्रकरण चांगल्या प्रकारे हाताळले गेले. ही आठवण माझ्या मनातून कधीही जाणे शक्य नाही. जेथे आवश्यक आहे तेथे मदत करणे, संपूर्ण महाराष्ट्रामध्ये निरनिराळया माध्यमातून किर्तन, प्रवचन, सभासम्मेलन भरवून त्यांनी समाजाला प्रबोधन करण्याचे काम केले. चांगला समाज निर्माण करतांना जाती जातीमध्ये वैमनस्य नसावे याचे हे एक अतिशय उत्तम उदाहरण आहे.

...2/-



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार .........

अशी व्यक्ती भविष्यकाळात सापडणे कठीण आहे. मध्यंतरी ते विधानसभेमध्ये आले होते. त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पुस्तक प्रकाशन झाले हाते. त्यावेळी त्यांचे वय 90 वर्षे होते. त्यांचा मृत्यू झाला त्यावेळी त्यांचे वय 92 वर्षे होते. त्यांना प्रदीर्घ आयुष्य लाभले होते. ते चंदनासारखे झिजले आणि त्याचा गंध संपूर्ण महाराष्ट्रामध्ये दरवळत ठेवला. मला असे वाटत होते की, त्यांना श्रध्दांजली वाहल्यानंतर सभागृहाचे काम स्थगित ठेवून त्यांच्या कार्याची पावती त्यांना देण्यात येईल.

यानंतर श्री.सुंबरे ..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सरपोतदार ...

आज सकाळी माननीय सभापतींबरोबर या संबंधात चर्चा झाली तेव्हा असे लक्षात आले की, आपल्या पुढील इतर कामांना न्याय देण्यासाठी म्हणून आपल्याला श्रद्धांजली अर्पण केल्यानंतर संपूर्ण दिवसासाठी सभागृहाची बैठक स्थगित करता येणार नाही. अर्थात मी देखील माझ्या जीवनामध्ये कामांना नेहमीच अधिक महत्त्व देत असतो, भावनेपेक्षा काम अधिक महत्त्वाचे मानीत आलो आहे. भावनांना जास्त प्राधान्य दिले तर काय होते हे गेल्या काही दिवसांत या राज्यामध्ये घडलेल्या घटनांवरून आपल्याला दिसते आहेच. तेव्हा भावनांपेक्षा कामांना अधिक महत्त्व देणे अगत्याचे आहे यात शंका नाही. म्हणून हा शोक प्रस्ताव मांडल्यानंतर या प्रस्तावाच्या माध्यमातून आपण आपल्या भावना शोकाकूल कुटुंबियांपर्यंत पोहोचवू या एवढेच मला या ठिकाणी सांगावयाचे आहे. धन्यवाद.

****

....एल 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी. देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : माननीय सभापती महोदय, या सभागृहाचे नेते सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी मांडलेल्या शोकप्रस्तावावर माझ्या सहभावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. सन्माननीय श्री.बाळासाहेब भारदे, माजी विधानसभाध्यक्ष, यांच्या दु:खद निधनाने पीठासीन अधिकाऱ्यांच्या परंपरेतील एक तेजस्वी तारा निखळून पडलेला आहे. आपल्या विधीमंडळाला पीठासीन अधिकाऱ्यांची एक फार मोठी परंपरा लाभली आहे. त्यामध्ये श्री.बाळासाहेब भारदे यांनी विशेष भूमिका बजावली आहे. लोकप्रतिनिधी आणि सभागृहामध्ये काम करणाऱ्या उभय बाजूच्या सदस्यांना त्यांनी जे मार्गदर्शन केले आहे ते दीर्घकाळ टिकाऊ अशा स्वरूपाचे राहील. ते विशिष्ट विचार घेऊन आपला प्रवास करीत राहिले आणि स्वेच्छेने जेव्हा त्यांना वाटले की, आता लोकप्रतिनिधी म्हणून काम करण्याची आपली वेळ संपलेली आहे तेव्हा त्यांनी विधायक कार्याकडे आपले लक्ष वळविले आहे. त्यांच्या एकूण कामाकडे पाहू गेल्यास त्यांनी आपल्या सबंध आयुष्यभर विचाराला धरून प्रवास केला. बोलताना आपल्या डोळ्यांच्या भुवया उंचावून बोलण्याची त्यांची पद्धत मी अनेकदा पाहिली आहे. बोलताना डोळ्यांच्या भुवया अशा उडवायचे की त्या खाली करताना समोरच्यांना ते आपल्या मनात सामावून घेत आहेत असे वाटावे. समोरच्या माणसाच्या अंत:करणाला त्यांचे बोलणे भिडावयाचे. भुवया उडवून बोलण्याची त्यांची पद्धत होती आणि अशा रीतीने ते आपले विचार मांडत की जेणे करून विरोधकांनादेखील त्यांनी केलेली टीका बोचणार नाही असे ते नेहमी बोलावयाचे. या संदर्भात त्यांच्या बोलण्याचा एक नमुना मी सांगू इच्छितो. की, कम्युनिष्ट म्हटले म्हणजे मोर्चा, साम्यवादी मोर्चा आणि काँग्रेसवाले म्हटले की, खुर्च्या आणि बीजेपी म्हटले की, पूजा-अर्चा. अशी त्यांची शब्दांची फेक असायची. यातून कोणाला काही वाईट वाटण्याचे कारण रहात नसे. पण एखाद्याचे वर्णन करण्याची त्यांची अशी खास पद्धत होती. श्री. गिरमे हे त्यावेळी उपाध्यक्ष होते. सदस्य म्हणून सभागृहामध्ये कसे काम करावयाचे या विषयी त्यांनी एक पुस्तक लिहिले आहे त्याला माननीय श्री.भारदे यांनी जी प्रस्तावना लिहिली ती प्रत्येकाने पाठ करून ठेवली तरी चालेल इतकी चांगली आहे. आता तर आपण त्यांच्या भाषणांचा संग्रह, निवडक भाषणांचा संग्रह प्रसिद्ध केला आहे. त्यातून आम्हाला अनेक वर्षे मार्गदर्शन होत राहणार आहे. त्यांनी म्हटलेले आहे की, बहुमत आहे म्हणून बेपर्वाई नको आणि बहुमत नाही म्हणून दांडगाई नको. इतक्या सहजतेने त्यांनी

...... एल 3 ....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख...

आपले विचार मांडलेले आहेत की अनेक वर्षे ते माणसांच्या लक्षात रहात असत. ते बोलत असताना भुवया वर करीत असत आणि सांगत की, लोकांची भलाई हीच आपली कमाई असे समजून लोकप्रतिनिधी काम करतील त्यावेळी लोकशाहीची पुण्याई फळाला येईल. विरोधकांना हर्ट होणार नाही अशा पद्धतीने ते काळजी घेत असत. अशा प्रकारे बोलणारे साहित्यामध्ये आपल्याला पुष्कळ सापडतील पण राजकारणात असूनही स्व. बाळासाहेब भारदे यांनी शब्दांवरील आपले प्रभुत्व सिद्ध केले. ते म्हणत की, आम्ही लाकशाहीच्या मंदिरातील पुजारी आहोत आणि येथील पुजेची साधने ही आमची येथील संसदीय आयुधे आहेत. अशा या थोर नेत्याला मी मनापासून श्रद्धांजली अर्पण करतो.

( यानंतर श्री. सरफरे ....एम 1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख...

त्याचप्रमाणे प्रख्यात सनई वादक श्री. बिस्मिल्लाखान यांच्या बाबतीत सुध्दा एक दुर्मिळ अशी गोष्ट आहे. तबला, पेटी व इतर वाद्यांच्या बाबतीत माणसाचा कस कमी लागतो. शहनाई हे असे वाद्य आहे की, त्यामध्ये दमसास या नावाची गोष्ट आवश्यक असते. पेटी वाद्यामध्ये सा पासून सा आणि रे पासून रे स्वर निघतात. सनई वादनामध्ये कौशल्य खूप आहे. एक गोष्ट पाहिली आहे की, श्री. बिस्मिल्लाखान यांच्यानंतर सनईवादक खूप झाले आणि आजही आहेत. श्री. बिस्मिल्लाखान यांच्या सनई वादनाचे स्वर कानावर येतात, तसे स्वर अजून ऐकिवात आलेले नाहीत. त्यांचे सनई वादन मी अनेक वेळा स्वत: ऐकले आहे, त्यांना अनेकदा टी.व्ही. वर सनई वादन करतांना पाहिले आहे. सनई वादन करतांना त्यांच्या मानेच्या नसा टरटरुन फुगावयाच्या. श्री. बिस्मिल्लाखान यांची सनई वादन करीत असतांना श्वासावरची त्यांची हुकूमत थक्क करणारी होती.

श्री. वसंतराव पटवर्धन यांच्याबरोबर अनेक वर्षे काम करण्याची संधी मला मिळाली. पक्षाच्या दृष्टीने अतिशय ठामपणे विचार घेऊन काम करणारी व्यक्ती होती. या सभागृहातील निरनिराळया आयुधांचा वापर करुन न्याय मिळविण्यासाठी ते प्रयत्न करीत राहिले आहेत. त्याचप्रमाणे सर्वश्री. पुंडलिक गणपतराव भानारकर, दशरथ हिरामण तायडे व संभाजीराव मारोतराव थोरात यांच्या दु:खद निधनाबद्दल मी माझ्या शोकभावना व्यक्त करतो व माझे दोन शब्द संपवितो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ( नामनियुक्त) : सभापती महोदय, या सदनाचे नेते व या राज्याचे उपमुख्यमंत्री माननीय श्री. आर. आर. पाटील यांनी सदनासमोर जो शोकप्रस्ताव मांडला आहे, त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सर्वश्री वसंतराव पटवर्धन, पुंडलिक गणपतराव भानारकर, दशरथ हिरामण तायडे व संभाजीराव मारोतराव थोरात यांनी या सभागृहामध्ये काम केले आहे. त्यांनी या सभागृहामध्ये नाहीतर या राज्यामध्ये सुध्दा निरनिराळया क्षेत्रामध्ये काम केले आहे. या मंडळींचा माझा याठिकाणी कधीही परिचय झालेला नाही. परंतु या सभागृहामध्ये त्यांनी प्रभावी असे काम केले आहे. त्यांच्या निधनानिमित्त याठिकाणी जो शोकप्रस्ताव आणला आहे त्याबद्दल माझ्या व माझ्या पक्षाच्या वतीने सहवेदना व्यक्त करतो.

सभापती महोदय, मी आपला आभारी आहे व आपले अभिनंदन करतो. मूळ प्रस्तावामध्ये प्रख्यात सनई वादक श्री. बिस्मिल्लाखान यांचा उल्लेख करण्यात आला होता. परंतु पहिल्यांदाच या सदनाचे जे सदस्य नाहीत, खालच्या सभागृहात दहा वर्षे माननीय अध्यक्ष म्हणून ज्यांनी काम केले त्या श्री. बाळासाहेब भारदे यांचा उल्लेख या ठरावामध्ये नव्हता. मघाशी शिवसेनेचे माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या प्रस्तावामध्ये श्री. बाळासाहेब भारदे यांचे नाव असणे आवश्यक होते अशी सूचना केली. त्या सूचनेला आपण मंजूरी दिली व त्यांचे नाव या शोकप्रस्तावामध्ये दाखल केले त्याबद्दल मी आपला आभारी आहे, व आपले अभिनंदन करतो. श्री. बाळासाहेब भारदे हे ऋषितुल्य व्यक्तिमत्व होते. आजच्या घटकेला राज्यामध्ये, समाजामध्ये अशी दुर्मिळ माणसे आहेत ज्यांच्या पायाशी आपण बसावे आणि त्यांनी आपल्या आयुष्यामध्ये जे मिळविले आहे ते आम्हाला सांगत जावे. अशी जी व्यक्तिमत्वे होती त्यातील श्री. बाळासाहेब भारदे हे एक व्यक्तिमत्व आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (पुढे सुरु...

सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांचा आणि श्री.बाळासाहेब भारदे यांचा जवळून संबंध आलेला आहे. ते जाहीरपणाने आपल्या भाषणात नेहमी त्यांचा उल्लेख करत असतात. स्व. बाळासाहेब भारदे यांनी राजकीय ,सामाजिक जीवनामध्ये काम करत असताना कार्यकत्यांनी कशाप्रकारे काम केले पाहिजे, त्यांनी चारित्र्य कशापध्दतीने चांगले राखले पाहिजे,हे सांगून संस्कार घडविण्याचे काम केलेले आहे.श्री. बाळासाहेब भारदे यांच्याबरोबर काही मंडळींचा संबंध आलेला आहे,त्यांना याची कल्पना आहे. श्री.बाळासाहेब भारदे यांचे दु:खद निधन वयापरत्वे निधन झालेले आहे, ही वस्तुस्थिती आहे. मला एक गोष्ट आठवते, माझ्या पत्नीने ज्ञानेश्वरीवर निरूपण करणारे पुस्तक लिहिले. त्या पुस्तकाला श्री.बाळासाहेब भारदे यांनी प्रस्तावना लिहावी म्हणून मी,माझी पत्नी सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांना घेऊन श्री.बाळासाहेब भारदे यांच्याकडे गेलो. आपल्याला आश्चर्य वाटेल की, त्यांनी 10-15 दिवसामध्ये पुस्तक वाचून प्रस्तावना दिली. त्या पुस्तकाचे प्रकाशन प्रा.राम शेवाळकर यांच्या हस्ते पुण्यामध्ये करण्यात आले. त्यामुळे त्यांचे मी आयुष्यभर ऋण फेडू शकणार नाही, एवढे मी सांगू इच्छितो.

प्रख्यात सनईवादक श्री.बिस्मिल्ला खान यांचे दु:खद निधन झालेले आहे. आम्ही वयाच्या चार-पाच वर्षापासून त्यांचे सनईवादन ऐकत आहोत. त्यांनी शेवटच्या श्वासापर्यन्त सनईवादन केले. याचा सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार साहेबांनी उल्लेख केला. चांगल्या प्रसंगी सनई वाद्य सुरु झाले की, वातावरण प्रसन्न आणि चांगले रहाते, हे आपण पहातो. अनेक राजे रजवाडे होऊन गेले तरी आपण दोनच राजांची नावे घेतो. एक म्हणजे राणा प्रताप आणि दुसरे छत्रपती शिवाजी महाराज. आकाशामध्ये जो पर्यन्त सूर्य,चंद्र आहे, तोपर्यन्त बिस्मिल्ला खान आणि लता मंगेशकर यांची नावे शतकानुशतके अजरामर राहतील. बिस्मिल्ला खान यांच्या दु:खद निधनाच्या संबंधात ठराव आलेला आहे, त्याचे मी समर्थन करतो आणि माझ्या वतीने मी त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ MAP/ KTG/ MAP/

डॉ.पतंगराव कदम (सहकार मंत्री) : माननीय सभापती महोदय, मी आपणास मनापासून धन्यवाद देतो की, श्री.बाळासाहेब भारदे हे या सभागृहाचे सभासद नसतानासुध्दा एक 'विशेष बाब' म्हणून या ठिकाणी त्यांना श्रध्दांजली वाहण्याचे आपण ठरविले, याबद्दल मी आपला मानून आपणास धन्यवाद देतो. सर्वश्री रघुनाथ पटवर्धन, पुंडलिक गणपतराव भानारकर, दशरथ हिरामण तायडे आणि संभाजीराव मारोतराव थोरात या माजी विधानपरिषद सदस्य, तसेच प्रख्यात सनईवादक श्री.बिस्मिल्ला खान यांच्या दु:खद निधनाच्या निमित्ताने प्रस्ताव मांडला आणि सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी त्याला अनुमोद दिले.

सभापती महोदय, माझा आणि श्री.बाळासाहेब भारदे यांचा वेगळ्या पध्दतीने संबंध आला. 1964 साली माझ्या लहान वयामध्ये मी पुण्यामध्ये सदाशिव पेठेत एक शिक्षणसंस्था दहा बाय दहाच्या खोलीमध्ये सुरू केली. त्या शैक्षणिक संस्थेला 'विद्यापीठ' असे नाव दिले. त्यावर वर्तमानपत्रामध्ये 'विद्यापीठ' एका बोळामध्ये सुरू केले, ते बोळामध्येच विसर्जित व्हावे अशी बातमी छापून आली. त्यावेळेस ती बातमी वाचून माझी ओळख नसताना, बाळासाहेब भारदे माझ्याकडे आले आणि म्हणाले, या बातमीकडे लक्ष देऊ नका. लिहिणाऱ्याने लिहीत रहावे, बोलणाऱ्याने बोलत रहावे, काम करणाऱ्यांनी काम करत रहावे, असे सांगून त्यांनी मला संदेश दिला.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम ......

त्यांच्या हयातीत सन 1996 मध्ये भारती विद्यापीठ स्थापन झाले आणि दिल्लीला श्री. वाजपेयी यांचे सरकार अस्तित्वात असताना आम्हाला इंटरनॅशनल एरिया ऑफ ऑपरेशन मिळाले. ते आता मिळाले असते तर आपण असे म्हणाला असता की, ओळखीपाळखीने ते मिळाले. अशा पध्दतीने कै. बाळासाहेब भारदे आणि आमचा संबंध आला. कै. यशवंतरावजी चव्हाण यांच्या मंत्रिमंडळात ते पहिल्यांदा सहकारमंत्री झाले. कै. यशवंतराव चव्हाण हे माणसांची पारख करणारे सुसंस्कृत नेते होते. त्यांनी श्री. बाळासाहेब भारदे आणि श्री. वि. स. पागे अशी दोन नररत्ने शोधून काढली. काँग्रेसच्या प्रत्येक शिबिरामध्ये काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना त्यांचे मार्गदर्शन होत असे. ते गांधीवादाचे पक्के विचारवंत आणि अनुयायी असल्यामुळे शेवटची पाच वर्षे त्यांचे वास्तव्य गांधी भवनामध्येच होते. ग्रामीण विभाग, काँग्रेस पक्षाची सद्य:स्थिती, सहकार चळवळ यासंदर्भात ते सातत्याने सांगत असत. आठ दिवस झाले की, ते मला फोन करावयाचे आणि मला सहकाराबद्दल तुझ्याशी बोलावयाचे आहे, नवीन काही सांगावयाचे आहे असे म्हणत असत. मला आनंद वाटतो की, त्यांना महाराष्ट्र शासनातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी मला पुण्याला पाठवले. सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख म्हणाले त्या पध्दतीने ते प्रत्येक विषयावर चपखलपणे, ठाम आणि स्पष्टपणे आपले विचार मांडत असत. त्यांचा गाढा अभ्यास होता. संत वाड़मयाचे ते गाढे अभ्यासक होते. राजकारणापासून, समाजकारणापासून अध्यात्मापर्यंतची त्यांनी या महाराष्ट्राला देणगी दिली. आपण पुढाकार घेऊन त्यांच्या हयातीत त्यांच्या भाषणांचे संकलन असलेल्या पुस्तकाबाबतचा कार्यक्रम मुंबईमध्ये घडवून आणला. त्यांनी केलेली भाषणे, त्यांनी शुध्दपणाने मांडलेले विचार सातत्याने या महाराष्ट्राला मार्गदर्शक ठरतील.

कै. संभाजीराव थोरात हे आमच्या शीव येथील होते. 1952 साली श्री. यशवंतराव माहिते यांच्या विरोधात त्यांचा पराभव झाला. ते सातत्याने यशवंतरावजींचे निष्ठावंत सहकारी होते. ते सात्विक आणि लोभस व्यक्तिमत्वाचे होते. ते संभाजीबाबा म्हणून ओळखले जात. ते सात्विक, सुसंस्कृत नेते होते. त्यांचे दु:खद निधन झाले.

कै. बिस्मिल्ला खान, कै. वसंतराव पटवर्धन आणि इतर दिवंगत सदस्यांबद्दल सन्माननीय सदस्यांनी भावना व्यक्त केलेल्या आहेत. या ठिकाणी मांडण्यात आलेल्या शोक प्रस्तावाला मी विनम्रपणे पाठिंबा देतो अणि माझे दोन शब्द संपवतो.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, आपण मला माफ करावे. शोक प्रस्तावाला विरोध करण्याचे काहीही कारण नव्हते पण स्थगन प्रस्ताव आल्यानंतर आपण ज्या सूचना केल्या त्यामध्ये स्थगन प्रस्तावावर चर्चा होईल असे म्हटल्यानंतर सभागृहाच्या सन्माननीय नेत्यांनी आपली जी भूमिका मांडली त्याला संमती देऊन आपण हा शोक प्रस्ताव या ठिकाणी घेतला. ज्या दिवंगत नेत्यांच्या संदर्भात हा शोक प्रस्ताव आलेला आहे त्याबद्दल आम्ही देखील तेवढेच संवेदनशील आहोत. प्रश्न एवढाच होता की, आपण सर्वांनी स्थगन प्रस्ताव घ्यावा आणि बाकीची चर्चा बाद करावी किंवा बाकीची सर्व चर्चा करावयाची असेल तर करावी असे ठरविल्यामुळे मी ती भूमिका घेतलेली होती.

सभापती महोदय, या ठिकाणी जो शोक प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे त्यामध्ये सर्वश्री वसंतराव रघुनाथ पटवर्धन. पुंडलिक गणपतराव भानारकर, दशरथ हिरामण तायडे व संभाजीराव मारोतराव थोरात, माजी वि. प. स. तसेच श्री. बिस्मिल्ला खान, प्रख्यात सनईवादक तसेच विधानसभेचे माजी सभापती सन्माननीय श्री. बाळासाहेब भारदे यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्याला पाठिंब देण्यासाठी मी उभा आहे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 14:15

(प्रा. जोगेंद्र कवाडे...)

या माजी दिवंगत सदस्यांपैकी श्री. पुंडलिक गणपतराव भानारकर यांचा आणि माझा फार जवळचा संबंध होता. मागासवर्गीयांच्या, विशेषत: आदिवासी समाजाच्या कल्याणासाठी, त्यांच्या अधिकारासाठी जी आंदोलने झाली त्या आंदोलनामध्ये त्यांनी वेळोवेळी अत्यंत उत्कृष्ट मार्गदर्शन केले. त्यांच्या दु:खद निधनामुळे आमचा जो हलबा आदिवासी समाज आहे त्या समाजाच्या आरक्षणाच्या चळवळीला मोठा सेट बॅक मिळाला ही अत्यंत दु:खाची गोष्ट आहे. श्री. भानारकर त्याच प्रमाणे सर्वश्री वसंतराव रघुनाथ पटवर्धन, दशरथ हिरामण तायडे, संभाजीराव मारोतराव थोरात यांना मी माझ्या पीपल्स रिपब्लिकन पक्षाच्यावतीने श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, बिस्मिल्ला खान, प्रख्यात सनईवादक यांना राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. देशाचा सर्वोच्च असा "भारतरत्न" पुरस्कार देऊन त्यांना गौरविण्यात आले. अशा या बिस्मिल्ला खानसाहेबांच्या निधनामुळे देशातील कला आणि संस्कृतीवर मोठा आघात झालेला आहे असे मी समजतो. आपल्या या सभागृहाच्या स्वर्णजयंती काळामध्ये पहिल्यांदाच अशी घडना घडली की, आपल्या मध्यवर्ती सभागृहासमध्ये बिस्मिल्ला खानसाहेबांचे सनईवादन झाले आणि संपूर्ण सभागृह सनईच्या सुरांनी भारावून गेले. आज त्यांची गरज याकरिता वाटते की, ज्यांच्या सनईच्या वादनाने माणुसकी टाकलेली माणसे देखील माणसे बनायची अशी प्रतिभा त्यांच्या सनईवादनामध्ये होती. अशा प्रकारचा हा सनईवादक महाराष्ट्रामध्ये आला असता तर आज निर्ढावलेल्या शासनामध्ये माणुसकीचा गहिवर निर्माण झाला असता, हे दु:ख मला जाणवते. आमचा मातंग समाज या सनईवादनामध्ये फार पारंगत. त्याच्या या कलेला चालना मिळाली नाही, त्याच्या कलेचा गौरव करण्यात आला नाही. ज्या मातंग समाजाचे सनई हे वाद्य आहे त्या सनईला आंतरराष्ट्रीय आणि जागतिक प्रतिष्ठ बिस्मिल्ला खानसाहेबांनी मिळवून दिली. हिंदुंचा सण असो, मदरसा असो किंवा मुस्लिमांचा दर्गा असो, त्या ठिकाणी तेवढ्याच तळमळीने, आत्मीयतेने आपल्या सनईच्या सुरांनी श्रोत्यांना स्वर्गीय आनंदाची अनुभूती देण्याचे काम बिस्मिल्ला खानसाहेबांनी केले. त्यांच्या निधनामुळे कलेची आणि सांस्कृतिक चळवळीची मोठी हानी झालेली असून आपल्या देशासाठी ही अत्यंत दु:खदायक बाब आहे.

सन्माननीय श्री. बाळासाहेब भारदे यांच्या संकलित भाषणांच्या पुस्तकाचे प्रकाशन आपल्या मध्यवर्ती सभागृहामध्ये झाले. त्या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा. जोगेंद्र कवाडे...)

यांनी केले होते. त्यांचे ते पुस्तक मी वाचले. ते वाचल्यानंतर अनेकांच्या मनामध्ये समतेची, ममतेची, बंधुत्वाची, माणुसकीची भावना निर्माण होते. सन्माननीय सदस्यांनी, मग ते खालच्या सभागृहाचे असोत अथवा वरच्या सभागृहाचे असोत, कसे वागावे, सभागृहामध्ये लोकशाही प्रध्दतीने आपल्या भावना कशा व्यक्त कराव्यात याचे दिशादर्शन, मार्गदर्शन त्यांनी वेळोवेळी केलेले आहे. अलिकडच्या काळामध्ये गांधीगिरीच्या नावाखाली भोंदूगिरी सुरु आहे. गांधीवादी मात्र मूग गिळून बसल्यासारखे दिसतात. तसे नसते तर जे अन्याय, अत्याचार आपल्या राज्यामध्ये सुरु आहेत त्याला गांधीवादीच बळी पडले नसते, असे जे चित्र आपल्या महाराष्ट्रात दिसत आहे ती खरी शोकांतिका आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे.........

राजकारणातील संत म्हणता येईल असे त्यांचे व्यक्तिमत्व होते. ते एक चांगले सिध्दहस्त लेखक होते. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे आपली लोकशाही व्यवस्था अधिक बळकट कशी होईल यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील राहीले. आमची कमाई म्हणजे जनतेची भलाई. आमच्या राजकारण्यांची कमाई म्हणजे लोकांची भलाई. आज आम्ही किती प्रमाणात लोकांची भलाई करतो हा सर्वांनी आत्मपरिक्षण करण्याचा विषय आहे. आज लोकशाहीच्या नावाखाली हिटलरशाही, पुंडशाही, पोलिसांचे दमनचक्र सुरु आहे. आज कै.बाळासाहेब भारदे असते तर निश्चितच या परिस्थितीवर, शासकीय आतंकवादावर तुटून पडले असते. ज्याप्रमाणे चिखलामध्ये कमळ उगवते त्याप्रमाणेच राजकारणाच्या दलदलीमध्ये निष्पाप अशा प्रकारचे उगवलेले कमळ म्हणून या राजकारणातील संताला उपमा देता येईल. ते जरी या सभागृहाचे सदस्य नसले तरी राज्याच्या विधानसभेचे माजी अध्यक्ष, एक ख्यातनाम व्यक्तिमत्व, एक संतपुरुष म्हणून आपण त्यांचा शोकप्रस्ताव मांडला आहे. मी त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, जी मंडळी त्यांच्याबद्दल अंत:करणाने आदर राखून बोलतात, बिस्मिल्ला खान व बाळासाहेब भारदे या सभागृहाचे सदस्य नसताना देखील आपण त्यांना श्रध्दांजली अर्पण करीत आहोत ही निश्चितच चांगली बाब आहे, याबद्दल सर्वांनी अभिनंदन केले आहे. परंतु खैरलांजी येथे ज्या चार दलितांची हत्या करण्यात आली. दिनेश वानखेडे, गायकवाड आणि माने यांचा शोकप्रस्ताव देखील याठिकाणी अंतर्भूत करणे आवश्यक होते. ज्या महाराष्ट्र शासनाच्या गृहखात्याच्या माध्यमातून गोळीबार करुन ज्यांना शहीद करण्यात आले, त्या भीमसैनिकांचा देखील शोकप्रस्ताव आला असता तर अधिक चांगले वाटले असते. असे असले तरी महाराष्ट्र शासनाच्या कोतेपणाचा मी धिक्कार करतो आणि सन्माननीय महापुरुषांच्या निधनाबद्दल जो शोकप्रस्ताव मांडण्यात आला आहे त्याला पाठिंबा देतो, माझ्या पक्षाच्या वतीने विनम्र श्रध्दांजली अर्पण करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय उपमुख्यमंत्री आणि या सदनाचे नेते श्री.आर.आर.पाटील यांनी जो शोकप्रस्ताव मांडला आहे त्या प्रस्तावासंबंधी माझ्या सहवेदना याठिकाणी मांडण्यासाठी मी उभा आहे. खरे म्हणजे पहिल्यांदाच याठिकाणी असे सांगू इच्छितो की, मला असे वाटले होते की, जसे आपण वसंतराव चव्हाण यांच्या दुःखद निधनाबद्दल अपवादात्मक सभागृहाचे कामकाज स्थगित केले तसे सन्माननीय देशभक्त स्वातंत्र्यसेनानी, गांधीवादी विचारवंत कै.बाळासाहेब भारदे, जे स्वातंत्र्यसैनिक होते, 10 वर्षे विधानसभेचे अध्यक्ष होते, त्यामुळे त्यांच्या संदर्भात देखील शोकप्रस्तावानंतर विशेष बाब म्हणून सभागृहाचे कामकाज स्थगित करावे अशी माझी इच्छा होती. परंतु एका महत्वाच्या प्रश्नावर चर्चा होणार असल्यामुळे आपण ती मंजूर केली आणि शोक प्रस्ताव याठिकाणी मांडण्यात आला आहे.

सभापती महोदय, कै.वसंतराव पटवर्धन त्यावेळचे जनसंघाचे नेते आणि या सदनाचे दोन वेळा सदस्य होते. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितल्याप्रमाणे डहाणू या आदिवासी परिसरात त्यांनी केलेले काम असेल, निष्ठेने पक्षाची केलेली सेवा आणि सदनाचे सदस्य म्हणून त्यांचा सहभाग व योगदान महत्वाचे होते. त्यांच्या निधनाबद्दल मी शोक व्यक्त करतो. त्याचप्रमाणे कै.दशरथ हिरामण तायडे हे खानदेशातील कार्यकर्ते, या सदनाचे सदस्य होते. कै.पुंडलिकराव भानारकर यांच्या संदर्भात सांगायचे झाले तर मी आणि सन्माननीय सदस्य श्री.सुधाकर गणगणे, आम्ही एनएसयुआय आणि सेवादलामध्ये काम करीत असताना अनेकवेळा आमचा त्यांच्याशी संपर्क आला. सहकार क्षेत्रातील त्यांचे योगदान फार मोठे होते. नागपूर शहरात ते राहणारे होते. तेही आपल्या सदनाचे दोनवेळा सदस्य होते. त्यांच्याही निधनाबद्दल शोकप्रस्ताव मांडण्यात आला आहे.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार.....

सभापती महोदय, सातारा जिल्यातील क्रांतीसिंह नाना पाटील, आबासाहेब किसनवीर, यशवंतराव चव्हाण अशा दिग्ग्ज स्वातंत्र्यसैनिकांच्या बरोबर नागनाथ नायकोडे अण्णा या सर्वांच्या बरोबर काम करणारे आणि तुरुंगवास भोगणारे आणि ख-या अर्थाने देशभक्त गांधीवादी विचारवंत असलेले कराड तालुक्यातील संभाजीराव थोरात यांचेही निधन झाले. त्यांची आणि माझी भेट अनेकवेळा झाली आणि योगायोग म्हणजे माननीय बाळासाहेब भारदे यांचा 90 वा वाढदिवस जेव्हा नारायणपूर येथील पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशी, नारायण महाराजांच्या हस्ते झाला. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सभांजीराव थोरात त्या ठिकाणी उपस्थित होते आणि त्याही ठिकाणी मला त्यांना भेटण्याची संधी मिळाली. एक कर्मठ देशभक्त आणि गांधीवादी काँग्रेसचे नेते माननीय संभाजीराव थोरात यांनाही मी श्रध्दांजली अर्पण करतो.

ज्यांचा प्रदीर्घ असा सहवास मला लाभला, त्यांनी महाराष्ट्राच्या विधानसभेच्या अध्यक्षपद 1962 ते 1972 या काळात सलग 10 वर्षे काम केलेले होते. त्यामुळे मी बाळासाहेब भारदे यांना मी श्रध्दांजली अर्पण करतो. महाविभाजक आणि नंतर महाराष्ट्र राज्याचे, पहिले सहकार मंत्री म्हणून त्यांनी काम केले होते तसेच त्यांनी इतरही अनेक पदांवर काम केलेले होते. ते थोर देशभक्त स्वातंत्र्यसेनानी, विचारवंत, प्रज्ञावंत, ज्ञानवंत, प्रबोधनकार, प्रवचनकार होते. मी बाळासाहेब भारदे यांना "दादा" म्हणत असे. त्यांच्या निधनाने मला आणि माझ्यासारख्या असंख्य कार्यकर्त्यांना, माननीय पतंगराव कदम आणि माननीय गुरुनाथ कुलकर्णी यांनी सांगितल्या प्रमाणे अत्यंत दु:ख झालेले आहे. मी आणि माननीय पतंगराव कदम आम्ही गांधीभवनात त्यांच्याकडे सातत्याने जात असू. त्यांचा आम्हाला जो सहवास लाभला त्या सहवासामधून आम्हाला बरेच काही जीवनात शिकायला मिळाले. आपण ज्याला घडण म्हणतो ते जीवन घडत असतांना त्यांच्या सहवासाचा योग आमच्या आयुष्यात आला तो अत्यंत महत्वाचा होता. माननीय बाळासाहेब भारदे नेहमी म्हणायचे की, मनुष्य हा मोठा कसा होतो? मनुष्य हा व्यासंगातून मोठा होतो की, सत्संगातून मोठा होतो. मनुष्य हा व्यासंगातून जरुर मोठा होता परंतु व्यासंगापेक्षा मनुष्य सत्संगातून अधिक मोठा होतो असे त्यांचे म्हणणे होते. त्यांचा सत्संग आणि सहवास माझ्यासारख्या कार्यकर्त्याला 40 वर्षे लाभलेला आहे. मी सेवादलात असल्यापासून मला तो लाभला आहे. माननीय कवाडे साहेब, आपण

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार ....

म्हणालात ते खरे आहे की, महात्मा गांधीचे नाव घेणारे असतील, महात्मा ज्योतिबा फुलेंचे नावे असतील, परंतु महर्षी विठ्ठलरामजी अण्णासाहेब शिंदे यांचे तर कोणी नावच घेत नाही. माननीय शिंदे साहेबांचे दलित चळवळीतील योगदान फार मोठे आहे. या थोर नेत्यांची नावे घेणारी माणसे त्या प्रमाणे वागत नाहीत हीच खरी सगळयात मोठी शोकांतिका आहे. म्हणून कृतीशील विचारवंताचा सहवास मला लाभलेला आहे. पाच-सहा वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांच्याबद्दल मला वृत्तपत्रात लिहिण्याची संधी मिळाली होती तसेच ते अंनतामध्ये विलीन झाल्यानंतर सुध्दा त्यांच्याबद्दल मला लिहिण्याची संधी मिळाली होती. स्वातंत्र्य चळवळीपासून ते जात पूर्णपणे विसरुन गेले होते परंतु आता जात अत्यंत घट्ट होत चालली आहे. मला या ठिकाणी सांगितले पाहिजे की, 800 जाती आणि 5000 उपजातीचा आपला देश आहे. ते म्हणत असत की, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी सांगितले होते की, जात विसरुन जा. स्वत:ची जात सांगू नका आणि दुस-याची जातही विचारु नका. परंतु स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जाती व्यवस्था अधिक घट्ट होत गेली. यामध्ये अनेक कारणे आहेत, यामध्ये अनेक पक्ष दोषी आहेत. परंतु स्वातंत्र्यानंतरही जात पुसली गेली नाही, मोडली गेली नाही, बुजली नाही, नष्ट झाली नाही. विज्ञानाच्या युगात जग फार जवळ आले आहे असे म्हणत म्हणत जात अधिक घट्ट होत गेलेली आहे अशी जातीची शोकांतिका आहे. ही श्रध्दांजली वाहत असतांना मी अतिशय विनम्रपणे आहे. मी सदनाच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, जातीचा गाजावाजा माननीय भारदे साहेबांनी कधीही आयुष्यात केला नाही किंबहुना ते म्हणत असे की, "सामाजिक अभिसरण हे शरिरातील रक्ताभिसरणाप्रमाणे झाले पाहिजे. असे जर झाले तर मनुष्य विकलांग होणार नाही. सामाजिक अभिसरण देखील तशाच पध्दतीनें झाले तर समाज पुरुष अत्यंत प्रबळपणे उभा राहील. समाज पुरुष विकलांग होणार नाही" ही दादांची वाक्ये आहेत. मी सदनाच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, दादांची एक सून ख्रिश्चन होती. त्यांच्या सुनेच्या आई-वडीलांना वाटले की, हें प्रवचनकार आहेत, किर्तनकार आहेत, वारकरी आहेत म्हणून ते आपल्या मुलीचा धर्म बदलून घेतील. ते दादासाहेबांकडे आले आणि त्यांनी सांगितले की, तुम्हाला आमच्या मुलीवर जे काही संस्कार करावयाचे असतील ते आपण करावे. त्यावेळेस माननीय भारदे साहेबांनी

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार.....

सांगितले की, मी वारकरी संप्रदायाचा आहे. भागवत संप्रदायाला जात मुळीच माहिती नाही. विश्व मानवतेचा संदेश ज्ञानेश्वरांनी दिला, तुकोबा महाराजांनी दिला "विष्णुमय जग, वैष्णवांचा धर्म, भेदाभेद भ्रम अमंगळ." त्या मुलीच्या आईवडीलांना सांगितले की, "कोणाही जिवाचा न घडो मत्सर वर्म सर्वेश्वर ते जाणे." हा संदेश माननीय भारदे साहेबांनी दिला. ज्या विश्वात्मक देवाची कल्पना भागवत संप्रदायाने मांडली, तेथे सर्वांचे धर्म सारखेच आहेत असे ते म्हणाले.

यानंतर श्री. अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ KTG/ 14:30

श्री.उल्हास पवार....

धर्म बदलण्याची आवश्यकता नाही. त्यांची नातसून आणि नातजावई सुध्दा दलित आहेत. हे या सदनाला सांगितले पाहिजे. पण या गोष्टींचा त्यांनी कधीही गाजावाजा केला नाही. त्यांनी खऱ्या अर्थाने गांधीजींचा जातपात मोडण्याचा जो वसा घेतला होता तो कृतीमध्ये आणून दाखविला. सभापती महोदय, त्यांच्या घरी पाटोळे नावाचा एक मुलगा आला होता. मला माहीत नव्हते की, त्यांचा तो होणारा नातजावई आहे. मी त्यावेळी त्यांचेजवळ बसलो होतो. त्यांनी त्यांच्या एका कामासाठी त्यांचे एक मित्र श्री. नवलभाई फिरोद यांना फोन केला आणि सांगितले की, पाटोळे नावाचा एक मुलगा आहे तो बी.ई मॅकेनीक फर्स्ट क्लास आहे, हुशार आहे. त्याने जाहिरातीप्रमाणे अर्ज केलेला आहे. तो तुमच्या नॉर्म्समध्ये बसत असेल तर तुमच्या कारखान्यामध्ये जमले तर त्याला नोकरी द्यावी आणि थोडा पॉझ घेऊन त्यांना सांगितले की, तो माझा होणारा नातजावई आहे. हे सर्व संभाषण माझ्यासमोर झाले. त्यावेळी माझ्यासोबत आंबेडकरी चळवळीतील एक मुलगा आला होता. त्याला हे सर्व ऐकून धक्काच बसला. बाळासाहेब भारदेंचे फोन वरील संभाषण झाल्यानंतर ते मला म्हणाले की, "उल्हास, माझा मुलगा मोहन याची मुलगी कु.अर्चना हिने या मुलाबरोबर लग्न करायचे ठरविले आहे. हा दलित मुलगा आहे." त्यांनी ही गोष्ट त्यांच्या पत्नीस सांगितली त्यावेळी त्यांनी सांगितले की, हा फारच छान मुलगा आहे. त्यांनी हे अगदी सहजपणे स्वीकारले. जे आज कुणालाही शक्य नाही. आपल्याकडे बोलघेवडे लोक फार आहेत. पण कृतीमध्ये आणण्याचे काम माननीय बाळासाहेब भारदे यांनी केलेले आहे.

सभापती महोदय, मी याठिकाणी सांगू इच्छितो की, 1952 ते 1972 म्हणजे 20 वर्षे त्यांनी विधानसभेत काम केले. त्यातील सलग दहा वर्षे त्यांनी विधानसभेचे अध्यक्षपद भूषविले. त्यानंतर त्यांना विनंती करण्यात आली की, त्यांनी लोकसभेची निवडणूक लढवावी. श्री.गडाखसाहेब नगर जिल्ह्यातील आहेत. बाळासाहेब भारदे यांनी सांगितले की, आता मी निवडणुकीच्या राजकारणात उभा राहणार नाही. माझा हा निर्णय पक्का आहे आणि आयुष्यभर ते या निर्णयावर ठाम राहिले. श्री.उमाशंकर दीक्षित हे देखील स्वातंत्र्यसेनानी होते. ते गृहमंत्री झाले. त्यांनी बाळासाहेब भारदे यांना फोन केला आणि सांगितले की, Mr. Balasaheb Bharde, you have been appointed as Governor of Madhya Pradesh." त्यांनी सांगितले की, तुम्हाला मध्य प्रदेश राज्याचा गव्हर्नर म्हणून नेमलेले आहे. तुम्ही दोन दिवसांनतर शपथ घेण्यासाठी भोपाळ येथे यावे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार....

भारदे यांनी एका क्षणात सांगितले की, लोकांपासून दूर जाणारे पद मला नको, मी भागवत सांप्रदायाचा आहे. लोकांतामध्ये एकांत पाहणारा मी कार्यकर्ता आहे. मी एकांतामध्ये एकांत पाहणारा कार्यकर्ता नाही. लोक जर माझ्याजवळ नसतील तर त्या सोनेरी मनोऱ्यामध्ये, बंद दरवाजामध्ये जाऊन मी काय करु ?" तेव्हा आपण त्या पदासाठी दुसऱ्या व्यक्तीची लवकर निवड करावी, मी काही राज्यपाल पदाची शपथ घेण्यासाठी भोपाळला जाणार नाही." सत्तेचा मोह देखील किती सहजपणे टाळावा हे आदर्श उदाहरण माननीय बाळासाहेब भारदे यांचेकडून मला पहावयास मिळाले. मला त्यांच्याबद्दल अनेक गोष्टी सांगता येतील, परंतु वेळेची मर्यादा आहे.

सभापती महोदय, याठिकाणी राज्य शासन आणि लोकशाही यावर खूप विवेचन झाले. विधिमंडळे ही लोकशाहीची मंदिरे आहेत. या लोकशाहीच्या मंदिरातील आपण पुजारी आहोत आणि या मंदिराची देवता जनताजनार्दन आहे. नाथांचा एक अभंग आहे. "जन हेची जनार्दन, एका जनार्दनी भजन". हा बाळासाहेब भारदे यांचा निरुपणाचा एक विषय असायचा. या जनता जनार्दनाची पुजा करण्याकरिता या लोकशाहीच्या मंदिरामध्ये आपण पुजारी म्हणून बसलो आहोत असे ते सांगायचे. ते लोकप्रतिनिधींबद्दल काय म्हणायचे ते सांगतो. त्यावेळी कसे लोकप्रतीनिधी होते आणि आता कसे लोकप्रतिनिधी आहेत याचे ते फार सुंदर वर्णन करतात. "लोक प्रति निधी" म्हणजे लोकांच्या आशा आकांक्षा ज्यांच्या वागणुकीतून,कार्यातून प्रतिबिंबित झालेल्या आहेत असा "लोकप्रतिनिधी." आताचे लोकप्रतिनिधी म्हणजे लोकांपासून दूर, प्रति सारखा म्हणजे भिंतीवर लटकलेला आणि निधीवर लक्ष असलेला असा लोकप्रतिनिधी. असे त्यांनी अतिशय चपखलपणे आताच्या लोकप्रतिनिधींचे वर्णन केलेले आहे.

सभापती महोदय, कै.बाळासाहेब भारदे यांनी "संतबोध, "आदर्श ग्रामक्रांती," " गांधी विचार मीमांसा" "राष्ट्रीय एकात्मता आणि मूलतत्ववाद" या पुस्तकांव्यतिरिक्त जास्त पुस्तके लिहिलेली आहेत. तसेच त्यांनी शेकडो प्रस्तावना देखील लिहिल्या आहेत. त्यांच्या प्रस्तावना देखील वाचनीय आहेत. कै.बाळासाहेब भारदे यांच्या काळातील विधानसभेचे उपाध्यक्ष श्री.के.टी.गिरमे यांनी

..3..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार....

लिहिलेल्या "विधानमंडळ कामकाज समालोचन" या पुस्तकात लिहिलेली प्रस्तावना इतकी सुंदर आहे की, आपण ती सर्वांनी लक्षात ठेवली पाहिजे. त्यांनी प्रस्तावनेमध्ये लिहिले आहे की, "तोल न जाता बोल लावावा". आता तर सर्वांचा तोलच जातो, बोल लावताना कोणी पाहतच नाही. तसेच टीका कशी करावी हे देखील त्यांनी सांगितलेले आहे.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार....

टीकेला मांगल्य असले पाहिजे. त्यांनी सांगितले की, आपल्यावर पक्षांतर्गत आणि पक्षोपपक्षांमध्ये इतकी जोरात टीका चालली आहे की, निवडून आलेले लोक आणि राजकीय पुढारी एकमेकांवरच्या अंगावरचा शेंदूर ओरबाडून ओरबाडून सिध्द करतात की, आम्ही देव नसून दगड आहोत. या सगळया गोष्टींची उजळणी या सभागृहात होत असते. आजचे राजकारण, समाजकारण, आजचे आंदोलन आणि आजच्या सगळया गोष्टी बघितल्यानंतर मला या सगळया लोकांची खरोखरच आठवण होते. म्हणून त्यांना निरोप देताना देखील मी सांगितले की, दुःखाने, क्लेषाने निरोप देऊ नका, आनंदाने निरोप द्या. प्रसन्न मरण आणि प्रसन्न जीवन, ते असे म्हणाले होते की, जीवनाची आसक्ती आणि मृत्यूचे भय याच्यावर ज्यांनी मात केली तो खरा मनुष्य. जन्म आणि मृत्यू यातील जे अंतर आहे त्याला आपण जीवन म्हणतो. पण जीवन प्रसन्न असावे व मृत्यूही प्रसन्न असावा. असा मृत्यू आणि असे मरण हे माननीय बाळासाहेब भारदे यांना लाभलेले आहे, म्हणून आनंदाने त्यांना निरोप दिला पाहिजे. तुकोबाच्या अभंगात त्यांनीच सांगितले होते की, "मन करा रे प्रसन्न, सर्व सिध्दीचे हे मूळ" असे म्हणून त्यांना आम्ही निरोप दिला. माझी त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली.

------

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.यशवंतराव गडाख (अहमदनगर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय श्री.आर.आर.पाटील यांनी जो शोकप्रस्ताव याठिकाणी आणलेला आहे, त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

कै. बाळासाहेब भारदे हे माझ्या जिल्हयातील. शेवगांव तालुक्यातील माझ्या जन्मागावचे असल्यामुळे त्यांचा आणि माझा संबंध लहानपणापासून आला. सन 1967 मध्ये ते सभापती झ ाल्यानंतर त्यांच्या सानिध्यामध्ये आम्ही आलो. मी याठिकाणी सांगू इच्छितो की, शेवगांव-नेवासे संघातील बाळासाहेब भारदे हे सभापती झाले त्यावेळी त्यांनाच मतदारसंघ द्यावा असे संकेत असतात. त्यांना तो मतदारसंघ मिळण्यासंबंधीच्या आठवणी आताच याठिकाणी माननीय उल्हास दादांनी सांगितल्या. त्यावेळी माननीय बाळासाहेब भारदेंनी निवडणूक लढवायची नाही असे सांगितले होते. सन 1972 साली त्यांनी स्वत:ची उमेदवारी मागे घेऊन हायकमांडकडे माझ यासारख्या तरुण मुलाला तिकीट देण्यासंबधी विनंती केली व त्यावेळी मला तिकीट देण्यात आले. सन 1972 सालापासून आम्ही त्यांच्या प्रेमात पडलो. त्यांची अनेक भाषणे आम्ही ऐकलेली आहेत. त्या काळामध्ये श्री.पागे, श्री.बाळासाहेब भारदे यांची सभांमधील आणि शिबिरांमधील भाषणे ऐकण्याचा योग आम्हाला आला. त्यांच्या विचारातून आदर्शवत अशी भूमिका पहावयास मिळत असे. एखाद्या प्रश्नांकडे कसे पहावे, या सर्व गोष्टी आम्ही आयुष्यामध्ये त्यांच्याकडून शिकलो. अहमदनगरमध्ये जेव्हा अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन घेण्याचे नक्की झाले, त्यावेळी प्रथम आम्ही माननीय बाळासाहेब भारदे यांना भेटलो. आणि त्यांनी मला कशा पध्दतीचे संमेलन असावे, यासंबंधी अतिशय चांगल्या प्रकारच्या सूचना केल्या, त्या मी अत्यंत तंतोतंत पाळल्यामुळेच त्यावेळी नगरमधील आमचे संमेलन यशस्वी झाले. सहकार आणि साहित्य क्षेत्रातील, अध्यात्मातील महर्षी आज आपल्यातून निघून गेलेला आहे. वक्तृत्व कसे असावे याचे उदाहरण मी माझ्या डोळयांनी पाहिलेले आहे. त्यावेळेस मी कॉलेजमध्ये होतो. संयुक्त महाराष्ट्रानंतर विधानसभेच्या निवडणूका होत्या. त्यावेळी नगरमध्ये गांधी मैदानामध्ये त्यांची सभा होती. गांधी मैदानामध्ये सभेला प्रचंड जनसमुदाय जमला होता. परंतु त्यांची सभा होऊ द्यावयाची नाही, असे लोकांनी ठरवले होते. त्याठिकाणी लोक कांदे आणि अंडे घेऊन आलेले होते. ज्यावेळी माननीय बाळासाहेब भारदे बोलण्यासाठी उभे राहिले त्यावेळी समोरील लोक उभे राहून त्यांना काहीच बोलू

..3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.यशवंतराव गडाख...

देत नव्हते. अर्धा तास गोंधळ चालू होता. त्यावेळी माननीय बाळासाहेब भारदे यांनी लोकांना सांगितले की, मला बोलू द्यावे, माझे फक्त पाच मिनिटे ऐकून घ्यावे. मग, ते बोलायला उभे राहिले व त्यांनी पहिले वाक्य असे म्हटले की, काँग्रेस पक्ष आणि विरोधी पक्ष यामधील फरक काय आहे हे मी तुम्हाला सांगतो. त्यांनी पुढे सांगितले की, आपल्या घराच्या भिंतीवर दररोज कावळा बसतो, तो कर्कशपणे ओरडत असतो. परंतु काँग्रेस पक्ष हा कोकीळेसारखा आहे. कोकीळेचा आवाज कानांना मंजुळ लागत असतो. त्याप्रमाणे आम्ही मंजुळपणे वागणारे, गाणारे लोक आहोत. अशा पध्दतीने ती सभा त्यांनी जिंकली.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.यशवंतराव गडाख..........

त्यांनी बोलायला सुरुवात केल्यानंतर जवळ जवळ 1 तास सभेमध्ये पिनड्रॉप सायलन्स होता. त्या निवडणुकीमध्ये नगर जिल्हयातील काँग्रेसच्या सर्व आमदारांचा पराभव झाला एकटे बाळासाहेब भारदे विजयी झाले होते. अशा त-हेने माणसे जिंकणारे नेतृत्व आज आपल्यातून हरवले आहे. त्यांना मी या ठिकाणी श्रध्दांजली वाहतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

----------------

..2..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते, सन्माननीय उपमुख्यमंत्री, श्री.आर.आर.पाटील यांनी मांडलेल्या शोक प्रस्तावाला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. आज या ठिकाणी समाजातील अतिशय उत्तुंग व्यक्तिमत्व असलेल्यांबद्दल आपण शोक व्यक्त करीत आहोत, श्रध्दांजली अर्पण करीत आहोत. त्यांच्याबद्दलच्या माझ्या संवेदना, भावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या सदनामध्ये सन 1988 ते सन 1994 या काळात ज्यांनी काम केले अशा कै.वसंतराव पटवर्धन यांच्याबरोबर आम्ही 25/30 वर्षे काम केले आहे. दिनांक 22 सप्टेंबर 2006 रोजी त्यांचे निधन झाले. सामाजिक, राजकीय क्षेत्रामध्ये 50 वर्षे कै.पटवर्धन यांनी काम केले आहे. सत्तेचा मोह नसलेला, ऋषीतुल्य, आदर्श, विविधांगी, अष्टपैलु व्यक्तिमत्व असलेल्या कै.पटवर्धन यांनी सन 1988 ते 1994 या कालखंडात विधानपरिषदेवर काम केल्यानंतर स्वत:हून पक्षाला सांगितले होते की, मला पुन्हा निवडणुकीला उभे करु नका. पंडित दिनदयाळ उपाध्याय, रामभाऊ म्हाळगी, वसंतराव पटवर्धन यांनी असा मंत्र दिला होता की, जातीच्या पलिकडे जाऊन सार्वजनिक क्षेत्रामध्ये काम केले पाहिजे, सामान्य व्यक्ती केंद्रबिंदू मानून काम केले पाहिजे. कै.पटवर्धन यांनी ठाणे जिल्हयाच्या आदिवासी भागामध्ये काम केले, आदिवासी जगला पाहिजे, स्वत:च्या पायावर उभा राहिला पाहिजे म्हणून आश्रमशाळा काढल्या, लघुउद्योग उभे केले, मुकबधिर विद्यालय सुरु केले. अशा पध्दतीने 30/40 वर्षे त्यांनी या भागामध्ये काम केले आणि त्यामुळे तळमळीने काम करणारा असा सच्चा सेवक असे वर्णन कै.वसंतराव पटवर्धन यांचे करता येईल. रचनात्मक, विधायक कार्य करणा-या कै.वसंतराव पटवर्धनांचा आदर्श डोळयासमोर ठेवून पुढील काळामध्ये काम करणे आणि त्यांच्यासारख्याच अन्य उत्तुंग व्यक्तिमत्वांचा आदर्श ठेवून काम करणे हीच त्यांना खरी श्रध्दांजली ठरेल. मी या निमित्ताने माझ्यातर्फे आणि सगळया कोकण विभागातील कार्यकर्त्यांतर्फे श्रध्दांजली अर्पण करतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-----------------

..3.............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, सन्माननीय उपमुख्यमंत्री, श्री.आर.आर.पाटील यांनी सर्वश्री वसंतराव पटवर्धन, पुंडलिक गणपतराव भानारकर, दशरथ हिरामण तायडे व संभाजीराव मारोतराव थोरात, बिस्मिल्ला खान यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोकप्रस्ताव मांडला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी व माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, कै.पटवर्धन यांनी जनसंघामध्ये अतिशय मोलाचे असे काम केलेले आहे. सेवाभावी वृत्तीचे, आदर्श असे हे नेतृत्व होते. ते सन 1988 मध्ये विधानपरिषदेवर निवडुन आले होते.

सभापती महोदय, कै.तायडे यांनी स्वातंत्र्य लढयात भाग घेतला होता. जळगाव जिल्हा शेतकरी कामगार पक्षाचे ते चिटणीस होते. अट्रावल ग्रामपंचायतीचे सरपंच तसेच जळगाव जिल्हा लोकल बोर्डाचे सदस्य म्हणून त्यांनी कार्य केले होते. त्यांचेही दिनांक 19 नोव्हेंबर 2006 रोजी दु:ख निधन झाले.

सभापती महोदय, सनईव्दारा संगीताची सेवा करणा-या, जगभरात सनईवादनाच्या मैफली गाजविणा-या आणि अनेक सन्मान प्राप्त करणा-या, बिस्मिल्ला खान या प्रख्यात सनईवादकाचे दिनांक 21 ऑगस्ट 2006 रोजी दु:ख निधन झाले.

यानंतर श्री.बोरले.............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील .........

श्री.बाळासाहेब भारदे यांनी महाराष्ट्राला एक इतिहास घडवून दिला. श्री.बाळासाहेब भारदे सहकार मंत्री असतांना 1960 चा सहकारी कायदा अस्तित्वात आला आणि त्या कायद्यान्वये महाराष्ट्रामध्ये सहकार रुजला, महाराष्ट्रामध्ये आर्थिक परिवर्तन झाले. आपल्याला माहीत आहे की, त्यावेळी माझ्या पक्षाने सहकाराला विरोध केला होता. त्यामुळे माझ्या पक्षाची पिछेहाट झाली. त्यावेळी सहकाराला पाठिंबा दिला असता तर आज महाराष्ट्राचे चित्र वेगळे असते. सहकार क्षेत्रामध्ये काम करतांना माझा श्री.बाळासाहेब भारदे यांच्याशी संबंध आला. त्यावेळी त्यांनी सांगितले होते की, सहकार कायद्यामध्ये आता बदल करावयास पाहिजे. सन 1960 साली सहकार कायदा निर्माण झालेला आहे आणि आज 40 वर्षानंतर त्या कायद्यामध्ये बदल व्हावयास पाहिजे. माननीय सहकार मंत्री श्री.पतंगराव कदम मघाशी बोलले की, मी त्यांचा शिष्य आहे. आज सहकाराची दुर्दैवी अवस्था झालेली आहे. त्यांना श्रद्धांजली वाहावयाची असेल तर सहकार कायद्यातील त्रुटी दुरुस्त करुन सहकार जगविण्याच्या दृष्टीकोनातून ख-या अर्थाने प्रयत्न झाला पाहिजे. ज्यांनी सहकार कायदा आणला आणि सहकार रुजविण्याचे काम केले ते श्री.बाळासाहेब भारते आणि इतर सर्व माजी सन्माननीय सदस्यांना मी श्रद्धांजली वाहतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वादा निर्वाचित) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री यांनी सर्वश्री वसंतराव रघुनाथ पटवर्धन, पुंडलिक गणपतराव भानारकर, दशरथ हिरामण तायडे व संभाजीराव मारोतराव थोरात, माजी वि.प.स. तसेच, श्री.बिस्मिल्ला खान, प्रख्यात सनईवादक यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडलेला आहे. सभागृहामध्ये ज्या भावना व्यक्त करण्यात आल्या त्या भावनांशी मी सहमत आहे.

श्री.बिस्मिल्ला खान यांनी वेगळया माध्यमातून भारताचे संगीत परदेशामध्ये नेले. श्री.बिस्मिल्ला खान यांच्या संदर्भात सभागृहामध्ये ज्या भावना व्यक्त करण्यात आल्या त्यांच्याशी मी सहमत आहे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी श्री.बिस्मिल्ला खान यांच्या कार्यक्रमाचा उल्लेख केला. शिवसेना प्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे यांना माझ्या शहनाईच्या सुरांची एकदा आठवण करावी अशी भावना त्यांनी व्यक्त केली होती. म्हणून तो कार्यक्रम झाला होता आणि तो कार्यक्रम अतिशय चांगल्या प्रकारे झाला ते श्री.बिस्मिल्ला खान माझ्या लक्षात आहेत.

श्री.बाळासाहेब भारदे यांना श्रद्धांदली वाहिली पाहिजे असे मला वाटले म्हणून मी सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांना फोन केला होता. श्री.बाळासाहेब भारदे यांच्या दु:खद निधनाने महाराष्ट्रातील वारकरी संस्कार हरपला आहे असे मी सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांना सांगितले होते. आपल्याला कायम स्वरुपी मार्गदर्शन व्हावे अशा पद्धतीचे त्यांचे पुस्तक प्रकाशीत झाले होते. श्री.बाळासाहेब भारदे यांनी लिहिलेले उतारे मी मुद्दाम वाचून दाखविणार आहे. कारण त्याची आजच्या दिवसाला गरज आहे.

यानंतर श्री.सुंबरे.........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते .....

निकोप लोकशाही व कार्यक्षम लोकप्रतिनिधींच्या संदर्भात ते लिहितात -- " लोकशाही म्हणजे शांततामय मार्गाने समाजपरिवर्तनाची प्रक्रिया. शांततेच्या नावाखाली स्वातंत्र्याची गळचेपी होऊ नये आणि स्वातंत्र्याच्या नावाखाली अशांततेला उत्तेजन मिळू नये हा समतोल साधावयाचा असल्यास संसदीय परंपरेची जपणूक सर्वांनीच कटाक्षाने केली पाहिजे. केवळ बहुमत आहे म्हणून बेपर्वाई नसावी आणि बहुमत नाही म्हणून दांडगाई नसावी. लोकांची भलाई हीच आपली कमाई अशी भावना उभयपक्षी असेल तर काही सत्तारूढांची बेपर्वाई आणि काही विरोधकांची दांडगाई या गोष्टी कमी होऊन लोकशाहीची पुण्याई कृतार्थ बनेल. अभ्यासू, सेवाभावी, कार्यक्षम आणि क्रांतदर्शी लोक प्रतिनिधीच हे महान कार्य करू शकतील. विधानमंडळातील जागा मिळविण्यासाठी जेवढा उत्साह व्यक्त होतो त्याचा काही भाग तरी लोकप्रितिनिधींनी जागेवर नियमाने बसण्यात, त्या जागेवरून लोकांचा आवाज उठविण्यात, त्या आवाजाने लोकांना जागे करण्यात खर्च होऊ शकला तरी संसदीय लोकशाहीची चांगली प्रगती होईल ...." सभापती महोदय, आपणा सगळ्यांनाच मार्गदर्शक व्हावेत असेच त्यांचे हे विचार आहेत. विधानसभेचे कार्य, स्वरूप व महत्त्व मोजक्या शब्दांत व्यक्त करताना त्यांनी म्हटले आहे की, ".....विधानसभा हे लोकशाहीचे महामंदिर आहे. जनताजनार्दन हीच त्याची स्वयंभू सार्वभौम देवता आहे. प्रतिनिधी हे त्या देवतेचे उपासक आहेत आणि त्या उपासकांचे सेवासाधनेचे संवाद म्हणजेच विधानमंडळातील चर्चा. सत्ता आणि सेवा, विरोध आणि विनोद, शक्ती आणि युक्ती, वाद आणि संवाद, कर्तृत्त्व आणि वक्तृत्व, मान आणि इमान, नय आणि विनय, निष्ठा आणि प्रतिष्ठा, सवाल आणि जबाब, आवेश आणि आर्जव इत्यादी गोष्टींचा पावनसंगम या विधानसभेत अनुभवावयास मिळतो. तोल सांभाळून बोल कसा लावावा, वैर सोडून वार कसा करावा, नर्म होऊन वर्म कसे भेदावे, दुजाभाव असून बंधुभाव कसा ठेवावा, अल्प मताने बहुमताला व बहुमताने लोकमताला कसा साद-प्रतिसाद द्यावा आणि ही सर्व संधाने बांधण्यात लोकसेवेचे अनुसंधान कसे सुटू नये, या सर्व गोष्टींचे दक्षतापूर्वक परिपालन म्हणजे वैधानिक कार्य. विधानसभा म्हणजे शिळोप्याच्या गप्पांचे ठिकाण नसून नवमहाभारताचे व्यासपीठ आहे या जाणीवेने लोकप्रतिनिधी काम करतील याच अपेक्षेने लोक त्यांना नियुक्त करीत असतात ..." अशा प्रकारचे सर्वकाळ मार्गदर्शक विचार त्यांनी मांडलेले आहेत. ते स्वत: एक उत्कृष्ट संसदपटू होते व केवळ ते खालच्या सदनाचे दोन वेळ अध्यक्ष होते एवढ्या पुरत्या त्यांच्याविषयी भावना मांडता येणार

...... डब्ल्यू 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते .....

नाहीत तर आपल्याला माहितीच आहे की, वारकरी संप्रदायामध्ये देखील ते 'बुवा' म्हणून प्रसिद्ध होते. त्यांना सर्व 'भारदेबुवा' या आदरणीय व आपुलकीच्या, जिव्हाळ्याच्या नावाने बोलवितात. तेथील त्यांचा सहज वावर आश्चर्यचकीत करणारा आहे. ज्ञानेश्वरीच्या एखाद्या ओळीचे किंवा तुकारामांच्या एखाद्या अभंगाचे निवेदन ते करतात तेव्हा श्रोते स्तंभित होऊन, तल्लीनतेने ऐकत राहतात. अशा वेळी त्यांचा संत साहित्याचाही अभ्यास किती सखोल आहे याची जाणीव होते. मला त्यांची आठवण विशेष करून होते की, ते सहकार मंत्री असताना त्यांनी जे काम केले आहे त्यातून. त्याचा उल्लेख येथे सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र. पाटील यांनी केला आहे. 7 ऑगस्ट 1959 ला त्यांनी सावकारी कायद्यात सुधारणा मांडली होती. महाराष्ट्रात सावकारी कायद्याखाली आणली. सरकार जेव्हा पुरवठा करू शकत नाही तेव्हा सावकाराकडून ते काम व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली होती. आज आता आत्महत्यांचे प्रमाण वाढले आहे आणि अशा वेळी आपले उपमुख्यमंत्री सावकारांमुळे आत्महत्या होतात म्हणून सावकारी कायद्यात बदल करण्याची आवश्यकता प्रतिपादन करीत आहेत. परंतु स्व. बाळासाहेब भारदे यांनी त्यांच्या काळात जो कायदा मांडलेला आहे त्यात बदल झालेला नाही. तेव्हा सावकारी कायद्याची महाराष्ट्रात आवश्यकता आहे परंतु घटनेच्या कंकरन्स लिस्टमध्ये आपल्या राज्याने सावकारी कायदा करावा अशी सूचना त्यांनी केली आणि त्यातून हा कायदा अस्तित्त्वात आला. म्हणून मी बाळासाहेब भारदे यांना मन:पूर्वक आदरांजली वाहतो.

***

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**श्री. वसंतराव डावखरे (उपसभापती)** : सभापती महोदय, आज या सभागृहामध्ये सन्माननीय सभागृहाचे नेते आदरणीय श्री. आर. आर. पाटील यांनी जो शोकप्रस्ताव मांडला आहे त्याला अनुमोदन देण्यासाठी मी उभा आहे. आजच्या या शोकप्रस्तावामध्ये या विधानपरिषदेचे दिवंगत सदस्य सर्वश्री वसंतराव रघुनाथ पटवर्धन, पुंडलिक गणपतराव भानारकर, दशरथ हिरामण तायडे व संभाजीराव मारोतराव थोरात यांचा नामोल्लेख करण्यात आला असून या सर्व दिवंगत विधान परिषद सदस्यांना माझी भावपूर्ण श्रध्दांजली वाहतो. श्री. वसंतराव पटवर्धन हे ठाणे शहरामध्ये कार्यरत होते आणि या राज्यामध्ये एक समाजसेवक म्हणून ते परिचित होते. याठिकाणी खासकरुन सुप्रसिध्द शहनाईवादक भारतरत्न श्री.बिस्मिल्ला खान यांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहण्यात आली. त्याचप्रमाणे आदरणीय श्री. बाळासाहेब भारदे यांच्यासंबंधी माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी अत्यंत चांगल्या शब्दामध्ये आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. आमच्यासारख्या कार्यकर्त्यांना श्री. बाळासाहेब भारदे यांच्या एकंदरीत राजकीय जीवनापासून बरेचसे शिकण्याजोगे आहे. अशा या आदर्शव्रत नेत्याला माझी भावपूर्ण श्रध्दांजली वाहून माझे भाषण संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : या सभागृहाचे नेते उपमुख्यमंत्री सन्माननीय श्री. आर. आर. पाटील यांनी याठिकाणी स्वर्गीय सर्वश्री. वसंतराव रघुनाथ पटवर्धन, पुंडलिक गणपतराव भानारकर, दशरथ हिरामण तायडे, संभाजीराव मारोतराव थोरात, भारतरत्न बिस्मिल्ला खान, विधानसभेचे माजी अध्यक्ष बाळासाहेब भारदे या दिवंगत नेत्यांना या सदनाच्या माध्यमातून याठिकाणी श्रध्दांजली अर्पण केली आहे. या श्रध्दांजलीच्या निमित्ताने सदनातील माननीय विरोधी पक्षनेते व अन्य दोन्ही बाजूकडील माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त करुन श्रध्दांजली अर्पण केली. सन्माननीय श्री.वसंतराव पटवर्धन हे खऱ्या अर्थाने रामभाऊ म्हाळगी प्रबोधनीचे कार्याध्यक्ष व एक जबरदस्त ध्येयवादी, सातत्याने संघटनेचा विचार करणारे आणि खऱ्या अर्थाने जनसंघ ते भाजप या पध्दतीने ध्येयवादाने प्रेरित होऊन ठाणे व अन्य विभागामध्ये काम करणारे लोकप्रतिनिधी होते. सन 1988 मध्ये कोकण विभाग पदवीधर मतदारसंघातून ते विधानपरिषदेवर निवडून आले होते. या ज्येष्ठ समाजसेवकाचे निधन शुक्रवार दिनांक 22 सप्टेंबर 2006 रोजी झाले..

स्वर्गीय श्री. दशरथ हिरामण तायडे हे महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा विधानपरिषदेमध्ये सन 1970 मध्ये निर्वाचित झाले होते. स्वातंत्र्य लढयामध्ये भाग घेऊन या स्वातंत्र्यवीराने कारावास भोगला होता. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ असो, गोवा मुक्ती आंदोलन असो त्यामध्ये त्यांनी हिरीरीने भाग घेतला होता. प्रथम काही दिवस कॉंग्रेस व त्यानंतर कम्युनिस्ट या पध्दतीने त्यांनी समाज जीवनात व राजकीय क्षेत्रात काम केले आहे.काही काळ शेतकरी कामगार पक्षाचे चिटणीस म्हणून त्यांना काम करण्याची संधी मिळाली. ते जळगाव जिल्हयातील लोकल बोर्डाचे सदस्य होते.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** (पुढे सुरु...

या समाजसेवकाचे निधन 19 नोव्हेंबर 2006 रोजी झालेले आहे.

स्व. संभाजीराव मारोतराव थोरात यांच्या सातारा जिल्हयामध्ये आणि पश्चिम महाराष्ट्रामध्ये संभाजीबाबा या नावाने उल्लेख केला जातो. स्व.यशवंतराव चव्हाण साहेबांच्या कुशल नेतृत्वाखाली सातारा जिल्ह्यामध्ये स्वातंत्रपूर्व काळामध्ये त्यांनी स्वातंत्र्य लढ्यामध्ये सक्रीय भाग घेतला. नंतरच्या काळामध्ये जिल्हा लोकल बोर्डाचे त्याचबरोबर कराड सहकारी साखर कारखान्याचे संचालक, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सदस्य या अनुषंगाने त्यांनी अनेक क्षेत्रामध्ये काम केले. स्व..संभाजीराव थोरात हे 1957 ते 1964 या कालावधीमध्ये दोन वेळा महाराष्ट्र विधनसभा सदस्यांद्वारे निर्वाचित झालेले होते. या ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्यांचे निधन 24 नोव्हेंबर 2006 रोजी झालेले आहे.

स्व.पुंडलिक गणपतराव भानारकर यांचा जन्म 1 जुलै 1924 साली झाला. स्व.भानारकर हे नागपूर शहर कॉंग्रेसचे कार्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य हातमाग मंडळ व विदर्भ गृहनिर्माण मंडळाचे सदस्य, अशा विविध क्षेत्रामध्ये त्यांनी काम केलेले आहे. कै.भानारकर 1971 व 1974 या कालावधीत दोन वेळा महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा महाराष्ट्र विधानपरिषदेवर निवडून आलेले होते. अशा या समाजसेवकाचे निधन 29 सप्टेंबर 2006 रोजी झालेले आहे.

"भारतरत्न" मरहुम बिस्मिल्ला खान हे भारताचे सनई सम्राट म्हणून ओळखले जातात. त्यांनी सनई वादनाद्वारे संपूर्ण देशाला आणि जगातील संगीत रसिकांना सातत्याने मंत्रमुग्ध केले आणि खऱ्या अर्थाने या देशाची जी संस्कृती आहे, त्याची ओळख जगाला करुन दिली. भारताचे स्थान उंच केले. भारत सरकारने विविध पध्दतीने त्यांना अनेक बहुमान दिले. त्यामध्ये देशातील सर्वोच्च असा 'भारतरत्न' हा किताब देऊन त्यांचा गौरव केलेला आहे. संगीत नाटक अकादमी अवॉर्ड, नेपाळ अकादमी अवॉर्ड, शांती निकेतन विद्यापीठाची सन्माननीय डॉक्टरेट, तानसेन अवॉर्ड असे अनेकविध सन्मान त्यांना प्राप्त झाले. म्हणून या देशाचा सर्वसामान्य समाजाचा एक ठेवा या अनुषंगाने स्व. बिस्मिल्ला खान यांचे स्मरण या देशामध्ये सातत्याने होईल. या महान कलावंताचे निधन 21 ऑगस्ट 2006 रोजी झाले.

स्व. त्र्यंबक शिवराम उर्फ बाळासाहेब भारदे यांचा जन्म नगरसारख्या विचाराने डाव्या सरणीच्या जिल्ह्यामध्ये झाला. ग्रामीण भागाचे नेतृत्व कसे निकोप असू शकते, किती प्रखर असू शकते याचे आगळेवेगळे उदाहरण म्हणजे स्व.बाळासोब भारदे यांचे जीवन चरित्र म्हणावे लागेल.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** (पुढे सुरु....

1952 ते 1972 या कालावधी सलग चार वेळा विधानसभेचे आमदार म्हणून ते निवडून आले. गावचे सरपंच, स्कूल बोर्डाचे चेअरमन, लोकल बोर्डाचे सदस्य म्हणून त्यांनी काम केले. सहकार विभागाचे मंत्री,त्या नंतरच्या काळामध्ये 10 वर्षे विधानसभेचे 'अध्यक्ष' म्हणून त्यांनी या महाराष्ट्राला खऱ्या अर्थाने अचूक आणि योग्य, प्रखर अशा पध्दतीचे मार्गदर्शन केलेले आहे.

यानंतर श्री.बरवड....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .....

राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या माध्यमातून आणि विधिमंडळाच्या माध्यमातून आपण सर्वांनी स्व. बाळासाहेब भारदे यांनी विधिमंडळामध्ये काम करीत असताना जे विचार या ठिकाणी मांडले त्याचा अत्यंत चांगल्या पध्दतीचा संग्रह तयार केला आणि त्यांच्या उपस्थितीतच त्या संग्रहाचे प्रकाशन केले. त्या दरम्यानच्या काळात त्यांचे अत्यंत जिवलग सहकारी सन्माननीय श्री. उल्हास पवार आणि माझी अनेक वेळा याबाबत चर्चा होत होती की, श्री. बाळासाहेब भारदे हे वयाच्या 92 व्या वर्षी या प्रकाशनाच्या निमित्ताने मुंबईपर्यंत कसे येऊ शकतील ? मीही अनेक वेळा विचार केला. एकवेळ तर पुण्याला हा कार्यक्रम घ्यावा असा विचार पुढे आला परंतु ज्यावेळी मला स्व. बाळासाहेब भारदे यांच्याबरोबर चर्चेची संधी मिळाली त्यावेळी त्यांनी सांगितले की, जरी माझी प्रकृती काहीशी बरी नसली तरी मी स्वत या अत्यंत महत्वाच्या कार्यक्रमाला मुंबईला येतो. त्यानंतर ते आपणा सर्वांच्या दर्शनाला या ठिकाणी उपस्थित राहिले. स्व. बाळासाहेब भारदे यांनी या महाराष्ट्रातील आणि देशातील असंघटित सामान्य समाजाच्या माध्यमातून लोकप्रतिनिधींनी कोणत्या पध्दतीने सेवा करावी याबाबतीत अत्यंत चांगल्या पध्दतीने काही सूत्रे बांधून दिलेली आहेत. स्व. बाळासाहेब भारदे यांना खऱ्या अर्थाने श्रध्दांजली वाहात असताना किंवा खऱ्या अर्थाने श्रध्दांजली वाहायची असेल तर या पुढच्या काळात लोकप्रतिनिधी या नात्याने आपण अनेकविध क्षेत्रामध्ये परखड असले पाहिजे आणि प्रसंगी कोणत्याही आमिषामुळे यत्किंचितही बदलणार नाही किंवा विचलित होणार नाही एवढी इच्छाशक्ती प्रबळ असणे गरजेचे आहे. अशा पध्दतीचे काम करीत असताना या समाजातील तळागाळातील जे कार्यकर्ते आहेत, तळागाळातील जी सामान्य जनता आहे त्या जनतेच्या अनुषंगाने रात्रंदिवस या कार्यकर्त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे. या पध्दतीने ज्यावेळी या ठिकाणी विचार करतो त्याअनुषंगाने जबरदस्त ध्येयवादाने प्रेरित होऊन समाजजीवनामध्ये आपण काम करण्याचा प्रयत्न केला तरच स्व. बाळासाहेब भारदे यांना या सदनाची आणि महाराष्ट्राची खऱ्या अर्थाने श्रध्दांजली अर्पण होईल. स्व. बाळासाहेब भारदे हे या सदनाचे सदस्य नव्हते परंतु या सदनाच्या दोन्ही बाजूने, माननीय विरोधी पक्ष नेते आणि सदनाचे नेते या दोघांनीही याबाबत या ठिकाणी जी सूचना केली ती अत्यंत मौलिक सूचना होती. त्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

**सभापती** ...

सूचनेचा स्वीकार करुन या ठिकाणी स्व. बाळासाहेब भारदे यांना सुध्दा आपण श्रध्दांजली अर्पण केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

( सदस्य उभे रहातात )

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत या सदनाचे माजी दिवंगत सदस्य त्याचबरोबर स्व. बाळासाहेब भारदे तसेच स्व. बिस्मिल्ला खान यांच्या नातेवाईकांना पाठविण्यात येईल. सदनाची बैठक मी अर्ध्या तासाकरिता तहकूब करीत आहे.

( सभागृहाची बैठक दु. 3.09 ते 3.40 वाजेपर्यंत स्थगित झाली )

-----

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>स्थगितीनंतर</u>**

**(<u>सभापतीस्थानी माननीय उप सभापती</u>)**

**पृ.शी.**: भंडारा जिल्ह्यातील खैरलांजी गावातील सुरेखा भोतमांगे व तिच्या 3 मुलांची केलेली हत्या

**मु.शी.**: भंडारा जिल्ह्यातील खैरलांजी गावातील सुरेखा भोतमांगे व तिच्या मुलांची केलेली हत्या या विषयावर सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, मधुकर सरपोतदार, दिवाकर रावते, विनोद तावडे, डॉ. दीपक सावंत, प्रा. शरद पाटील, सर्वश्री कपिल पाटील, जयंत प्र. पाटील, प्रा. जोगेंद्र कवाडे व श्री. रमेश निकोसे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

**उपसभापती** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी मी अडीच तासाचा वेळ दिलेला आहे. सूचना देणारे सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर हे आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री. पांडुरंग फुंडकर ( विरोधी पक्षनेता) : महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो.

"ज्याअर्थी, दिनांक 29 सप्टेंबर, 2006 रोजी मध्यरात्री भंडारा जिल्ह्यातील खैरलांजी गावात भोतमांगे या बौध्द कुटुंबाच्या घरातील सुरेखा भोतमांगे व तिच्या 3 मुलांची हत्या करण्यात आली आहे, आणि,

ज्याअर्थी, या घटनेला काही दिवस उलटतात न उलटतात तोच दिनांक 17 नोवहेंबर, 2006 रोजी ठाणे जिल्ह्यात याच घटनेची पुनरावृत्ती घडली व जव्हार तालुक्यातील देवतळी गावात भीमाबाई नडगे या महिलेचे अपहरण करुन तिची हत्या करण्यात आली, आणि,

ज्याअर्थी, या घटनांचा तपास करण्यामध्ये पोलिसांनी अक्षम्य कुचराई केली आहे, आणि,

ज्याअर्थी, या हत्याकांडांचे बरेचसे पुरावे नष्ट झाल्यामुळे खरे आरोपी सापडू शकलेले नाहीत, आणि,

ज्याअर्थी, घटना घडून कित्येक दिवस झाले तरी सरकारला जाग न आल्यामुळे राज्यभर घटनांचे पडसाद उमटले व ठिकठिकाणी हिंसाचार उसळला, आणि,





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर...)

ज्या अर्थी, हा हिंसाचार काबूत आणण्यास राज्य शासनास पूर्ण अपयश आले आहे, आणि,

ज्याअर्थी, स्वत: उप मुख्यमंत्री महोदयांनी, "पोलिसांनी प्रकरण व्यवस्थित हाताळले असते तर आज ही वेळ आली नसती" अशी कबुली दिली आहे,

त्याअर्थी, या अतिशय गंभीर व तातडीच्या विषयाबाबत चर्चा करण्यासाठी सभागृहाचे सर्व कामकाज बाजूला ठेऊन चर्चा करण्यात यावी.

या प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात करण्यापूर्वी सभापती महोदय, मी आपणास एक विनंती करु इच्छितो. सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांना देखील या प्रस्तावावर बोलायचे आहे. परंतु त्यांना मोर्चासाठी जावयाचे असल्याने "मला प्रथम बोलण्यास द्यावे" अशी त्यांनी मला विनंती केल्यामुळे मी माझा बोलण्याचा अधिकार कायम ठेवून सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांना प्रथम बोलू द्यावे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांना प्रथम बोलू देण्यास माझी हरकत नाही. त्यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री हर्षवर्धन पाटील :सभापती महोदय, आज शासकीय विधेयके पुर:स्थापित करण्याचे ठरलेले होते.

श्री. विनोद तावडे : सन्माननीय संसदीय कार्य मंत्र्यांना विषयाचे गांभीर्य दिसत नाही काय?

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**उपसभापती** : या सभागृहाच्या कामकाजाला आज जेव्हा सुरुवात झाली त्यावेळी माननीय सभापती याठिकाणी आसनस्थ होते. त्यावेळी असे ठरले की, शोकप्रस्तावावरील चर्चा संपल्यानंतर नियम 93 अन्वयेच्या प्रस्तावावर चर्चा घेण्यात येईल. तेव्हा माननीय सभापतींनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे आता चर्चेला सुरुवात होत आहे. सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी चर्चेला सुरुवात करावी.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, स्थगन प्रस्तावावर मला प्रथम बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपल्याला आणि सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.फुंडकर यांना धन्यवाद देतो. खरे पाहता खैरलांजी हत्याकांडाच्या संदर्भात सभागृह सुरु झाल्यानंतर सभागृहाचे कामकाज स्थगित व्हावयास पाहिजे होते. परंतु कधी शोक प्रस्तावाच्या निमित्ताने किंवा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ KTG/ MHM/ प्रथम श्री. भोगले 15:50

प्रा. जोगेंद्र कवाडे ....

माननीय उपसभापती महोदय, या प्रकरणाच्या संदर्भात संपूर्ण महाराष्ट्र पेटला होता असे असतांना माननीय गृहमंत्री म्हणतात की, हा प्रकार होऊन इतके दिवस लोक का शांत बसले होते? त्याच वेळेस आंदोलने का झाली नाहीत? हा प्रकार झाल्यानंतर इतके दिवस दलितांचे नेते आतापर्यंत गप्प का बसले होते? अशा प्रकारच्या बाता माननीय गृहमंत्र्यांनी केलेल्या आहेत, केल्या जात आहेत. मिडीयाच्या समोर अशा प्रकारचे आरोप केले जात आहे. हा प्रकार घडला तेव्हा संपूर्ण दलित समाज, बौध्द समाज धम्मचक्र प्रवर्तनाच्या दिनाच्या निमित्ताने नागपूर येथील दिक्षा भुमित जमला होता. पाच निष्पाप दलितांचे निघृण सामुहिक हत्याकांड घडले परंतु यामध्ये दोषी असलेल्या व्यक्तींवर कोणत्याही प्रकारची कारवाई पोलिसांकडून झाली नाही. सभापती महोदय, या संपूर्ण कालावधीत लॉजीकचा प्रश्न येतो. एवढा मोठा प्रकार घडल्यानंतर, एवढे मोठे हत्याकांड झ ााल्यानंतर, केवळ महाराष्ट्रालाच नाही तर संपूर्ण देशाला मानवतला काळिमा फासणारी ही घटना घडली असतांना डीएसपीला या प्रकरणाच्या संदर्भात काहीच माहिती माहिती मिळाली नाही? या घटनेचे पडसाड संपूर्ण देशात उमटू शकतात याची थोडीशी जाणीव देखील डीएसपींना झाली नसावी? सभापती महोदय, या संपूर्ण प्रकरणाची माहिती डीएसपी यांनी माननीय गृहमंत्र्यांना दिली नसावी, गृहखात्याला दिली नसावी असे आपल्याला वाटते काय? या घटनेच्या संदर्भात माझा माननीय गृहमंत्र्यांवर आरोप आहे की, भंडारा जिल्हयातील खैरलांजी येथील घटनेच्या संदर्भात जे काही पुरावे असतील ते नष्ट करुन टाका अशी भूमिका महाराष्ट्राच्या माननीय गृहमंत्र्यांनी गृहखात्याला दिलेली आहे. ही घटना घडल्यानंतर खैरलांजीला माननीय गृहमंत्र्यानी 15 दिवसांनी भेट दिलेली आहे. सभापती महोदय, त्या कालावधीत आम्ही काही आमदार सीपीएच्या कार्यक्रमानुसार युरोप दौ-यावर गेलो होतो. 22 तारखेला युरोप दौ-यावरुन आल्या नंतर मला माननीय गृहमंत्री विचारतात की, दलित नेते इतके दिवस कोठे गेले होते? सभापती महोदय, ही घटना घडल्यानंतर ठिकठिकाणी मोर्चे, आंदोलने, धरणे सुरु होती. असे असतांनाही संबंधिताविरुध्द कोणत्याही प्रकारची कारवाई झाली नाही. माननीय गृहमंत्री खैरलांजीत गेल्यानंतर त्यांनी सांगितले आहे की, ही जी घटना झाली त्यासंदर्भात आम्ही भोतमांगे कुटुंबाला मदत देऊ, जमीन देऊ. सामाजिक न्यायमंत्री माननीय हंडोरे साहेबांनी सांगितले आहे की, या कुटुंबाला 4.50 लक्ष

....2

प्रा. जोगेंद्र कवाडे...

रुपये मदत देऊ, जमीन देऊ, नोकरी देऊ, त्यांचे पुनर्वसन करु. परंतु सभापती महोदय, भोतमांगे कुटुंबात आता कोणीही शिल्लक राहिलेले नाही. जर कुटुंबात कोणीही शिल्लक नसेल तर आपण ही मदत कोणाला देणार आहात? आपण कोणाचे पुनर्वसन करणार आहात? हा माझा सवाल आहे. या प्रकरणात ज्यांनी गुन्हा केलेला आहे अशा जातीयवादी लोकांचेच आपण पुनर्वसन करणार आहात की काय असे वाटावयास लागले आहे. या राज्याचे गृहमंत्री तसेच या राज्याचे सरकार भोतमांगे कुटुंबाचे कसे काय पुनर्वसन करणार आहे? या प्रकरणात 44 लोकांना अटक केली, यासंदर्भात माझ्याकडे कात्रण सुध्दा आहे.

सभापती महोदय, कोल्हापूर जिल्हयातील पंचगंगेच्या किनारी वडंगी गाव आहे. जून, जुलैच्या महिन्यात गावामध्ये एका मातंग समाजाच्या माणसाने टपरी ठेवली म्हणून भांडण निर्माण झ ाले होते. यासंदर्भात पोलीस स्टेशनमध्ये तक्रार सुध्दा नोंदवली गेली. असे असतांना गावातील जातीयवादी, धर्मांध लोकांनी मातंग समाजाची 27 घरे पोलिसांच्या देखत जाळून टाकली. या घटनेमध्ये लहान मुले, म्हतारे, बायका यांना पोलिसांदेखत मारहाण करण्यात आली. गृहमंत्र्यांच्या पोलिसांदेखत मातंग समाजाची घरे जाळण्यात आली. या प्रकरणामध्ये 97 आरोपी होते परंतु या 97 आरोपींना नंतर निर्दोष सोडून देण्यात आले. या ठिकाणच्या मातंग समाजाची घरे जाळण्यात आली ही वस्तुस्थिती आहे. असे असतांना माननीय गृहमंत्री आणि माननीय मुख्यमंत्री म्हणतात की, आम्ही 44 लोकांना अटक केलेली आहे. सभापती महोदय, माननीय गृहमंत्र्यांनी घोषणा केली आहे की, हे प्रकरण सीआयडीकडे दिले जाईल. या प्रकरणाच्या संदर्भात सांगण्यात आले आहे की, ही घटना घडली त्या ठिकाणी दलित आणि मागावर्गीय अधिकारी तेथे होते.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

अधिकारी वर्ग दलित नसतो, मागासवर्गीय नसतो, मुख्यमंत्री, गृहमंत्री यांच्या आदेशानुसार तो काम करीत असतो. सभापती महोदय, भोतमांगे कुटुंबियांतील स्त्रियावर बलात्कार करण्यात आला, परंतु त्याचे पोस्टमार्टेम नीटपणे करण्यात आलेले नाही. कारण गृहमंत्र्यांच्या निदेशावरुन पोस्टमार्टेम चुकीचे करण्यात आले. बलात्कार झाल्यानंतर बलात्काराचा पंचनामा पाहिजे तसा करण्यात आलेला नाही अशाप्रकारची वस्तुस्थिती आहे. या प्रकरणात कलम 302 लावण्यात आले. परंतु 376 बलात्कारासंबंधीचे जे कलम आहे ते लावण्यात आलेले नाही. हे काय चालले आहे ? या दलित हत्याकांडामुळे संपूर्ण महाराष्ट्र उत्स्फूतपणे पेटून उठला. त्यांना कोणत्याही नेत्याची गरज नव्हती. लोकांना वाटले की, ज्या दलितांच्या भरवशावर आज लोकशाही आघाडीचे सरकार सत्तेवर आहे त्यांना संरक्षण देण्याऐवजी त्यांचाच नरसंहार चालू आहे.

सभापती महोदय, दिनांक 8 नोव्हेंबर रोजी मी नागपूर येथे मोर्चा काढला. या मोर्चास जवळपास 50 हजारांपेक्षा जास्त दलित कार्यकर्ते उपस्थित होते. अगदी शिस्तबध्द पध्दतीने हा मोर्चा काढण्यात आला. हा मोर्चा काढू नये असे मला सांगण्यात आले. त्यामुळे संपूर्ण नागपूर पेटून उठेल. पण मी सांगितले की, हा मोर्चा पूर्णपणे शिस्तबध्द पध्दतीमध्ये असेल. या मोर्चाच्या बंदोबस्तासाठी एकही पोलीस नको. अतिशय शांतपणे हा मोर्चा झाला. सभापती महोदय, या सर्व गोष्टींचा ऊहापोह करण्याचे कारण म्हणजे हे सरकार खरोखरच दलितांना संरक्षण देणारे सरकार आहे काय ?

सभापती महोदय, दिनांक 2 नोव्हेंबर रोजी मी स्वत: माननीय मुख्यमंत्र्यांना भेटलो आणि त्यांना पत्र देऊन सांगितले की, आपण खैरलांजी येथे भेट देणे आवश्यक आहे. आपण कामात व्यस्त असता हे मला माहीत आहे. तरी सुध्दा आपण खैरलांजी येथे भेट देणे आवश्यक आहे. याचे कारण असे की, गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांचे गृहखाते या प्रकरणात बदमाशी करीत आहेत. पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. आरोपींना पाठीशी घालण्याचा प्रयत्न होत आहे. या प्रकरणामध्ये भंडारा जिल्ह्यातील आमदार श्री.नाना पंचबुध्दे यांचे नातेवाईक गुंतलेले आहेत.ते राष्ट्रवादी पक्षाचे आहेत. त्यांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न होत आहे. पुरावे नष्ट करण्याचे काम गृहमंत्र्यांच्या आदेशावरुन झाले आहे.....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी ज्या सन्माननीय सदस्यांचा उल्लेख केला, ते या सदनाचे सदस्य नाहीत. तसेच त्यांनी आरोप करताना त्यांना नोटीस द्यावयास पाहिजे होती. त्यामुळे त्यांनी सन्माननीय सदस्यांचे नाव घेतलेले आहे ते नाव कामकाजातून काढून टाकण्यात यावे अशी माझी आपणास विनंती आहे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मी त्यांचेवर आरोप केलेला नाही. मी फक्त सांगितले की, या प्रकरणामध्ये त्यांचे नातेवाईक गुंतलेले आहेत. भैय्यालाल भोतमांगे यांच्या संपूर्ण कुटुंबाचा नरसंहार करण्यात आला. भंडारा जिल्हयातील तुमसरचे आमदार श्री.मधुकर कुकडे यांचा देखील भैय्यालाल भोतमांगे यांनी उल्लेख केला आहे. आमदार श्री.नानाभाऊ पंचबुध्दे यांचा देखील त्यांनी उल्लेख केलेला आहे. परंतु त्या संदर्भात कोणतीही चौकशी करण्यात आलेली नाही. हे सर्व काय सुरु आहे ? "ज्याचं जळतं त्यालाच कळतं" असे म्हणतात. श्री.आर.आर.पाटील गृहमंत्री झ ाल्यापासून सांगली जिल्हामध्ये, सातारा, सोलापूर व अन्य जिल्ह्यांमध्ये दलितांवर अत्याचार झाले आहेत.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे....

ज्या ज्या ठिकाणी अत्याचार करण्यात आले त्या त्या ठिकाणच्या पोलीस स्टेशनला अशा प्रकारे दलितांवर अत्याचार होत असतील तर त्याविरुध्द ॲट्रॉसिटी ॲक्टखाली गुन्हा रजिस्टर करु नका, अशा सूचना कदाचित गृह खात्याच्या वतीने दिलेल्या नाहीत ना अशी शंका आमच्या मनात आहे. दुर्दैवाने मला सांगावेसे वाटते की, आपल्या देशातील ज्या ज्या राज्यांमध्ये दलितांवर प्रचंड अत्याचार होतात त्यामध्ये पहिला क्रमांक उत्तर प्रदेशचा लागतो, त्यानंतर बिहारचा लागतो व त्यानंतर महाराष्ट्राचा लागतो. सर्वात शरमेची गोष्ट म्हणजे लोकशाही आघाडी सरकार ज्या फुले-शाहू-आंबेडकरांचे नांव घेतात त्या महाराष्ट्राचा या दलितांवरील अत्याचारांच्या प्रकरणांमध्ये चौथा क्रमांक लागतो. अत्याचार करणाऱ्या लोकांचे संरक्षण सत्ताधारी लोक करतात, असा आमचा आरोप आहे. सत्ताधारी पक्षातील जी जी नेतेमंडळी ॲट्रॉसिटी ॲक्ट रद्द करण्याची मागणी करतात, त्यासाठी मोर्चे काढून अत्याचारी विरोधी कायदा रद्द झाला पाहिजे अशी मागणी करतात, ते सरकार खऱ्याअर्थाने दलितांचे संरक्षण करणारे सरकार आहे का ? हा आमचा मुलभूत प्रश्न आहे. आज अनेक ठिकाणी अशाप्रकारे दलितांवर अत्याचार होत आहेत. अनेक मंत्र्यांच्या मतदारसंघाची नांवे मी सांगू शकतो की, कोणाच्या जिल्हयांमध्ये अशाप्रकारे किती अत्याचार झालेले आहेत. परंतु याठिकाणी मी जो मुद्दा मांडला आहे व जी मागणी केलेली आहे ती अशी की, जोपर्यंत खैरलांजी हत्याकांडामध्ये जे लोक हत्यारे, आरोपी आहेत, ज्यांचा पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला, त्याबाबतीत जोपर्यंत गृहमंत्र्यांना त्यांच्या पदावरुन हटविले जात नाही तोपर्यंत सीआयडी, सीबीआय किंवा इतर कुठल्याही प्रकारची चौकशीने कुठल्याही प्रकारचे पुरावे सापडणार नाहीत. आज पुराव्या अभावीच 94 आरोपिंना मोकळे सोडलेले आहे. आमचे गृहमंत्री म्हणतात की, प्रा.कवाडे हे गृहमंत्र्यांवर आरोप करतात. मी याठिकाणी सांगेन की, माननीय गृहमंत्र्यांनी जे 44 आरोपी पकडलेले आहेत त्यामध्ये आंधळगांवचे इन्स्पेक्टर आणि हवालदार यांना सहआरोपी केले आहे. त्यांनाच केवळ सहआरोपी करुन चालणार नाही तर त्यांच्यासोबत राज्याच्या गृहमंत्र्यांनाही या प्रकरणांमध्ये सहआरोपी केले पाहिजे व त्यांचीही चौकशी केली पाहिजे, अशा प्रकारची मागणी मी केलेली आहे. यामध्ये माझे काय चुकले ? पत्रकारांनी त्यांना विचारले की, प्रा.कवाडे यांनी तुम्हाला सहआरोपी करण्याची मागणी केलेली आहे, त्यावेळी गृहमंत्र्यांनी

..2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे...

सरकॅस्ट्रीक्ली उत्तर दिले की, ते उद्या मला फाशीवर टांगण्याची मागणी करतील. अशाप्रकारे अत्याचाऱ्यांना वाचविणाऱ्यांस फाशीवर न टांगता मुंबईच्या हुतात्मा चौकात नेऊन जोडयाने बदडले पाहिजे, अशा प्रवृत्तीचे हे लोक आहेत. सभापती महोदय, संपूर्ण राज्यामध्ये गृह खात्याच्या वतीने आतंक निर्माण केला जात आहे. आज नागपूरमध्ये आम्ही तमाम भीम संघटनेच्या वतीने अतिशय शांततापूर्णरितीने मोर्चा काढणार होतो. याबाबतीत आम्ही गॅरंटी व आश्वासन दिले होते की, अतिशय शांततापूर्णरितीने मोर्चा निघेल, याबाबतीत आपण काळजी करु नये. परंतु असे असतानाही आमच्या मोर्चाला परवानगी नाकारण्यात आली. आज याठिकाणी दहा हजार पोलीस तैनात करण्यात आले आहेत. नागपूर शहरामध्ये एसआरएफ, सीआरएफ, रॅपिड ॲक्शन फोर्स तैनात करुन दलितांच्या सर्व वस्त्यांवर नाकेबंदी करुन टाकण्यात आलेली आहे. मी समजू शकलो असतो की, इंग्रजांच्या व मोगलांच्या काळामध्ये असे झालेले आहे. माननीय बाळासाहेब भारदे यांना श्रध्दांजली अर्पण करताना सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांनी सांगितले की, माणसाला अशा प्रकारे शेंदूर खरडून खरडून दाखवू नका. या सरकारनेही शेंदूर खरडून खरडून समाजवादाचे स्वरुप बदलून हे सरकार किती दगडाचे आहे हे दाखवून देण्याची वेळ आता आलेली आहे. आज सोलापूर, औरंगाबाद, हिंगोली, अमरावती, नागपूरमध्ये काय झाले ?

नंतर श्री.रोझेकर.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे...........

राज्यात वेगवेगळया ठिकाणी आंदोलने झाली. सोलापूर जिल्हयामध्ये कर्फ्यू लावण्यात आला. मला या ठिकाणी या सभागृहाच्या माध्यमातून सांगावयाचे आहे की, दलितांचे जे आंदोलन सुरु आहे ते कोणत्याही धर्माविरुध्द, जातीविरुध्द नाही. गेल्या 2 महिन्यांपासून सातत्याने आंदोलन सुरु आहे, एकही उदाहरण दाखवून द्यावे की, कोणत्या जातीचा, धर्माचा उल्लेख या आंदोलनामध्ये झाला आहे. असे असेल तर हा दलित कार्यकर्ता, प्रा.जोगेंद्र कवाडे आपल्या आमदारकीचा राजीनामा देण्यास तयार आहे. परंतु, या सत्तेमध्ये असलेल्या काही लोकांनी दलितांमध्ये दहशत निर्माण करण्यासाठी दलितांविरुध्द प्रतिआंदोलन करण्याचा प्रयत्न केला. सोलापूरमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेसचे उपमहापौर यांनी भारतीय जनता पक्ष, जनसंघ, बजरंग दल वगैरे संघटनांना बरोबर घेऊन दलितांच्या विरुध्द प्रतिआंदोलन केले. आम्ही कोणत्या धर्माविरुध्द किंवा जातीविरुध्द नाही. आमचे भांडण आहे ते जातीयवादी शक्तींशी आहे, जातीयवादी शक्ती आहेत त्यांना ठेचून टाकले पाहिजे, कठोर शिक्षा दिली पाहिजे, त्यांना फाशीच्या तख्तावर लटकाविले गेले पाहिजे. परंतु हे सरकार अशा जातीयवाद्यांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न करीत आहे, त्यांच्याविरुध्द आमचे आंदोलन आहे. सरकारमधील काही लोकांनी, माझ्याकडे त्यांची नांवेही आहेत, मी त्यांची नांवे घेण्यास तयार आहे, माझ्याकडे पुरावे आहेत. जाणूनबुजून पक्षाच्या कार्यकर्त्यांना हाताशी धरुन दलितांविरुध्द प्रतिआंदोलन करण्याचा, दलितांमध्ये दहशत पसरविण्याचा प्रयत्न केला गेला. सभापती महोदय, मला जास्त वेळ बोलता येणार नाही कारण मला मोर्च्याला जावयाचे आहे, सन्माननीय उपमुख्यमंत्री, श्री.आर.आर.पाटील मला अटक करण्यासाठी टपून बसले आहेत. मी जेलमध्ये जायला घाबरत नाही, आतापर्यन्त 200 वेळा मी जेलमध्ये गेलो, मला ते काही नवीन नाही. नामांतराच्या आंदोलनामध्ये 28 जिल्हयांपैकी 22 जिल्हयांमध्ये भाषणे करण्यासाठी आणि प्रवेश करण्यासाठी मला बंदी घालण्यात आली होती. माझ्यावर हल्ले करण्यात आले, जीवनातून उठविण्याचा प्रयत्न करण्यात आला. परंतु, सन्माननीय बाबासाहेब आंबेडकराची जी शिकवण आहे त्यामुळे आम्ही दबून गेलो नाही. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिकवणुकीनुसार चालणारा हा जो दलित समाज आहे हा अत्याचाराविरुध्द उभा ठाकणारा समाज आहे. कोणत्याही समाजावर अत्याचार होओ, कोणत्याही जातीविरुध्द अत्याचार होवो धावून जाणारा हा दलित

..2......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे................

समाज आहे. अन्याय, अत्याचाराविरध्द प्राणांची बाजी लावून लढणारी ही फुले, शाहू, आंबेडकरांची जनता आहे. अन्याय, अत्याचाराविरुध्द आंदोलन करणा-या या दलित समाजामध्ये दहशत पसरविण्यासाठी प्रतिआंदोलन सुरु आहे. सोलापूरमध्ये ज्यावेळी कर्फ्यु लावण्यात आला त्यावेळी त्या ठिकाणी काय घडले ? कर्फ्यु लागल्यानंतर रस्त्यावर येणा-या जमावाला, माणसांना जेलमध्ये टाकण्यात येते, त्यांना पकडण्यात येते किंवा पोलीस स्टेशनमध्ये बंद करण्यात येते. परंतु, सोलापूर येथे कर्फ्यु कालावधीमध्ये आर.आर.पाटीलसाहेबांच्या पोलीस खात्याने कोणता नंगानाच घातला ? सोलापूर येथील दलितांच्या झोपडपट्टीत जावून, दारांवर लाथा मारुन, दरवाजे फोडून महिलांना, पोराबाळांना, म्हाता-या-कोता-यांना बाहेर काढण्यात आले. अमरावतीमध्ये तेच घडले, यवतमाळ, नागपूरमध्ये तेच झाले. हिंगोलीमध्ये अत्यंत फाटका-तुटका दलित समाज राहतो. या हातावर आणून पानावर घेणा-या गरीब समाजाने आंदोलन केले, मोर्चा काढला, कानपुरमध्ये बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळयाचे डोके छाटून टाकण्यात आले, संपूर्ण महाराष्ट्र पेटला, हिंगोलीमध्ये देखील आंदोलन झाले. मग त्यांनी कोणता गुन्हा केला ? परंतु, पोलिसांनी तेथील सुतारवाडीत जाऊन शिविगाळ केली, मारहाण केली. यापूर्वी राजकीय पक्षांची आंदोलने झाली, शिवसेना, भारतीय जनता पक्षाची आंदोलने झाली, ज्यावेळी हे लोक सत्तेवर नव्हते त्यावेळी यांनीही दगडं मारलेले आहेत, आंदोलने केली आहेत. कधी तरी यांची घरे फोडून पोलीस यांच्या घरात घुसले आहेत काय ?

यानंतर श्री.पुरी.............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे ..........

स्वर्गीय मिनाताई ठाकरे यांच्या पुतळयाची विटंबना झाली तेव्हा आंदोलन झाले. त्यावेळी कोणी त्यांच्या घरामध्ये घुसले काय ? खैरलांजीमध्ये 4 दलितांच्या हत्या करण्यात आल्या, बलात्कार करण्यात आले. परंतु आरोपींचा पी.सी.आर. 4 दिवस पोलीस खात्याने घेतला नाही. अमरावतीमध्ये आंदोलन करणा-या 70-70 वर्षाच्या लोकांचा, शाळकरी मुलांचा पी.सी.आर. घेऊन त्यांना पोलीस स्टेशनमध्ये डांबण्यात आले. हा कोणता न्याय आहे ? सभापती महोदय, किती खोटे बोलले जाते. माननीय गृहमंत्री महोदयांकडून आमची अशी अपेक्षा नव्हती. दलितांच्या आंदोलनामध्ये नक्षलवाद्यांचा हात आहे असे म्हणतांना सरकारला लाज वाटत नाही काय ? दलितांच्या आंदोलनामध्ये नक्षलवाद्यांचा हात आहे असे म्हणून दलितांच्या अस्मितेवर निखारे ठेवण्याचे काम माननीय श्री.आर.आर.पाटील यांनी केले आहे. त्यांनी 10 दिवसानंतर परिसंवादामध्ये असे सांगितले की, मी असे बोललोच नाही. दलितांच्या आंदोलनामध्ये नक्षलवाद्यांचा हात आहे असे वृत्तपत्रामध्ये छापून आले त्याच्या दुस-याच दिवशी तुम्ही याबाबतचा खुलासा का केला नाही ? 10 दिवसानंतर माननीय गृहमंत्री असे म्हणतात की, आंदोलनामध्ये नक्षलवाद्यांचा हात आहे असे मी म्हणालो नाही. दलितांचे हिटलरी आंदोलन आहे असा गृहमंत्र्यांनी पुण्यामध्ये उल्लेख केला. माननीय गृहमत्र्यांनी असा आरोप करावा ही महाराष्ट्राच्या दृष्टीने लांछनास्पद गोष्ट आहे. पोलिसांचा आतंकवाद दलितांमध्ये दहशत निर्माण करीत आहे. सभापती महोदय, पोलिसांची दडपशाही सरकार थांबविणार आहे की नाही ? असे सांगण्यात आले की, कलम 307 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. काही ठिकाणी कलम 121 अन्वये देशद्रोहाचा गुन्हा दाखल केला गेला. भोतमांगे परिवाराचा नरसंहार करण्यात आला. नरसंहार करणा-या किती लोकांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात आला ? सभापती महोदय, मी माननीय गृहमंत्र्यांना दोन तारखेला पत्र दिले. मी सहसा माझ्या हस्ताक्षरामध्ये पत्र लिहितो. मी पत्र दिले त्यावेळी माननीय उपमुख्यमंत्री त्यांच्या दालनामध्ये हाते. मी त्यांना असे सांगितले की, खैरलांजीमध्ये भयानक घटना घडलेली आहे आपण तेथे गेले पाहिजे. पत्रामध्ये मी तीन कारणे नमूद केली होती. माननीय श्री.आर.आर.पाटील यांचे खाते आरोपींना पाठिशी घालण्याचा प्रयत्न करीत आहे. पहिले कारण असे होते की, आपण तेथे गेलात तर पोलीस निपक्षपातीपणे चौकशी करतील. दुसरे कारण असे की, दलितांना दिलासा मिळेल

...2/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे ..........

आणि तिसरे कारण असे की, आपण तेथे स्वत: गेलात तर महाराष्ट्रामध्ये असा संदेश जाईल की, राज्याचे प्रमुख अत्याचाराच्या संदर्भात स्वत: लक्ष घालत आहेत त्यामुळे जातीयवादी शक्तीला धाक निर्माण होईल. माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी मला असे उत्तर दिले की, डिसेंबर महिन्यामध्ये हिवाळी अधिवेशन आहे त्यावेळी आपण बघू. महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्र्यांना एवढीही संवेदना नसावी ? महाराष्ट्राचे गृहमंत्री 15 दिवसानंतर तेथे गेले.

यानंतर श्री.सुंबरे .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. कवाडे ....

गेल्यानंतरही चौकशी करू वगैरेच गोष्टी. तेथे सारे दलित अधिकारी होते म्हणूनही सांगतात. पण आपल्या गृह खात्याच्या मंत्र्यांनी सांगितल्यानंतर त्या पद्धतीनेच या प्रकरणात चौकशी केली गेली., त्याप्रमाणेच पोस्ट मार्टेम रिपोर्ट करण्यात आला. सारे पुरावे नष्ट करण्यात आले. केवळ गृहमंत्र्यांच्या सांगण्यावरूनच हे सारे करण्यात आले असा माझा स्पष्ट आरोप आहे. तसे नसेल तर आपण ते सिद्ध करून दाखववे. आपल्याला माहिती असेलच की, मुंबईत युती सरकारच्या काळामध्ये रमाबाई आंबेडकर नगरामध्ये मनोहर कदम नावाच्या पोलीस अधिकाऱ्याने अंदाधुंद गोळीबार करून 11 मुडदे पाडले होते त्यावेळी आम्ही सारे, सन्माननीय उल्हास पवार यांना मी सांगू इच्छितो की, आपण सारे त्यावेळी रस्त्यावर आलो होतो. सन्माननीय श्री. भुजबळ साहेब आपण आमचे नेतृत्त्व केले होते. आपण सर्वांनीच त्या प्रकरणात आवाज उठविला होता. हा सारा इतिहास आहे. त्यावेळेस आपण मागणी केली होती की, युती सरकार बरखास्त झाले पाहिजे. राज्यामध्ये राष्ट्रपती राजवट आली पाहिजे. कारण त्यावेळी या राज्यात सत्तेवर असलेल्या युती सरकारची दलित विरोधी वागणूक त्याला कारणीभूत होती. अशा वेळी सरकार गंभीर नसेल तर त्या सरकारला सत्तेवर राहण्याचा काडीमात्र अधिकार नाही. म्हणून केंद्र सरकारने राज्यात राष्ट्रपती राजवट आणली पाहिजे अशी मागणी आम्ही केली होती. आता देखील या राज्य सरकारने, राज्याच्या गृहमंत्र्यांनी दलित विरोधी भूमिका घेतलेली आहे आणि म्हणून या राज्यात राष्ट्रपती राजवट आली पाहिजे ही आमची आज मागणी आहे. जे गृहमंत्री जातीयवाद्यांना संरक्षण देत असतील त्यांना या राज्यात क्षणभर देखील सत्तेवर ठेवले जात नाही हा मेसेज सर्वत्र गेला पाहिजे. दलितांवर अत्याचार करणाऱ्यांना पाठीशी घालणारे सरकार वा सरकार मधील कोणी मंत्री असतील तर त्यांना सत्तेवर राहता येणार नाही हे सगळ्यांना समजले पाहिजे. सभापती महोदय, मी या ठिकाणी माझ्या भाषणाचा लवकरच समारोप करणार आहे. तत्पूर्वी मी आपल्याला सांगू इच्छितो की, नासिक रोडला आंदोलन झाले, नाशिक बंद झाले होते. त्या ठिकाणी रंगनाथ ढाले नावाचा एक भीमसैनिक, जो रिक्षा चालवित होता, तो आपल्या रिक्षामध्ये प्रवासी घेऊन शिवाजी नगरामध्ये गेला. तेथे तो काही दगड वगैरे घेऊन गेलेला नव्हता, प्रवासी घेऊन गेला होता. त्याने प्रवाशांना तेथे सोडले आणि त्यानंतर शिवाजी नगरातील जातीयवाद्यांनी त्याला त्याच्या रिक्षातून बाहेर ओढून काढून दगडांनी ठेचून ठेचून मारले. ही काय परिस्थिती आहे ? उस्मानाबादला काय झाले ?

....... एचएच 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. कवाडे ...

तेथेही गोळीबार झाला. तेथे 3 लोकांना मृत्यू आला. माने नावाचा भीमसैनिक त्या गोळीबारामध्ये मेला म्हणून सांगण्यात आले. पण तो गोळीबारात मेलेला नाही तर पोलिसांनी बंदुकीच्या दस्त्यांनी मारून मारून त्याला ठार केले आहे. हे आहे आर.आर.पाटलांचे पोलीस खाते, म्हेत्रे साहेबांचे पोलीस खाते. आमच्या गृहमंत्र्यांनी कमरेचे सोडून डोक्याला तर गुंडाळले नाही ना ? अशी परिस्थिती असेल तर ती निश्चितच बरोबर नाही. सभापती महोदय, दिनेश वानखेडे नावाचा एक तरूण यामध्ये मरण पावला आहे. आमच्या महाराष्ट्राचे मुख्यमंत्री खोटे बोलणारे आहेत. .. अमरावतीमध्ये गोळीबार करण्याचे काहीही कारण नव्हते. ..

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, आता आपण 'मुख्यमंत्री किती खोटे आहेत' असे शब्द वापरले आहेत. यामध्ये 'खोटे' हा शब्द बरोबर नाही, संसदीय नाही. त्यामुळे तो शब्द मी रेकॉर्डमधून काढावयास सांगतो. आपल्याकडे सभागृहाची जी प्रतिष्ठ आहे त्यानुसार आपण वागले पाहिजे. त्यादृष्टीनेच मी तो शब्द रेकॉर्डवरून काढून टाकण्याचे निर्देश देतो. दुसरे म्हणजे या प्रस्तावावर बोलण्याची बऱ्याच सन्माननीय सदस्यांची इच्छा आहे. आपले भाषण सुरू होऊन आता 40 मिनिटे झाली आहेत. आपण आपल्या भाषणाचा लौकर समारोप केला तर बाकीच्या सदस्यांना देखील या प्रस्तावावर बोलण्यासाठी न्याय देता येईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आपण सन्माननीय सदस्य प्रा. कवाडे यांना बोलू द्यात. आपण त्यांना मोर्चा काढू देत नाहीत. आता येथे भाषण देखील करू देणार नाही का ?

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, 'खोटे' हा शब्द संसदीय नसेल तर आपण जरूर तो रेकॉर्डवरून काढून टाकावा. पण आमच्या राज्याचे गृहमंत्री किती असत्य बोलतात याचा एक इरसाल नमुना मी आपल्याला सांगतो. .....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( यानंतर श्री. सरफरे .... आयआय 1

DGS/ KGS/ 16:20

प्रा. जोगेंद्र कवाडे...

सभापती महोदय, ज्यावेळी अमरावतीला गोळीबार झाला. त्यावेळी माननीय उपमुख्यमंत्र्यांचा आम्हाला फोन आला की, आपण शांतता प्रस्थापित करा. मी त्यांना सांगितले की, आम्ही तेच करीत आहोत. दगडफेकीमध्ये भीमसैनिक जखमी झालेला आहे त्याच्या डोक्याला दगड लागला असल्यामुळे त्याला इस्पितळामध्ये ॲडमिट करण्यासाठी नागपूरच्या मेडिकल कॉलेजच्या सुपर स्पेशालिटी आयसीयूमध्ये घेऊन गेलो. तेव्हा तेथील डॉक्टरनी मला सांगितले की, त्या भीमसैनिकाच्या डोक्यात पोलिसांनी बंदुकीची गोळी घातली त्यामुळे तो शहीद झाला. पोलिसांच्या बंदुकीच्या गोळीने श्री.दिनेश वानखेडे हा भीमसैनिक मेला. त्याठिकाणी सुध्दा तो पोलिसांच्या बंदुकीच्या गोळीने मेला नाही असे असत्य सांगावयाचे? डॉक्टरचा अहवाल खोटा बोलतो कां? अशाप्रकारे खोटारडेपणा, असत्य कथन करुन आपण काय मिळविता? श्री. रंगनाथ ढाले हा शिवाजीनगर येथे रिक्शामधून चालला असतांना त्याला रिक्शामधून ओढून जीवे मारण्यात आले. आणि तो दगडफेक करीत होता म्हणून जमावाने त्याला पकडून मारले अशाप्रकारचे आरोप त्याच्यावरच करण्यात आले. अशाप्रकारे आपल्या पापावर पांघरुण टाकण्याचा प्रयत्न शासनाने करु नये. सभापती महोदय, नागपूरमध्ये मोर्चा निघाला. आम्ही याबाबत आमचा निषेध व्यक्त करु नये? व्यथा, वेदना व्यक्त करु नये? परंतु सरकार ज्या पध्दतीने चालले आहे,... सरकार म्हणते आम्ही त्यांच्या सर्व मागण्या मंजूर केल्या आहेत. किती मागण्या मंजूर केल्या आहेत? त्या भैय्यालाल भोतमांगे यास 4 लाख रुपये देतो, त्याला नोकरी देतो म्हणून सांगता. माझ्या भीमसैनिकांनी मुंबईमध्ये मुख्यमंत्र्यांच्या दालनाबाहेर हल्लाबोल केला तेव्हा त्यांना मारहाण करुन खाली आणण्यात आले. तेव्हा तेथील ए.सी.पी. म्हणतात की, भैय्यालाल भोतमांगे याला चार लाख रुपये दिले असतांना तुम्ही कशासाठी बोंबाबोंब करता? त्यावेळी श्री. मिलिंद सुर्वे नावाच्या मुंबईच्या अध्यक्षांनी त्या ए.सी.पी. ना सांगितले की, आम्ही तुम्हाला 50 लाख रुपये देतो.आमच्या प्रियंका, व सुरेखाच्या बाबतीत जे झाले ते तुमच्या बायको-मुलांच्या बाबतीत होऊ द्या. आज संपूर्ण राज्यामध्ये आतंकवाद, दहशतवाद, स्टेट टेरॅरिझमची भूमिका पोलीस खात्याने स्वीकारली आहे. आणि हे राज्य सरकार राज्यामध्ये सुरु असलेले आंदोलन दडपून टाकण्याचा प्रयत्न करीत आहे.माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे संपूर्ण राज्यामध्ये शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी आम्ही जीवापाड प्रयत्न करीत आहोत. परंतु जर पोलिसांचे दमनचक्र थांबले नाहीतर याचे गंभीर परिणाम संपूर्ण राज्यामध्ये दिसल्याशिवाय राहणार नाहीत याची जाणीव महाराष्ट्र सरकारने ठेवली पाहिजे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे...

कधी कधी वाटते की, काय हे सरकार आहे? कसले सरकार आहे? जातीयवाद्यांना साथ देणारे, दलितांवर अत्याचार करणाऱ्यांना पाठीशी घालणारे सरकार आहे. ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करु नका अशाप्रकारचे आदेश देणारे राज्याचे माननीय गृहमंत्री. या सरकारने या प्रकरणाचा निकाल लावून जर आरोपींना शिक्षा दिली गेली नाहीतर या सरकारच्या जातीयवादी भूमिकेचा निषेध करुन मला या सभागृहाच्या सदस्यत्वाचा राजीनामा द्यावा लागेल.आणि संपूर्ण देशामध्ये महाराष्ट्र सरकार किती जातीयवादी आहे हे दाखवून द्यावे लागेल. तेव्हा पहिल्यांदा पोलिसांचा आतंकवाद आपण थांबविला पाहिजे. त्याचबरोबर दलितांचे आंदोलन दडपण्यासाठी पोलिसांचे आतंकवादाचे हत्यार वापरणाऱ्या माननीय गृहमंत्र्यांनीही आपल्या पदावर राहता कामा नये, त्यांना पदावरुन हटवून टाकले पाहिजे. आणि केंद्र सरकारकडे माझी मागणी आहे की, ज्या पध्दतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगरमध्ये 18 दलितांना मारणाऱ्या श्री. मनोहर कदम या पोलीस इन्सपेक्टरला गुंडेवार आयोगाने दोषी ठरवून त्याच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला त्याला आपल्या माननीय गृहमंत्र्यांनी कोणती शिक्षा दिली? माननीय श्री.छगन भुजबळ साहेब आपण त्यावेळी गृहमंत्री होता, आपण श्री. मनोहर कदम याला प्रमोशन दिले. ज्या गुंडेवार आयोगाने दोषी ठरवून सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिल्यानंतर श्री. मनोहर कदम याला प्रमोशन देण्याची भूमिका सरकार घेते. अशाप्रकारे हे सरकार राज्यातील दलित, नवबौध्द, अल्पभूधारक, आदिवासी समाजाला न्याय देऊ शकत नाही. फक्त त्यांच्या मतांची झोळी घेऊन जात आहे, त्यांच्या मतांची तलवार हाती घेऊन त्यांचे निर्दालन करण्याचा प्रयत्न करीत आहे त्या सरकारचा मी धिक्कार करीत आहे, माननीय गृहमंत्र्यांचा धिक्कार करीत आहे. आणि या सरकारने न्याय दिला नाहीतर कदाचित या सरकारला गंभीर परिणाम भोगावे लागतील. अशाप्रकारे या सरकारचा धिक्कार करुन मी सभागृहाबाहेर पडत आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे साहेब सभागृहाबाहेर गेल्यानंतर त्यांना अटक होण्याची शक्यता आहे. तेव्हा आपण माननीय सदस्यांच्या अधिकाराचे रक्षण केले पाहिजे अशी माझी आपणास विनंती आहे.

**उपसभापती** : माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आपले भाषण सुरु करावे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KTG/ SBT/ पूर्वी श्री.सरफरे... 16:25

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, अत्यंत गंभीर आणि मानवतेला काळिमा फासणाऱ्या कृत्याच्या  निषेधाचा ठराव या ठिकाणी माडलेला आहे.

सभापती महोदय, गेल्या आठ-दहा दिवसामध्ये खैरलांजी येथील घटनेची महाराष्ट्रामध्ये चर्चा सुरु असताना, कानपूरला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचा अवमान केला गेला त्याचे पडसाद महाराष्ट्रामध्ये उमटले. खैरलांजीची घटना आणि बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या अवमानाची घटना यामुळे महाराष्ट्रातील जनतेस वेठीस धरले गेले.  100 कोटी रुपयाची नासधूस झ ाली आणि महाराष्ट्रातील जनसामान्यांचे जीवन सुरक्षित ठेवण्यास सरकारला अपयश आलेले आहे. म्हणून या प्रकरणामध्ये करावा, तेवढा निषेध थोडाच आहे. खैरलांजी प्रकरण महाराष्ट्रामध्ये घडले. अशाप्रकारचे हे एकच प्रकरण आहे असे नाही तर गेल्या दोन वर्षामध्ये दलितांवर अन्याय, अत्याचाराची मालिका तयार झालेली आहे. कधी ठाण्यामध्ये दलितांवर झालेला अत्याचार, कधी खैरलांजी येथील घटनेमध्ये झालेला अत्याचार, कधी पुणे जिल्ह्यात झालेले अत्याचार असतील. या अत्याचारामध्ये दलितच बळी गेलेले आहेत. त्या दलितांना न्याय दिला जात नाही. खैरलांजी प्रकरणामधून राज्यामध्ये ही परिस्थिती निर्माण झालेली आहे. या प्रकरणामध्ये दलित विरूध्द सवर्ण अशाप्रकारचा मेसेज देण्याचा प्रयत्न झालेला आहे. तो अत्यंत चुकीचा मेसेज आहे, असे मला वाटते. कारण सगळे सवर्ण हे दलितांच्या विरूध्द नाहीत. खैरलांजी येथें 29 सप्टेंबर 2006 रोजी एक घटना घडली. तेथील लोक एकदम श्री.भय्यालाल भोतमांगे यांच्या कुटुंबियावर धावून गेले, त्या ठिकाणी लोकांनी अन्याय केला, अत्याचार केला, असे प्रकरण झालेले नाही. पहिली घटना ही 3 सप्टेंबर रोजी घडली. श्री.सिदार्थ गजभिये खैरलांजी गावाच्या बाजूला असलेल्या एका गावामध्ये पोलीस पाटील आहेत. त्या पोलीस पाटलाचे खैरलांजी गावाच्या आजूबाजूला शेत असल्यामुळे त्यांच्या शेतामध्ये ते सतत जाणे-येणे करत असत. त्यांच्या शेतामध्ये काम करणाऱ्या महिलांनी मेहनतीचे पैसे मागितले म्हणून त्याने त्या महिलांच्या थोबाडीत मारले. या घटनेनंतर काही लोक त्याच्या शोधण्यासाठी गेले. श्री.सिध्दार्थ गजभिये याला काही लोकांनी मारहाण केली, त्यामध्ये ते जखमी झाले. त्यानंतर  त्यांनी या संदर्भात बाजूच्या गावातील म्हणजे आंधळगावच्या पोलीस स्टेशनवर तक्रार करण्याचा प्रयत्न केला, त्या ठिकाणच्या पोलीसांनी त्यांची तक्रार नोंदवून घेतली नाही. ते जखमी झालेले असल्यामुळे कामठी येथील दवाखान्यामध्ये उपचारासाठी भरती झाले. त्यांना आंधळगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये उपचारासाठी भरती केले असते तर प्रकरण एवढे पुढे गेले नसते.  आंधळगांवच्या पोलीस स्टेशनमध्ये त्यांची तक्रार



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (पुढे सुरु.....

नोंदवून घेण्यात आली नाही, त्यामुळे त्यांनी कामठी येथील पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविली आणि मागणी केली की, जे मारहाण करणारे पाच-सात लोक आहेत, त्यांच्यावर ॲट्रोसिटी ॲक्टखाली गुन्हा दाखल करावा.

यानंतर श्री.बरवड.....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ...

त्यांनी पोलीस स्टेशनला सांगितले की, मी दलित आहे. माझा अवमान करणाऱ्या शिव्या समोरच्या लोकांनी दिल्या. दलित म्हणून माझा अवमान केला म्हणून कलम 498 अन्वये ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल झाला पाहिजे. अशी मागणी श्री. गजभिये यांनी सातत्याने केली परंतु पोलिसांनी ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल केला नाही. त्या लोकांची पाच सहा दिवसांची पोलीस कस्टडी घेतली. त्यानंतर त्या आरोपींना मोहाडी येथील कोर्टासमोर हजर करण्यात आले. 29 सप्टेंबरला मोहाडीच्या कोर्टात त्यांची जमानत झाली. त्या ठिकाणी ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल झाला असता तर पुढचा प्रकार टळला असता. पोलिसांनी हलगर्जीपणा का केला हे समजले नाही. पोलिसांना वरुन आदेश होते काय ? सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी आरोप केला की वरुन दबाव आला की, ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करु नका म्हणून त्यांनी ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल केला नाही. त्यांची जमानत झाली. ते बाहेर आल्यानंतर आमच्याविरुध्द खोट्या तक्रारी केल्या, आम्हाला ॲट्रॉसिटीमध्ये अडकविण्याचा प्रयत्न केला म्हणून ते श्री. गजभिये यांना शोधण्यासाठी श्री. भोतमांगे यांच्या घरापर्यंत गेले. ज्यावेळी त्या ठिकाणी श्री. गजभिये दिसत नाहीत हे पाहिल्यानंतर त्यांनी श्री. भोतमांगे यांच्या घरावर हल्ला केला. हल्ला केल्यानंतर पुढचा चौकशीचा भाग आहे. पहिल्यांदा सी.बी.आय. चौकशी मान्य झाली नव्हती. माननीय गृहमंत्र्यांनी ती चौकशी का मान्य केली नाही हे समजले नाही. नंतर ती चौकशी मान्य करण्यात आली. माननीय मुख्यमंत्र्यांनी असे विधान केले की, श्री. भोतमांगे यांच्या प्रकरणामध्ये निश्चितपणे उशीर झालेला आहे, हलगर्जीपणा झालेला आहे. हे माननीय मुख्यमंत्र्यांचे वक्तव्य आहे. त्या ठिकाणी श्री. भोतमांगे यांची तक्रार दुसऱ्या दिवशी दाखल करण्यात आली. त्यानंतर आरोपींना पकडण्यासाठी त्यांना पुरेसा अवधी दिला. त्यानंतर ते प्रकरण वाढत गेले. त्यानंतर या ठिकाणी मोर्चा निघाला. मोर्चा निघाल्यानंतर खऱ्या अर्थाने हे प्रकरण उघडकीस आले. त्यानंतर पोलिसांची धावपळ सुरु झाली. त्यानंतर गुन्हा रजिस्टर झाला. त्या ठिकाणी आरोपींना पकडले नाही. त्यांना कशासाठी पाठीशी घातले ? सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी सांगितल्याप्रमाणे जे कोणी आरोपी असतील, मग ते भारतीय जनता पक्षवाले असोत किंवा राष्ट्रवादीवाले असोत, जे कोणी आरोपी असतील त्यांची सी.बी.आय.चौकशी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. पांडुरंग फुंडकर ....

होऊ द्या. "दूध का दूध और पानी का पानी" होऊ द्या. या ठिकाणी बसलेल्या सन्माननीय सदस्यांची त्याबाबतीत तक्रार राहणार नाही. परंतु पोलिसांनी अक्षम्य दुर्लक्ष केले. यामध्ये निश्चितपणे सुईचा काटा माननीय गृहमंत्र्यांवर जातो. माननीय गृहमंत्र्यांनी असे वक्तव्य केले की, दलित चळवळीमध्ये, आंबेडकरी चळवळीमध्ये नक्षवादी चळवळ शिरली आहे. दलित नक्षलाईट झालेले आहेत. फुले, आंबेडकरांच्या महाराष्ट्रामध्ये ज्या पध्दतीने 50 वर्षे दलित चळवळ चालू आहे त्या दलित चळवळीला बदनाम करुन चिथावणी देण्याचा प्रयत्न या राज्याच्या गृहमंत्र्यांनी केला. वातावरण पेटले. एका बाजूला दलितांना नक्षलाईट म्हणावयाचे आणि दुसऱ्या बाजूला सिव्हिल वॉर सारखी परिस्थिती निर्माण झाली अशा पध्दतीचे वक्तव्य या राज्याचे गृहमंत्री करतात त्यावेळी कोठे तरी एका समाजाला दुसऱ्या समाजाविरुध्द चिथावण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे त्याची प्रतिक्रया महाराष्ट्रामध्ये उमटली. ज्या ठिकाणी गुन्हा झाला त्या ठिकाणी पोलिसांनी प्रकरण नीट हाताळले असते, आरोपींना अटक केली असती तर हे प्रकरण वाढले नसते. कारण अशा प्रकारची असंख्य प्रकरणे महाराष्ट्रामध्ये घडतात आणि त्याच ठिकाणी त्याचा निपटारा केला जातो. श्री. भोतमांगे यांचे प्रकरण त्याच ठिकाणी निपटले नाही. त्याची प्रतिक्रिया अमरावतीमध्ये उमटली. श्री. भोतमांगे यांच्या परिवारावर झालेल्या अन्याय अत्याचाराविरुध्द अमरावती येथे दलितांनी मोर्चा काढला. त्यांचा आवाज दाबण्यासाठी त्यावेळी अमरावतीला दलिलांवर गोळीबार झाला. त्यानंतर या घटनेचे पडसाद संपूर्ण महाराष्ट्रभर उमटावयास लागले. महाराष्ट्रात भोतमांगे प्रकरणाची प्रतिक्रिया उमटत असताना कानपूरमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची विटंबना झाली आणि मग भोतमांगेच्या प्रकरणामुळे तापलेले दलित डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याच्या प्रकरणाच्या बाबतीत प्रतिक्रिया व्यक्त करु लागले. त्याची पुरेशी कल्पना गृह खात्याला आणि राज्याच्या इंटेलिजेंस ब्युरोला आली नाही. या राज्याचे इंटेलिजेंस ब्युरो आणि गृहखाते किती काम करते हे मुंबईमध्ये झालेल्या बॉम्बस्फोटाच्या वेळी दिसून आले. मुंबईमध्ये जे बॉम्बस्फोट झाले त्याच्या 18 दिवस आधी दिल्लीच्या इंटेलिजेंस ब्युरोने मुंबईच्या गृह खात्याला कळविले होते की,

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर...)

महाराष्ट्रामध्ये अशा अशा प्रकारचे बॉम्बस्फोट होण्याची शक्यता आहे. गर्दीची ठिकाणे, प्रार्थना स्थळे, पॉवर प्रोजेक्ट, बस स्टेशन्स, रेल्वे स्टेशन्स, फायनान्शियल इन्स्टिटयूशन्स अशा ठिकाणी अतिरेकी बॉम्बस्फोट घडवून आणण्याची शक्यता आहे असे दिल्लीच्या आय.बी.ने महाराष्ट्राच्या आय.बी.ला कळविले होते आणि त्याप्रमाणे मुंबईतील रेल्वे बॉम्बस्फोटामध्ये आणि मालेगावच्या बॉम्बस्फोटामध्ये शेकडो माणसे मृत्यूमुखी पडली. या घटनांना कोण जबाबदार आहे ? या घटनांना गृहखाते जबाबदार नाही काय ? ही आय.बी.ची जबाबदारी नाही हे राज्याचे गृहमंत्री नाकारु शकतात काय ? दिल्लीच्या आय.बी.ने पूर्व कल्पना दिलेली असताना देखील महाराष्ट्राच्या आय.बी.ने त्याकडे दुर्लक्ष केले. महाराष्ट्रामध्ये भोतमांगे प्रकरणी दलित बांधव संतप्त झालेले असताना त्यामध्ये डॉ. बाबासाहेबांच्या पुतळयाचा अवमान झाल्यामुळे सहाजिकच दलित बांधवाच्या संतप्त प्रतिक्रिया उमटतील म्हणून महाराष्ट्रामध्ये त्यासंदर्भात नीट व्यवस्था व्हायला पाहिजे होती ती झाली नाही. पोलिसांनी बघ्याची भूमिका घेतली. मी दलित तरुणांना दोष देणार नाही. आज महाराष्ट्राची शान असणारी डेक्क्न क्वीन गाडी आणि अन्य लोकल गाडया जाळण्यात आला. 150हून अधिक बसेसचे नुकसान झाले. सरकारी तसेच खाजगी मालमत्तेचे नुकसान झाले. या सर्व नुकसानीच्या बाबतीत मी दलित बांधवांना दोष देणार नाही तर मी राज्य सरकारला दोष देईन. या राज्यातील जनतेच्या मालमत्तेचे रक्षण करण्यास हे राज्य सरकार अपयशी ठरले आहे. या सर्व घटनांची जबाबदारी स्वीकारुन राज्याच्या गृहमंत्र्यांनी ताबडतोडीने राजीनामा द्यायला पाहिजे. परंतु जोपर्यन्त वरिष्ठ पदावरुन काढणार नाही तोपर्यन्त आपण राजीनामा द्यावयाचा नाही असेच जणू काही गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी ठरविलेले दिसते. गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील यांना "गाडगे महाराज" अशी पदवी दिली गेली. आज छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ.आंबेडकर, संत गाडगे महाराज यांच्या नावाने राजकारभार करणा-या या पुरोगामी महाराष्ट्रामध्ये दलितांवर अन्याय, अत्याचार होत असतील, दलित महिलांची नग्न धिंड काढली जात असेल, दलित महिलांवर बलात्कार केले जात असतील आणि आरोपींना पाठिशी घातले जात असेल तर अशा राज्यकर्त्यांना मंत्रीपदावर एक क्षण देखील राहाण्याचा अधिकार नाही. या राज्यातील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर...)

भोतमांगे प्रकरण आणि त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळयाच्या झालेल्या अवमान प्रकरणी या महाराष्ट्राला उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न झाला. अशा परिस्थितीत महाराष्ट्राचे गृह खाते महाराष्ट्रातील जनतेच्या मालमत्तेचे संरक्षण करु शकले नाही. पोलिसांनी केवळ बघ्याची भूमिका घेतली. म्हणून या सर्वांची जबाबदारी स्वीकारुन गृहमंत्र्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला पाहिजे. हे प्रकरण फार गंभीर आहे. सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी जे पोस्टर या ठिकाणी दाखवले त्याबाबतीत मी माझ्या प्रतिक्रिया व्यक्त करणार आहे. या प्रकरणाची जेव्हा सी.बी.आय. चौकशी होईल त्यावेळी सर्व गोष्टी उघड होतील. ज्या पध्दतीने हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न झोलेला आहे, या प्रकरणाला वेगळी दिशा देण्याचा प्रयत्न झालेला आहे ही बाब या सरकारला न शोभणारी आहे. या प्रकरणातील आरोपींना कठोर शिक्षा झाली पाहिजे. या राज्यातील उस्मानाबाद, सोलापूर, कोल्हापूर, संभाजीनगर, बुलढाणा, अकोला, अमरावती नागपूर या जिल्हयांमध्ये हिंसाचाराचा जो उद्रेक झाला त्याची चौकशी झाली पाहिजे. हा हिंसाचार रोखण्यामध्ये पोलिसांना कोणी आदेश दिले होते ? एका ठिकाणी मी प्रत्यक्ष हजर होतो. सरकारी गाड्या, एस.टी.बसेस, पोलीस गाडयांवर दगडफेक होत असताना, त्यांची मोडतोड होत असताना पोलीस मात्र बघ्याची भूमिका घेत होते.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...........

अशा पध्दतीने पोलीस वागले. कशासाठी हे केले? महाराष्ट्र ज्या पध्दतीने जळत होता, उद्ध्वस्त होत होता त्यावेळेला पोलिसांची भूमिका बघ्यांची होती. म्हणून या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन या प्रकरणास जबाबदार असणारे पोलीस खाते आणि त्या खात्याचे प्रमुख म्हणून श्री.आर.आर.पाटील यांनी राजीनामा द्यावा. या प्रकरणात सीबीआय चौकशी मान्य केली आहे. ती चौकशी होऊन आरोपींना शिक्षा व्हावी हाच हेतू हा प्रस्ताव आणण्यामागे आहे. म्हणून मी या प्रस्तावाद्वारे सरकारचा तीव्र शब्दात धिक्कार करतो, निंदा करतो.

सभापती महोदय, आजचीच घटना आहे. या शहरामध्ये रिपब्लिकन पक्षाने मोर्चा काढण्याची सरकारजवळ परवानगी मागितली. आज अधिवेशनाचा पहिला दिवस आहे. या नागपूर शहरामध्ये ही परंपरा आहे की, अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी अनेक मोर्चे या शहरामध्ये निघत असतात. दलितांवर अन्याय झाले, अत्याचार झाले त्यामुळे साहजिकच त्याची प्रतिक्रिया म्हणून रिपब्लिकन पक्षाने मोर्चाचे आयोजन केले होते. परंतु सरकारने परवानगी का दिली नाही? या महाराष्ट्र सरकारच्या गृहखात्याकडे प्रचंड पोलीस बळ असताना सरकारची मोर्चाला संरक्षण देण्याची ताकद नाही. मोर्चा थोपवण्याची, मोर्चाच्या माध्यमातून शहरामध्ये शांतता प्रस्थापित करण्याचे धैर्य नाही, सामर्थ्य नाही. जसे मोर्चा काढण्याचे आव्हान रिपब्लिकन पक्षाने दिले त्या पध्दतीने सरकारमध्ये धमक असती तर तुम्ही मोर्चा काढा, त्या मोर्चाला कशा प्रकारे तोंड द्यायचे ते आम्ही बघू असे उत्तर दिले गेले असते. परंतु सरकारने नांगी टाकली. एक नव्हे तर नागपूर शहरात निघणाऱ्या 26 मोर्चावर बंदी घालण्यात आली. मोर्चा निघाला तर तोडफोड होईल, हिंसक वळण लागेल अशा प्रकारची भीती बाळगून सत्ता असताना, पोलीस बळ असताना सरकारने शेपूट घालून मोर्चाला परवानगी नाकारली हे सरकारचे अपयश आहे. मोर्चाला बंदी घातली जाते. बोलायला बंदी घातली जाते. विमानतळावर उतरल्यानंतर नेत्यांना अटक करुन एक प्रकारे आणीबाणी लादण्याचा हा प्रकार आहे. हे सरकार कोणासाठी आहे? सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे याठिकाणी उपस्थित नाहीत. त्यांना मी सांगणार होतो, त्यांनी स्टेटमेंट केले की, युती सरकारच्या काळात दलितांवर अन्याय, अत्याचार झाले नाहीत तेवढे या सरकारच्या काळात झाले. असे वक्तव्य करुनही ते सत्ताधारी पक्षाच्या बाजूला कसे बसतात हे आम्हाला समजून येत नाही. हा लढा दलित विरुध्द सवर्ण असा नसून दलित विरुध्द पोलीस प्रशासन असा हा लढा आहे हा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...........

संदेश महाराष्ट्राच्या जनतेला देण्याची गरज आहे. हा संदेश आपल्या सभागृहाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या जनतेला देण्याची गरज गरज आहे. जनतेने घाबरुन जाण्याचे कारण नाही. दलितांचा लढा हा पोलीस प्रशासनाविरुध्द आहे. पोलीस प्रशासन या महाराष्ट्रातील जनतेचे संरक्षण करण्याचा निश्चितपणे प्रयत्न करील अशी धमक या सरकारमध्ये निश्चितपणे नाही. सभापती महोदय, आपण या सभागृहाचे सर्वेसर्वा आहात. सभागृहाच्या आणि सर्व लोकप्रतिनिधीच्या माध्यमातून आपण जनतेला हा संदेश द्यावा अशी विनंती करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

---------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (मुंबई शिक्षक) : सभापती महोदय, अतिशय अस्वस्थ मनाने या चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे. खैरलांजी गावामध्ये जी घटना घडली ती माणुसकीला काळिमा फासणारी होती याबद्दल या सदनामध्ये कोणाचे दुमत नाही. महाराष्ट्राची सभ्यता, संस्कृती, समतेची परंपरा या सगळ्यांचा कडेलोट खैरलांजीमध्ये झाला. त्या घटनेला शासन जबाबदार आहे असे कोणी म्हणत नाही. प्रश्न असा आहे की, त्या घटनेनंतर या लोकशाही आघाडीच्या सरकारने त्याची दखल कशी घेतली आणि सरकारने काय उपाययोजना केली हा खरा प्रश्न आहे. खैरलांजी नंतरच्या घडामोडींमध्ये शासनाचा विशेष करुन माननीय गृहमंत्र्यांच्या, त्याच्या खात्याचा व्यवहार काय राहिला, वागणूक काय राहिली, हा खरा प्रश्न आहे. आजची चर्चा त्या अनुषंगाने आहे. घटनेला दोन महिने झाल्यानंतर सुध्दा खरे गुन्हेगार अजूनही गजाआड केलेले नाहीत. घटना उशिरा कळली, उशिरा रिपोर्ट झाला असे गृहमंत्री सांगत होते. उशिरा कळली असे सांगत असतील तर ते त्यांचे अपयश आहे. कळल्यानंतर या खात्याने त्या घटनेची दखल कशी घेतली? सगळे पुरावे नष्ट करण्याकडे गृहखात्याचा पूर्णपणे भर होता.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील....

कोणत्याही प्रकारचे पुरावे ठेवण्यात आले नाहीत. या प्रकरणामध्ये नावाला अटक करण्यात आली. पुरावे नष्ट केल्यानंतर एका व्यक्तीला नावाला अटक करण्यात आली. पुरावे नसल्यामुळे कोणत्याही प्रकारची शिक्षा होणार नाही अशी भूमिका गृह खात्याकडून घेण्यात आली. दलित, आंबेडकरी चळवळीने जातीयवादी शक्तींच्या विरोधात तुमच्यांवर विश्वास टाकला. जे महात्मा फुले, बाबासाहेब आंबेडकर यांचे उठता बसता नाव घेतात त्यांच्यावर विश्वास दाखवून या जनतेने सरकारला मतदान केले त्या दलित जनतेला या सरकारने न्याय मिळवून देण्याऐवजी, विश्वास व संरक्षण देण्याऐवजी दडपशाही होते आहे. माननीय गृहमंत्र्याचे या प्रकरणाच्या संदर्भातील वक्तव्ये पाहिले तर आपल्याला दिसून येईल की, ती वक्तव्ये या समाजाला धमकावण्याचीच होती. या प्रकरणाच्या संदर्भात माननीय गृहमंत्री सुरुवातीला म्हणाले की, या घटनेमध्ये नक्षलवाद्यांचा हात आहे. परंतु 10 दिवसानंतर हेच गृहमंत्री म्हणाले की, मी "नक्षलवाद्यांचा" हात आहे असे मी म्हणालो नव्हतो. या प्रकरणाच्या संदर्भात एक बैठक घेण्यात आली होती त्या बैठकीमध्ये माननीय गृहमंत्री म्हणाले की, या घटनेचा फायदा "नक्षलवादी" घेतील असे मला म्हणावयाचे होते. याचा अर्थ या घटनेच्या संदर्भात माननीय गृहमंत्र्यांनी "नक्षलवाद्यांचा" उल्लेख केला होता हे सिध्द होते. इलेक्ट्रॉनिक्स मिडीया समोर त्यांनी जी काही वक्तव्ये आहेत ती जनतेने पाहिलेली आहेत. आता माननीय गृहमंत्र्यांनी सुरुवातीला केलेल्या वक्तव्याच्या संदर्भात काहीही सांगितले तरी त्यांना पहिल्या वक्तव्यापासून माघारी जाता येणार नाही. आंबेडकरी चळवळीचा इतिहास माननीय गृहमंत्र्यांना माहिती नसेल तर माननीय मंत्री श्री. छगन भुजबळ यांनी त्यांना यासंदर्भात इतिहास समजून सांगावा. सभापती महोदय, आंबेडकरी जनतेची लोकशाहीवर नितान्त श्रध्दा आहे. तोडाफोडीचा कोणताही मार्ग आंबेडकरी विचारसरणीचे लोक अवलंब करीत नाही. आंबेडकरी जनतेने लोकशाही मार्गानेच आंदोलने केलेली आहेत. परंतु आंबेडकरी चळवळीच्या संदर्भातील माहिती माननीय गृहमंत्र्यांना नसेल तर त्यांनी यासंदर्भात माहिती घ्यावी. त्यांनी आंबेडकरी चळवळीचा इतिहास समजून घ्यावा. काही घटना अशा असतात की, माणसांना राग येतो व त्यामुळे असा उद्रेक होतो. परंतु या घटनेच्या संदर्भात मला म्हणावयाचे आहे की, या प्रकरणात माननीय गृहमंत्र्यांनी जाणूनबुजून "नक्षलवाद्यांचा" हात आहे असे वक्तव्य केलेले आहे. त्यानंतर त्यांनी दुसरे

....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

04-12-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) NN-2

SGJ/ MHM/ प्रथम श्री. भोगले 16:45

श्री. कपिल पाटील.....

असे वक्तव्य केले की, हे आंदोलन हिटलरी पध्दतीचे आहे. जर ते या आंदालनाला हिटलरी पध्दतीचे आंदोलन म्हणत असतील तर त्यांना सांगितले पाहिजे की फॅसिझमचा उदय राष्ट्रवादाचा पुकाराकरिताच झालेला आहे हे लक्षात घ्यावे. खरे म्हणजे तुमचीच वाट हिटलरी पध्दतीकडे चालली आहे. तुमच्या पक्षाच्या नावातच " राष्ट्रवादी " असल्याचा उल्लेख आहे. आज दलित समाजाने या घटनेच्या संदर्भात एका मोर्चाचे आयोजन केले होते. परंतु या मोर्चाला अनुमती दिली गेली नाही. उलट या मोर्चाला सामोरे जाऊन त्यांच्याशी शासनाने चर्चा करावयास पाहिजे होती. परंतु तसे झालेले नाही. या प्रकरणाच्या संदर्भात अमरावती येथील समाजातील धुरीणांनी, साहित्यिकांनी मोर्चा काढला होता तेव्हा त्या तरुणांच्या हातात बंदुका होत्या काय? मंत्रालयात सहाव्या मजल्यावर आंबेडकरी चळवळीतील महानायिका गेल्या होत्या तेव्हा त्यांच्या हातात काय बंदुका आणि दगड होते काय? उलट त्यांना अटक करुन कोर्टाकडून 10-10 दिवसाचा रिमांड घेण्यात आला आणि त्यांच्यावर देशद्रोहयाचे खटले दाखल करण्यात आले. खैरलांजीच्या प्रकरणात दोषी लोकांना अटक व्हावी अशी त्या जनतेची इच्छा होती, न्याय मिळावा अशी त्यांची मागणी होती परंतु माननीय गृहमंत्र्यांनी त्यांच्या आंदोलनातून सिव्हील वॉर होऊ शकते म्हणून त्यानुसार आंदोलन कर्त्यांवर कडक कारवाई करण्यात येईल अशी धमकी दिली. सिव्हील वॉर काय असते हे माननीय गृहमंत्र्यांना माहित आहे का? ज्यांना सिव्हील वॉरचा अर्थ माहिती नसेल तर त्यांनी कॉलेजमध्ये जाऊन यासंदर्भात धडे घ्यावे. अशा या गृहमंत्र्यांना एक क्षणभर देखील गृहमंत्र्यांच्या खुर्चीवर बसण्याचा अधिकार राहिलेला नाही. त्यांना सवर्ण विरुध्द दलित असा संघर्ष पेटवायचा आहे असे दिसते. याचा अर्थ असा की, माननीय गृहमंत्र्यांनाच राज्यामध्ये सिव्हील वॉर आणावयाचे आहे. ही अतिशय गंभीर बाब आहे. जसा धर्मराज युधिष्ठिराचा रथ जमिनीच्या दोन फुटावरुन चालत असे तसाच माननीय गृहमंत्र्यांचा रथ जमिनीच्या दोन फुटावरुन चाललेला दिसतो. महाराष्ट्रातील जनता माननीय गृहमंत्र्यांना संतगाडगे महाराज मानते, परंतु त्याचीच हवा माननीय गृहमंत्र्यांच्या डोक्यात गेलेली दिसते. लोक म्हणतात की, माननीय गृहमंत्री भोळे आहेत, भाबडे आहेत परंतु मी असे मानत नाही. माननीय गृहमंत्री अत्यंत हुशार आहेत, भोळे आणि भाबडेही मुळीच नाहीत.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील.....

ते भोळीभाबडी वक्तव्ये करीत नाहीत. खैरलांजी हत्याकांडानंतर त्यांनी एकापाठोपाठ केलेली वक्तव्ये आपण वाचावीत. त्यांनी सुरुवातीला "नक्षलवाद्यांचा हात आहे" असे वक्तव्य करुन पोलिसांना मेसेज दिला की, पोलिसांनी हे प्रकरण नक्षलवादी समजून आंदोलकांना गोळ्या घालाव्यात, त्यामुळे आधी संयमाने वागणारे पोलीस आक्रमक झाले. गृहमंत्र्यांनी जाणीवपूर्वक हा मेसेज दिला की हे आंदोलन दडपून टाका. नक्षलवादी समजून त्यांना गोळ्या घाला. नंतर ते"हिटलरी" म्हणाले त्यानंतर ते या आंदोलनाला "सिव्हील वॉर" म्हणाले. सभापती महोदय, आज नागपूरला पोलीस छावणीचे स्वरुप आलेले आहे. इमर्जन्सीपेक्षा हे मोठे स्वरुप आहे. या संदर्भात मागे दोन बैठका झाल्या त्यावेळी मंत्री श्री.छगन भुजबळ उपस्थित होते. आरपीआय नेत्यांनी मोर्चा काढण्याची परवानगी मागितली. शांतपणे मोर्चा काढू, लोकशाहीच्या मार्गाने मोर्चा काढण्यात येईल असे सांगितले पण त्यांना परवानगी देण्यात आली नाही. ज्यावेळी लोकशाही मार्गाने परवानगी दिली जात नाही अशावेळी लोकांच्या भावनाचा स्फोट होतो. या मोर्चाची सर्व जबाबदारी आम्ही घेतो असे नेत्यांनी सांगितले. तरी देखील परवानगी नाकारण्यात आली. आम्हाला सांगण्यात आले की, गुप्तचर विभागाकडून माहिती मिळाली आहे की, यामध्ये काही दगाफटका होण्याची शक्यता आहे. सरकारला मुंबईतील बॉम्बस्फोटाची माहिती मिळाली होती, तरी देखील मुंबईत बॉम्बस्फोट झाले आणि अजून गुन्हेगारांना पकडण्यात आलेले नाही. कोणत्या तरी भुरट्या चोराला पकडण्यात येते आणि सांगितले जाते की, आम्ही गुन्हेगारांना पकडले. सभापती महोदय, समता मोर्चा ऐवजी शांती मार्च ठरली. दीक्षा भूमीवर शांतीसभा होणार होती, ती सभा देखील दडपण्यात आली. सह्याद्रीवर जी बैठक झाली होती त्या बैठकीस राज्यमंत्री श्री. प्रीतमकुमार शेगावंकर उपस्थित होते. श्री.अरुण गुजराथी हे देखील उपस्थित होते. ते शांती मोर्चास सामोरे जाण्यास तयार होते. त्यावेळी माननीय गृहमंत्र्यांनी सांगितले की,नेत्यांना अटक करा. सभापती महोदय, शांतता प्रस्थपित करण्यासाठी सरकार नेत्यांना बोलाविते. मात्र त्यांच्यावर देशद्रोहाचा खटला भरण्यात येतो. हे सर्व नियोजन करुन करण्यात आलेले आहे. ॲड.सुलेखा कुंभारे यांना चर्चेसाठी बोलाविले, परंतु त्यांच्यावर देशद्रोहाचा खटला भरण्यात आलेला आहे. त्यांच्यावर जर देशद्रोहाचा खटला आहे तर त्यांना अटक करुन तुरुंगात का नाही पाठवत ? ती हिम्मत या सरकारमध्ये नाही.

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील.....

सभापती महोदय, नगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये या सरकारला फायदा झाला असला तरी हा फायदा त्यांना दीर्घकाळ होणार नाही हे मी येथे नम्रपणे सांगू इच्छितो. सभापती महोदय, ज्या दोन बैठका झाल्या त्यामध्ये गृहमंत्री आमच्यासमोर जे बोलले त्याची दखल घेणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे म्हणाले ते खरे आहे की, पोलीस आपले कर्तव्य बजावित असताना जातपात पाहत नाही. पोलीस गृहमंत्र्यांच्या सांगण्यावरुन काम करीत असतात. खैरलांजी प्रकरण घडल्यानंतर माननीय गृहमंत्र्यांनी पोलिसांची आणि हल्लेखोरांची जात सांगितली. माननीय गृहमंत्री पोवार, कलाल, ओबीसी, दलित इत्यादी जातींचा उल्लेख का करता ? खैरलांजी येथे दलित कुटुंबावर जो अमानुष अत्याचार झाला, त्याचा सर्वथरांतून धिक्कार झालेला आहे. जर एखाद्या पोवाराने हल्ला केला असेल तर त्या संपूर्ण जातीला दोष कशाला देता ? जर एखाद्या कलाल जातीतील व्यक्तीने असे कृत्य केले असेल तर त्या संपूर्ण कलाल जातीला दोषी कशाला ठरविता ? अशाप्रकारे जातींचा उल्लेख करुन गृहमंत्री दलितांना का बदनाम करीत आहेत ? ओबीसी विरुध्द दलित यांच्यामध्ये भांडण लावण्याचा प्रयत्न झाला. यामध्ये कुणबी समाजाला देखील ओढले. मराठ्यांना एसएमएस पाठवून त्यांना देखील या वातावरणात ओढण्यात आले. म्हणून गृहमंत्री हे भोळे भाबडे आहेत असे मानायला मी तयार नाही. त्यांनी अतिशय नियोजन पध्दतीने समाजामध्ये विद्वेष पेरण्याचे काम केलेले आहे. तेव्हा त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला पाहिजे. जर ते राजीनामा देत नसतील तर त्यांना त्या खुर्चीवरुन हाकलले पाहिजे आणि ती जबाबदारी आपली आहे. या महाराष्ट्राची एक गौरवशाली पंरपरा आहे. यापूर्वीच्या गृहमंत्र्यांनी अशाप्रकारची कधीही वक्तव्ये केलेली नाहीत.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील...

कुठल्याही पक्षाच्या गृहमंत्र्यांनी अशा पध्दतीची भाषा केली नसती. एखाद्या पदाची शपथ घेत असताना त्या पदावर राहून चांगले काम करण्याच्या दृष्टीने शपथ घेतली जाते. त्याचप्रमाणे माननीय गृहमंत्र्यांनी गृहमंत्री पदाची शपथ घेतली. परंतु माननीय गृहमंत्री हे काय करीत आहेत ? अशाप्रकारचे बळ वापरुन आपण काय साध्य करीत आहात, हे आम्हाला माहीत आहे. जिल्हा परिषदांच्या निवडणुका डोळयांसमोर ठेऊन हे सर्व करीत आहात. आपल्याला नगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये थोडासा फायदा झाला असेल. परंतु हा प्रश्न अतिशय गंभीर आहे. या महाराष्ट्रात उद्रेक निर्माण करण्याचे काम माननीय गृहमंत्र्यांकडून होत आहे, याची आपण दखल घेतली पाहिजे. खैरलांजी प्रकरणांमुळे महाराष्ट्रात ज्या पध्दतीने उद्रेक झाला, तो स्वाभाविक होता. माननीय सभापती महोदय, आपण उल्हासनगरला शांततेसाठी गेला होतात. मला याठिकाणी काही घटना सांगावयाच्या आहेत. हे सरकार सत्तेवर आल्यानंतर मला असे वाटले होते की, अत्याचारामध्ये घट होईल. परंतु प्रत्यक्षात 40 टक्क्यांनी अत्याचार वाढलेले आहेत. असे गृहमंत्री राज्याला लाभल्यामुळे असे अत्याचार वाढणार नाहीत तर काय होणार ? हे गृहमंत्री आल्यानंतरच अधिक अत्याचार वाढलेले आहेत. गेल्या तीन-चार महिन्यांमध्ये अत्याचाराच्या घटना मी सांगू इच्छितो. जालना जिल्हयामध्ये अंबडभारडी मध्ये बौध्दांच्या जमिनीवरील वीज कनेक्शन आणि पाणीपुरवठा बंद करण्यात आला. तक्रार केल्यास मुडदे पाडू अशा धमक्या देऊन बहिष्कार टाकण्यात आला. उस्मानाबाद जिल्हयातील नारंगवाडी येथे मोहन गायकवाड या दलिताला झाडाला बांधून फाशी देण्यात आली व या प्रकरणी आत्महत्येचा गुन्हा नोंदविण्यात आला. जालना जिल्हयातील मंठा येथील आंबोडकदम या गावी आरपीआयचा बोर्ड लावला म्हणून दलित वस्तीवर हल्ला करुन बेदम मारहाण करण्यात आली. उस्मानाबाद जिल्हयातील उमरगा येथील आलुर या गावी दलित वस्तीवर सामुहिक हल्ला झाला. बीड जिल्हयातील परळी येथे बौध्द महिलेच्या अंत्ययात्रेवर हल्ला करण्यात आला. लातूर जिल्हयातील आरसखेडा या गावात गायरान जमिनी हडप करण्यासाठी मातंग वस्तीवर सामुहिक हल्ला आणि बहिष्कार टाकण्यात आला. रायगड जिल्हयातील माणगाव येथे दलितांच्या पाणी पिण्याच्या विहिरीत विष्टा टाकण्यात आली. पुणे जिल्हयातील यरवडी येथे बौध्द-मातंग-भटक्या विमुक्तांना मारहाण करुन गावातून हाकलून काढण्यात आले. एवढेच नव्हे तर माननीय गृहमंत्र्यांच्या सांगली जिल्हयातील तासगाव

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील...

मतदारसंघामध्ये 50 एकर महारवतन जमीन मातब्बर व्यक्तिंच्या नावे करण्यात आली. हे कोणी केले ? हे कोणाच्या संरक्षणामुळे झाले ? हे त्यांनीच केलेले आहे. हे त्यांच्या संरक्षणाशिवाय होऊच शकत नाही. परवा हुतेगांवमध्ये पाण्यावरुन वाद झाला. त्याठिकणी मुंबईचा मातंग समाजाचा तरुण पाण्याच्या हक्कासाठी भांडला म्हणून त्याला उभे जाळण्यात आले. त्याला कोणी जाळले ? जाळणाऱ्याला सोडविण्याच्या दृष्टीने पूर्ण व्यवस्था करण्यात आली. त्याच्यावर त्याच पध्दतीचे गुन्हे नोंद करण्यात आले होते. ज्यांनी जाळले त्यांना जालना जिल्हयात राष्ट्रवादी कॉंग्रेसने सगळयात मोठे पद दिले. असे जर होत असेल तर आम्ही आपल्याकडे कोणत्या आशेने पहावे ? आपल्या राज्यातील आपणच घडवलेल्या या घटना आहेत. तसेच, सातारा जिल्हयातील लिंबगाव येथे तीन ठिकाणी सामुहिक बहिष्कार टाकण्यात आला. मुंबई विक्रोळी पार्कसाईटमध्ये मतिमंद असलेल्या दलित मुलीवर बलात्कार करण्यात आला. एक महिना सतत तक्रार करुनही आरोपींना अटक झालेली नाही. आज उल्हासनगरमध्ये कोणता प्रकार झाला. मी माननीय गृहमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी आणखी एका कारणास्तव करीत आहे. उल्हासनगरमध्ये डेक्कन क्वीन गाडी जाळण्यात आली. दीडशे वर्षांची परंपरा असलेली, पुण्या-मुंबईचे नाते सांगणारी डेक्कन क्वीन गाडी जाळण्यात आली. उल्हासनगरमध्येच ही गाडी अडवून जाळण्यात आली. तेथे जाणीवपूर्वक डेक्कन क्वीन गाडी जाळण्यात आलेली आहे. कोयना एक्सप्रेस गाडी सोडून देऊन, तिचा अडथळा दूर करुन मुद्दामहून डेक्कन क्वीन गाडी जाळण्यात आली. डेक्कन क्वीन गाडी अडवून ती रिकामी करुन जाळली. ती आंबेडकरी कार्यकर्त्यांनी जाळलेली नाही. माझा आरोप आहे की, हे कोणी केले ? हे उल्हासनगरमध्येच कसे झाले ? उल्हासनगरमध्ये आपले संरक्षण असल्याशिवाय डेक्कन क्वीन गाडी कोणी जाळू शकत नाही. जाणीवपूर्वक मेसेज जाण्याच्या दृष्टीने व खैरलांजी.....

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सभागृहाची वेळ 5 वाजेपर्यन्त आहे. सध्या चालू असलेली चर्चा आणि माननीय मंत्र्यांचे उत्तर संपेपर्यन्त सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे. सन्माननीय सदस्य, श्री.कपिल पाटील यांच्या भाषणानंतर मी तालिका सभापतींची नांवे जाहीर करणार आहे कारण मला कुणावरही अन्याय करावयाचा नाही.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, आपण आसनस्थ आहात म्हणून डेक्कन क्विनसंबंधी घडलेल्या घटनेवर बोलण्याचे धारिष्टय मी करीत आहे. कारण, आपल्याला या घटनेमागील बारकावे माहित आहेत. मी या ठिकाणी आणलेले या घटनेचे फोटो आपल्याला सादर करीत आहे. सगळया घटनेचे सकाळी 11 वाजेपासूनचे फोटो आहेत. या घटनेचे फोटो पाहिले तर डेक्कन क्विन कशी जळाली, कुणी जाळली हे समजू शकेल. याच गाडीने प्रसिध्द गायिका, श्रीमती आशा भोसले या देखील प्रवास करीत होत्या. कार्यकर्त्यांनी त्यांना गाडीतून उतरविले, त्यांना चहापाणी दिले, त्यांना टॅक्सी मिळवून दिली व घरी सोडले. त्याच गाडीचा मोटरमन, श्री.भोजने यांना त्या गाडीबद्दल फार प्रेम होते, ही व्यक्ति 2 दिवस अस्वस्थ होती. परंतु, श्री.भोजने दुस-या दिवशी पोलीस स्टेशनमध्ये गेले आणि त्यांनी सांगितले की, ज्या कार्यकर्त्यांनी मला गाडीबाहेर काढले, मला वाचविले ते कार्यकर्ते गाडी जाळणार नाहीत. या मोटरमनची जिद्द, कार्यनिष्ठा पहा की, गाडी जळत असतांना त्याने गाडी सोडली नव्हती. परंतु, कार्यकर्त्यांनी त्यांना वाचविले आणि डोंबिवलीला सोडले. ज्यावेळी आंदोलन झाले त्यावेळी पोलिसांनी सर्व कार्यकर्त्यांना पांगविले. सर्व सुनसान झ ााल्यानंतर 1 तासानंतर पोलिसांच्या साक्षीने गाडी जाळण्यात आली. सोलापूरला दलित कार्यकर्त्यांवर गोळीबार झाला. परंतु, एवढी मोठी गाडी जळत असतांना मात्र एकही गोळी पोलिसांकडून सुटली नाही, याचा अर्थ काय ? कारण, पोलिसांना ही गाडी जळू द्यायची होती म्हणून एकही गोळी सुटली नाही. जो दलित तरुण आंदोलन करीत आहे त्यांच्यावर मात्र गोळया झाडल्या जात आहेत, पायावर नाही तर मेंदुवर गोळया झाडल्या जात आहेत. या सभागृहाच्या काही मर्यादा आहेत म्हणून काही गोष्टी मला या ठिकाणी बोलता येत नाहीत. परंतु, उपमुख्यमंत्र्यांच्या विश्वासार्हतेबद्दल आणि भूमिकेबद्दल मला रास्त व दाट शंका आहे. ते अतिशय जातीयतेने गृह मंत्रालय चालवित आहेत, कम्युनल पध्दतीने चालवित आहेत. वंचित, शोषित, आदिवासी, दलित, गरीब या राज्यामध्ये सुरक्षित राहू शकत नाहीत. त्यामुळे उपमुख्यमंत्री,

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील..............

श्री.आर.आर.पाटील यांना तात्काळ पदावरुन हटविले पाहिजे आणि त्यांना हटविणार नसतील तर तुमचे सत्ताधारी पक्षाचे देखील संरक्षण आहे अशा प्रकारचा आरोप करावा लागेल. एवढी मागणी करतो आणि या घटनेची गंभीर दखल घेऊन शासनाने कार्यवाही करावी, अशी विनंती करतो आणि थांबतो.

--------------------

..3......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी या ठिकाणी औचित्याचा मुद्दा उपस्थित करतो आहे आणि आपले संरक्षण मागतो आहे. आपल्याला मी यापूर्वीच सांगितले होते की, सन्माननीय सदस्य, प्रा.जोगेंद्र कवाडे यांना संरक्षण द्या. आपण म्हणाला की त्यांना अटक करणार नाही. परंतु, सन्माननीय सदस्य, भाषण आटोपून दरवाजाबाहेर गेल्यानंतर, आपल्या गाडीने जात असतांना पोलिसांच्या 2 गाडया पुढे आणि 2 गाडया मागे घेऊन त्यांना घेरण्यात आले व पोलीस आयुक्तांच्या कार्यालयात नेण्यात आले, त्यांना अटक करण्यात आली. अशा पध्दतीने सदस्यांना अटक होणार असेल तर सदस्यांनी सभागृहात बोलावयाचे की नाही ? लोकशाहीच्या या मंदिरामध्ये आपले विचार मांडावयाचे की नाहीत ? सन्माननीय सदस्य, प्रा.कवाडे हे असा कोणता गुन्हा करण्यासाठी गेले होते ? अशा पध्दतीने सरकार चळवळी दडपणार आहे काय ? या राज्याच्या माजी मंत्री, श्रीमती सुलेखा कुंभारे यांच्यावर राष्ट्रद्रोहाचे कलम लावण्यात आले आहे, ही आणीबाणी आहे काय ? सन्माननीय सदस्य, प्रा.कवाडे यांच्यासंदर्भात जी घटना घडलेली आहे ती बरोबर नाही. यासंदर्भात आपण सरकारला सूचना दिल्या पाहिजेत.

यानंतर श्री.बोरले.............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय या राज्यामध्ये काय चालले आहे ?

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जोगेंद्र कवाडे यांना अटक झ ाालेली आहे. त्यांची त्वरित सुटका करुन त्यांना सभागृहामध्ये उपस्थित होऊ द्यावे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जोगेंद्र कवाडे यांना विधान भवनाच्या आवारामध्ये अटक करण्यात आली आहे की विधान भवनाच्या बाहेर अटक करण्यात आली आहे याची माननीय गृह राज्यमंत्र्यांनी माहिती घ्यावी.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माहिती येईपर्यंत आपण सभागृह तहकूब करावे, अशी आमची मागणी आहे.

**उप सभापती** : सभागृह तहकूब करण्याची आवश्यकता नाही. गृह राज्यमंत्री माहिती घेऊन 10-15 मिनिटामध्ये सभागृहाला माहिती देतील.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जोगेंद्र कवाडे यांनी सभागृहामध्ये भाषण केले आणि सभागृहाच्या बाहेर गेल्यानंतर त्यांना अटक केली गेली.

( काही सन्माननीय सदस्य आपापल्या जागेवर उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**उप सभापती** : सभागृहामध्ये एका अत्यंत महत्वाच्या प्रस्तावावर आपण चर्चा करीत आहोत. सन्माननीय सदस्यांनी चर्चेचे गांभीर्य लक्षात घ्यावे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी साहेबांनी सांगितल्यानंतर मी माननीय गृह राज्यमंत्री श्री.सिद्धाराम म्हेत्रे यांना माहिती घेण्यास सांगितले आहे. 10 मिनिटांमध्ये ते सभागृहाला माहिती देतील.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, अशा प्रकारच्या दडपशाहीमुळे आम्ही काम करु शकत नाही.

**उप सभापती** : अशा परिस्थितीमध्ये मला सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृह 20 मिनिटाकरीता स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक 5 वाजून 7 मिनिटांनी 20 मिनिटाकरीता स्थगित झाली.)

--------

यानंतर श्री.सुंबरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( सभागृह स्थगिती नंतर ... )

**सभापतीस्थानी - माननीय उपसभापती**

**माननीय सदस्यांच्या अटकेबाबत ......**

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, माननीय गृह राज्यमंत्री आता आपल्याला निवेदन करून माहिती देत आहेत.

श्री. सिद्धाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्यामार्फत सभागृहाला माहिती देऊ इच्छितो की, माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांना यशवंत सभागृह येथे मोर्चा बरोबर जात असताना प्रिवेंटिव ॲक्शन म्हणून अटक करण्यात आलेली आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, हे योग्य नाही. सरकारच्या या दडपशाहीचा आम्ही निषेध करतो. ....

**उपसभापती** : मी देखील या संबंधात माहिती घेतली आहे. सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे साहेब हे या सभागृहातील आपले भाषण आटोपून विधीमंडळाच्या बाहेर ....

( विरोधी पक्ष सदस्य 'वेल' मध्ये येऊन सभापतींच्या आसनासमोर घोषणा देत उभे राहतात ... )

**सभापती तालिका नामनिर्देशित करणे.**

**उपसभापती** : मी विधान परिषद नियमातील नियम 8(1) अन्वये खालील सभासदांना सभापती तालिकेवर नामनिर्देशित केल्याचे घोषित करतो. ...

1) श्रीमती सुधा जोशी,

2) डॉ. वसंत पवार,

3) श्री. विनोद तावडे,

4) श्री. अरविंद सावंत.

( विरोधी पक्ष सदस्य 'वेल' मध्ये सभापतींच्या आसनासमोर घोषणा देत असतात ... )

( गोंधळ )

(यानंतर श्री. सरफरे ....टीटी 1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(गोंधळ)

(विरोधी पक्षाचे माननीय सदस्य "वेल" मध्ये उभे राहून घोषणा देतात.)

**उपसभापती** : सभागृहाचे कामकाज 5 वाजून 45 मिनिटांपर्यंत तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक 5.31 ते 5.45 पर्यंत स्थगित करण्यात आली.)

----

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

**पृ.शी.**: भंडारा जिल्ह्यातील खैरलांजी गावातील सुरेखा भोतमांगे व तिच्या 3 मुलांची केलेली हत्या

**मु.शी.**: भंडारा जिल्ह्यातील खैरलांजी गावातील सुरेखा भोतमांगे व तिच्या मुलांची केलेली हत्या या विषयावर सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, मधुकर सरपोतदार, दिवाकर रावते, विनोद तावडे, डॉ. दीपक सावंत, प्रा. शरद पाटील, सर्वश्री कपिल पाटील, जयंत प्र. पाटील, प्रा. जोगेंद्र कवाडे व श्री. रमेश निकोसे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

(चर्चा पुढे सुरु)

( माननीय उपसभापती आसनस्थ होताच विरोधी सन्माननीय सदस्य 'वेल'मध्ये एकत्र येऊन घोषणा देण्यास सुरूवात करतात.)

श्रीमती उषाताई दराडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, खैरलांजी येथे जी घटना घडलेली आहे त्या निमित्ताने मृत्यू पावलेल्या व्यक्तींना सभागृहाने श्रध्दांजली वाहिली पाहिजे. या प्रकरणामुळे संपूर्ण जनतेच्या अस्मितेला धोका पोहोचलेला आहे, असे नाही तर अजूनही एक मुद्दा ऐरणीवर आलेला आहे. कोणत्याही चळवळीमध्ये किंवा कोणत्याही अत्याचारामध्ये ज्यावेळेला अत्याचार होतो, त्यामध्ये पहिल्यांदा महिलेचाच बळी जातो. खैरलांजी प्रकरणामध्ये महिलांवरच अन्याय झालेला आहे. ज्या पध्दतीने महिलांवर अत्याचार झाला त्या पध्दतीने....

('वेल'मधील विरोधी पक्षाच्या सदस्यांकडून घोषणा देण्यात येतात.)

**उपसभापती** : सन्माननीय महिला सदस्या बोलत आहेत. कृपया त्यांच्या भाषणामध्ये सन्माननीय सदस्यांनी अडथळा आणू नये.

(विरोधी पक्षाच्या सदस्यांकडून घोषणा देण्यात येतात.)

श्रीमती उषाताई दराडे : ज्या पध्दतीने महिलांवर अन्याय झालेला आहे, त्याबद्दल सुरूवातीलाच मी तीव्र शब्दामध्ये निषेध व्यक्त करते. महिलांच्या दडपशाहीमध्ये महिलांच्या चारित्र्याचा हत्यार म्हणून वापर होतो ही निषेधाची बाब आहे. महिलांची अब्रू जात असतांना



असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

एसकेके)

श्रीमती उषाताई दराडे (पुढे सुरु....

पुरुषांनी ज्या पध्दतीने त्याचा वापर केला. या मनुवादी संस्कृतीचा आणि पुरुषप्रधान संस्कृतीचा आवाज अजूनपर्यन्त जीवंत आहे, याबाबतीत मी राग व्यक्त करते आणि निषेध करते. महिलांच्या आत्मस्वाभिमानाचा प्रश्न आहे, दलितांच्या आत्मसन्मानाचा प्रश्न आहे. ज्यावेळेला आपण डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेतो आणि सामाजिक न्यायाचा उद्‌घोष करतो, सामाजिक न्यायाचा विचार करतो....

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात )

श्रीमती उषाताई दराडे .......
त्यावेळेला या सर्व मूल्यांना तिलांजली देणारी माणसे या समाजामध्ये अजूनही आहेत याचा आपण गांभीर्याने विचार केला पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज, सावित्रीबाई फुले या सर्वांनी जे विचार दिले त्या विचारांमुळेच आज आपण या ठिकाणी महाराष्ट्राचे पुरोगामित्व जिवंत ठेऊ शकलो. परंतु ज्या पध्दतीचे पोस्टर्स या ठिकाणी दाखवले जात आहेत आणि त्यामध्ये महिलांची जी अवस्था निर्माण केली आहे, ती प्रवृत्ती ज्यांनी जपली, महिलांना दुय्यम स्थान देण्याची प्रवृत्ती.......

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात )

**उपसभापती** : मी 15 मिनिटांकरिता सभागृहाची बैठक स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक सायं 5.51 ते 6.03 वाजेपर्यंत स्थगित झाली )

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**सभापतीस्थानी माननीय उप सभापती**

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन जोरजोराने घोषणा देत असतात. सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे भाषण करीत असतात.)

श्रीमती उषाताई दराडे : सभापती महोदय, समाजातील दलित हा दलित राहावा, समाजातील महिला ह्या दबलेल्या राहाव्यात अशा प्रकारचा जाणीवपूर्वक प्रयत्न समाजामध्ये सतत केला गेला. या देशातील सर्व महिला दलित आहेत, असे छत्रपती शाहू महाराज म्हणाले होते. जर या देशातील सगळया महिला दलित असतील, त्यांच्यावर बलात्कार, अत्याचार होत असतील तर त्याची दखल या सभागृहाने घेण्याची गरज आहे. या देशातील दलित समाज आत्मसन्मानाने जगला पाहिजे, लोकशाही मूल्ये त्याला जगता आली पाहिजेत, त्याला स्वाभिमानाने जगता आले पाहिजे अशा प्रकारचे विचार आणि संदेश डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाला घटना दिली, परिणामी दलित समाज हा आत्मसन्मानाने जगत आहे. "ज्याचे दुखते त्याला कळते" असे एक वाक्य याठिकाणी वापरण्यात आले. या वाक्याला माझा आक्षेप आहे.....

.... नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

04-12-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही )XX=1

SGB/ SBT/ KTG/ 18:05

(सभागृहामध्ये विरोधी पक्षाचे माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात)

**उपसभापती** : सभागृहातील परिस्थिती लक्षात घेऊन सभागृहाची बैठक आता स्थगित करण्यात येत आहे. सभागृहाच्या विशेष बैठकीत उद्या सकाळी 10.30 ते 11.45 या वेळेत अल्पकालीन चर्चा व मंत्रीमहोदयांचे उत्तरासह भाषण पूर्ण करण्यात येऊन सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता सुरु होईल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 06 वाजून 05 मिनिटांनी, मंगळवार, दिनांक 5 डिसेंबर, 2006 च्या सकाळी 10.30 वाजेपर्यंत स्थगित झाली)

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही